भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# खाण अधिनियम, १९५२

(सन १९५२ चा अधिनियम क्रमांक ३५)

[ ३१ मे १९९९ रोजी यथाविद्यमान ]

# The Mines Act, 1952

## (Act No. 35 of 1952)

[*As in force on the 31st May, 1999* ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००१

[किंमत : रु. १०.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ मे १९९९ रोजी यथाविद्यमान असलेला दि माईन्स अॅक्ट, १९५२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १०, अंक २, दिनांक २६ ऑक्टोबर १९९९ यात पृष्ठ १९० ते २२७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक २६ ऑक्टोबर १९९९.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

## *PREFACE*

This edition of the Mines Act, 1952 as on the 31st May, 1999 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 10, dated 26th October, 1999 on pages 190 to 227.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 26th October 1999.

DR. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# खाण अधिनियम, १९५२

कलमांचा क्रम

## प्रकरण एक

कलमे

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. विवक्षित प्रकरणात हा अधिनियम लागू न होणे.
४. दिवसातील वेळेबाबतचे निर्देश.

## प्रकरण दोन

### निरीक्षक आणि प्रमाणन शल्यचिकित्सक

५. मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक.
६. निरीक्षकांची कामे.
७. खाण निरीक्षकांच्या शक्ती.
८. विशेष अधिकाऱ्याच्या प्रवेश करणे, मोजमापे घेणे, इत्यादीबाबतच्या शक्ती.
९. निरीक्षकांना द्यावयाच्या सुविधा.
९क. व्यावसायिक आरोग्य सर्वेक्षणासाठी पुरवावयाच्या सुविधा.
१०. मिळवलेल्या माहितीची गुप्तता.
११. प्रमाणन शल्यचिकित्सक.

## प्रकरण तीन

### समित्या

१२. समित्या.
१३. समितीची कार्ये.
१४. समितीच्या शक्ती, इत्यादी.
१५. खर्चाची वसुली.

## प्रकरण चार

### खाणकामे आणि खाणीचे व्यवस्थापन

१६. खाणकामाची नोटीस देणे.
१७. व्यवस्थापक.
१८. मालक, अभिकर्ते आणि व्यवस्थापक यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या.

## प्रकरण पाच

### आरोग्य आणि सुरक्षितता यांविषयीचे उपबंध

१९. पिण्याचे पाणी.
२०. मैला सफाई.
२१. वैद्यकीय उपकरणे.
२२. ज्यांच्याविरूद्ध स्पष्टपणे उपबंध केलेला नाही अशी धोक्याची कारणे अस्तित्वात असतील किंवा व्यक्तींना कामावर लावणे धोकादायक असेल त्यावेळच्या निरीक्षकांच्या शक्ती.
२२क. विवक्षित प्रकरणी कामावर लावण्यास मनाई करण्याची शक्ती.
२३. अपघातांची सूचना देणे.
२४. अपघाताच्या प्रकरणी चौकशी न्यायालय नियुक्त करण्याची शासनाची शक्ती.
२५. विवक्षित रोगांची सूचना.
२६. रोगाच्या कारणांच्या अन्वेषणाचा निदेश देण्याची शक्ती.
२७. अहवालांचे प्रकाशन.

प्रकरण सहा

कामाचे तास आणि त्याच्या मर्यादा

२८. साप्ताहिक विश्रांतीचा दिवस.
२९. भरपाईदाखल विश्रांतीचे दिवस.
३०. भूपृष्ठावरील कामाचे तास.
३१. भूपृष्ठाखालील कामाचे तास.
३२. रात्रपाळी.
३३. अतिकालिक कामाबद्दल जादा वेतन.
३४. विवक्षित व्यक्तींना कामावर लावण्यास मनाई.
३५. अतिकालिक काम धरून कामाच्या दैनिक तासांची मर्यादा.
३६. कामाच्या वेळासंबंधी सूचना.
३७. पर्यवेक्षकीय कर्मचारी वर्ग.
३८. कामावर लावण्यासंबंधीच्या उपबंधापासून सूट.
३९. सूट देण्याबाबतची नियम करण्याची शक्ती.
४०. अठरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींना कामावर लावणे.
४१. निरसित.
४२. निरसित.
४३. वैद्यकीय तपासणी करविण्यास फर्माविण्याची शक्ती.
४४. निरसित.
४५. अठरा वर्षे वयाखालील व्यक्तींना एखाद्या खाणीत हजर असण्यास मनाई.
४६. स्त्रियांना कामावर लावणे.
४७. निरसित.
४८. कामावर लावलेल्या व्यक्तींच्या नोंदवह्या.

प्रकरण सात

वैतनिक रजा

४९. प्रकरण लागू होणे.
५०. रजेची व्याख्या.
५१. कॅलेंडर वर्ष याची व्याख्या.
५२. वार्षिक वैतनिक रजा.
५३. रजेच्या कालावधीतील वेतन.
५४. विवक्षित प्रकरणी अग्रिम मंजूर करणे.
५५. अप्रदत्त वेतनाच्या वसुलीची पद्धत.
५६. खाणींना सूट देण्याची शक्ती.

प्रकरण आठ

विनियम, नियम आणि उपविधी

५७. केंद्र शासनाची विनियम करण्याची शक्ती.
५८. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.
५९. विनियम व नियम यांचे पूर्वप्रकाशन.
६०. पूर्वप्रकाशनाशिवाय विनियम करण्याच्या शक्ती.
६१. उप कायदे.
६१क. विनियम, नियम आणि उप कायदे संसदेसमोर ठेवणे.
६२. अधिनियम, विनियम इत्यादीतील गोषवारे लावून ठेवणे.

**प्रकरण नऊ**

**शास्ती आणि कार्यपद्धती**

६३. अडथळा आणणे.
६४. खोटे अभिलेख करणे, इत्यादी.
६५. खोटया योग्यता प्रमाणपत्राचा उपयोग.
६६. आराखडे इत्यादी पुरविण्यात टाळाटाळ करणे.
६७. कामगारांना कामावर लावण्यासंबंधीच्या उपबंधाचे व्यतिक्रमण.
६८. अठरा वर्षे वयाखालील व्यक्तींना कामावर लावण्याबद्दल शास्ती.
६९. व्यवस्थापकाची नियुक्ती करण्यात कसूर.
७०. अपघातांची सूचना.
७१. मालक इत्यादींना विवक्षित प्रकरणांत अहवाल देणे.
७२. खाणीत कामावर लावलेल्या व्यक्तींची आबंधने.
७२क. विनियमांच्या विवक्षित व्यतिक्रमणाबद्दल विशेष उपबंध.
७२ख. कलम २२ खालील आदेशांच्या व्यतिक्रमणाबद्दल विशेष उपबंध.
७२ग. धोकादायक परिणाम होतील अशा रीतीने कायद्याचे व्यतिक्रमण करण्याबाबत विशेष उपबंध.
७३. आदेशभंगाबाबत सर्वसाधारण उपबंध.
७४. आधीच्या दोषसिद्धीनंतर वाढीव शास्ती.
७५. मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक यांच्यावर खटला.
७६. विवक्षित प्रकरणांत मालक कोण ते ठरविणे.
७७. विवक्षित प्रकरणात मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक यांस दायित्वातून सूट.
७८. आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.
७९. खटल्यांवरील मर्यादा.
८०. अपराधांची दखल.
८१. विवक्षित प्रकरणांत खटला भरण्याऐवजी समितीकडे निर्देशन करणे.

**प्रकरण दहा**

**संकीर्ण**

८२. एखादी खाण या अधिनियमाच्या अधीन आहे किंवा कसे या प्रश्नाचा निर्णय.
८३. अधिनियमाच्या प्रवर्तनातून सूट देण्याची शक्ती.
८४. आदेशात फेरबदल करण्याची किंवा ते विखंडित करण्याची शक्ती.
८५. शासनाच्या मालकीच्या खाणींना अधिनियम लागू असणे.
८५क. नोटीस इत्यादी देण्यास फर्माविण्यात आलेल्या व्यक्ती तसे करण्यास कायद्याने बांधलेल्या असणे.
८५ख. विवरणे, नोटिसा इत्यादींवर सह्या करणे.
८५ग. सुविधा किंवा सोयी यांसाठी कोणतीही फी किंवा आकार वसूल न करणे.
८६. १९४८ चा अधिनियम ६३ याचे विवक्षित उपबंध खाणींना लागू होणे.
८७. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.
८८. निरसित.

# खाण अधिनियम, १९५२

(१९५२ चा अधिनियम क्रमांक ३५)[1]
(३१ मे, १९९९ रोजी यथाविद्यमान)

[दिनांक १५ मार्च, १९५२]

**खाणीतील कामगार आणि सुरक्षितता यांच्या विनियमनासंबंधीचा कायदा विशोधित व एकत्रित करण्यासाठी अधिनियम.**

**संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो.**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमाला "खाण अधिनियम, १९५२" असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार [2]* * संपूर्ण भारतभर आहे.

(३) हा अधिनियम केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[3] किंवा दिनांकांना अंमलात येईल, आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी आणि निरनिराळ्या राज्यांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील. मात्र दिनांक ३१ डिसेंबर १९५३ नंतरचा दिनांक नियत करता येणार नाही.

**व्याख्या.**

२. [4][(१)] या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर,—

(क) [5]* * * *

(ख) "प्रौढ" याचा अर्थ, ज्या व्यक्तीच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण झाली आहेत ती व्यक्ती, असा आहे ;

[6][(ग) "अभिकर्ता" हा शब्द खाणीच्या संबंधात वापरण्यात आला असेल तेव्हा, त्याचा अर्थ, जी व्यक्ती खाणीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या व्यवस्थापनाच्या, नियंत्रणाच्या, पर्यवेक्षणाच्या आणि निदेशनाच्या कामात भाग घेऊन मालकाच्या वतीने कारवाई करते किंवा करत असल्याचे अभिप्रेत असते अशी प्रत्येक व्यक्ती, असा आहे—मग ती अभिकर्ता म्हणून नियुक्त झालेली असो किंवा नसो ;]

(घ) "मुख्य निरीक्षक" याचा अर्थ, या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेला "मुख्य खाण निरीक्षक", असा आहे ;

---

१. हा अधिनियम १९६२ चा विनियम १२, कलम ३ व अनुसूची द्वारे गोवा, दमण व दीव यांवर आणी १९६८ चा विनियम २६, कलम ३ व अनुसूची द्वारे पाँडिचेरीवर फेरबदलांसह विस्तारित करण्यात आला आहे.

२. १९६८ चा अधिनियम २५, कलम २ व अनुसूची द्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून" हा मजकूर वगळला (१५ ऑगस्ट, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. १ जुलै, १९५२ पहा : भारताचे राजपत्र, १९५२, भाग दोन, कलम ३, इंग्रजी पृष्ठ ८६९ यात प्रकाशित केलेली अधिसूचना क्रमांक एस.आर.ओ. ९६७, दिनांक २७ मे, १९५२.

४. १९५९ चा अधिनियम ६२, कलम २ द्वारे या कलमास पोट कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २ द्वारे मूळ खंड (क) वगळला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ खंड (ग) ऐवजी घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

[1][ (ङ्) "समिती" याचा अर्थ, कलम १२ अन्वये घटित करण्यात आलेली समिती, असा आहे; ]

(च्) "दिवस" याचा अर्थ मध्यरात्रीपासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी, असा आहे;

(छ्) एखाद्या इलाखा शहरात, "जिल्हा दंडाधिकारी" याचा अर्थ, त्या शहरात या अधिनियमान्वये जिल्हा दंडाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी केंद्र शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे;

[2][ (ज्) जी व्यक्ती एखाद्या खाणीचा व्यवस्थापक म्हणून काम करीत असेल किंवा ती त्या खाणीच्या मालकाने, अभिकर्त्याने किंवा व्यवस्थापकाने केलेल्या नियुक्ती अन्वये किंवा त्या व्यवस्थापकाला माहीत असता पुढील ठिकाणी कामे करीत असेल ती व्यक्ती एखाद्या खाणीत "कामावर लावलेली" आहे असे म्हटले जाते मग ती वेतन घेऊन काम करीत असो किंवा नसो—

(एक) कोणत्याही खाणकामात (खनिजे हाताळणे व रवानगीच्या ठिकाणापर्यंत त्यांची वाहतूक आणि रेती गोळा करणे व खाणीपर्यंत तिची वाहतूक ही सहवर्ती कामे धरून);

(दोन) खाणीमध्ये आराखड्याचे बांधकाम करणे धरून, परंतु इमारती, रस्ते, विहिरी आणि कोणत्याही विद्यमान किंवा भावी खाणकामाशी प्रत्यक्षपणे निगडित नसलेली कोणतीही इमारत यांचे बांधकाम सोडून त्या खाणीच्या विकासाशी संबंधित कामात किंवा सेवांमध्ये;

(तीन) त्या खाणीत किंवा तिच्या जवळपास वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही यंत्रसामुग्रीच्या कोणत्याही भागास चालवणे, त्याचे संधारण, त्याची परिरक्षा व त्याची दुरुस्ती या कामात;

(चार) खाणीच्या जागेवरच रवानगीसाठी खनिजे भरण्याच्या कामात;

(पाच) खाणीच्या कोणत्याही कार्यालयात;

(सहा) या अधिनियमान्वये पुरवणे आवश्यक असलेल्या कोणत्याही कल्याण, आरोग्य, स्वच्छता किंवा मैलासफाई सेवांमध्ये किंवा खाणीच्या जागेतील निवासी क्षेत्र वगळून राखण व पहारा यांमध्ये; किंवा

(सात) खाणकामाच्या पूर्वतयारीच्या किंवा त्याला आनुषंगिक किंवा त्याच्याशी निगडित असेल अशा कोणत्याही कामात; ]

(झ्) "निरीक्षक" याचा अर्थ, या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेला "खाणी निरीक्षक", असा आहे आणि त्यात, निरीक्षकाच्या कोणत्याही शक्तीचा वापर करण्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही कर्तव्याचे पालन करण्यासाठी या अधिनियमाद्वारे ज्याला शक्ती प्रदान करण्यात आलेली आहे, असा जिल्हा दंडाधिकारी जेव्हा अशा कोणत्याही शक्तीचा वापर करत असेल किंवा कोणत्याही कर्तव्याचे पालन करत असेल तेव्हा, त्याचा समावेश आहे;

[3]* * * * *

[4][ (ञ्) "खाण" याचा अर्थ, ज्या ठिकाणी खनिजे शोधण्याच्या किंवा मिळवण्याच्या प्रयोजनार्थ कोणतेही काम करण्यात येत होते किंवा येत आहे असे कोणतेही उत्खनन, असा आहे, आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(एक) सर्व विंधणे, आविद्ध छिद्रे, तेल विहिरी आणि तेलक्षेत्राच्या आत खनिज तेल वाहून नेणाऱ्या नळासह सहाय्यक खनिज तेल अनुकूलन संयंत्र;

(दोन) खाणीतील किंवा नजीकचे आणि तिच्या मालकीचे सर्व कूपक—मग त्यांचे खनन चालू असो वा नसो;

(तीन) खणले जात असतानाच्या स्थितीतील सर्व समतल आणि नतसमतल;

(चार) सर्व खुले खाणखळगे;

(पाच) खनिजे किंवा अन्य वस्तू खाणीत आणण्यासाठी किंवा येथून नेण्यासाठी; अथवा तेथून कचरा नेण्यासाठी ठेवलेली सर्व वहनसाधने किंवा हवाई रज्जुमार्ग;

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २ द्वारे मूळ खंड (ङ्) ऐवजी हा खंड घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ खंड (ज्) ऐवजी हा खंड घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे खंड झ्झ् वगळला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ खंड (ञ्) ऐवजी हा खंड घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(सहा) खाणीतील किंवा खाणीच्या लगतचे आणि तिच्या मालकीचे सर्व भुयारी उपमार्ग, समतल, पृष्ठभाग, यंत्रसामग्री, बांधकामे, रेल्वेमार्ग, ट्रामगार्ग आणि कडरुळ ;

(सात) खाणीत किंवा खाणीच्या लगत करण्यात येत असलेली सर्व संरक्षक बांधकामे;

(आठ) एखाद्या खाणीच्या परिसरात असणाऱ्या आणि एकाच व्यवस्थापनाखाली असणाऱ्या आणि मुख्यत्वेकरून त्याच खाणीच्या किंवा त्याच व्यवस्थापनाखालील अनेक खाणींच्या संबंधातील प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व कार्यशाळा आणि भांडारे;

(नऊ) ती खाण किंवा त्याच व्यवस्थापनाखालील अनेक खाणी चालविण्याच्या प्रयोजनासाठी वीजपुरवठा करणारी सर्व शक्ति-केंद्रे परिवर्तिले, उपकेंद्रे, रुपांतरित केंद्रे, दिष्टकारी केंद्रे आणि संचयी, साठवण केंद्रे;

(दहा) जी जागा सर्वस्वी खाण मालकाच्या भोगवटयात असून, खाणीत वापरण्यासाठी रेती किंवा इतर साहित्य साठविण्यासाठी किंवा खाणीतील कचरा साठविण्यासाठी त्या वेळेपुरती वापरली जात असेल, अथवा जेथे अशा वाळूच्या, कचऱ्याच्या किंवा अन्य साहित्याच्या संबंधात कोणतेही काम केले जात असेल अशी कोणतीही जागा ;

(अकरा) जेथे खनिजे किंवा कोक मिळवण्यास, वर्गावर्गी करून ते शुद्ध करण्यास किंवा ते विक्रीसाठी तयार करण्यास सहाय्यभूत अशी कोणतीही प्रक्रिया करण्यात येते अशी खाणीतील किंवा लगतची व तिच्या मालकीची कोणतीही जागा; ]

(ञ्) "खनिजे" याचा अर्थ, जमिनीत खणून, विंधण करून, गाळ उपसून, पाण्याचा दाब लावून, दगडखाण खणून किंवा अन्य कोणत्याही प्रक्रियेद्वारे जमिनीतून मिळवता येतात ते सर्व पदार्थ असा आहे आणि त्यात खनिज तेलांचा (ज्यात पुन्हा नैसर्गिक वायू आणि पेट्रोलियम यांचा अंतर्भाव आहे) समावेश आहे ;

[१]* * * *

(ट्) "खाण कार्यालय" याचा अर्थ, संबंधित खाणीच्या पष्ठभागावर असलेले कार्यालय असा आहे;

[२][ (ट्ट्) "खुला खाणखळगा" याचा अर्थ, दगडखाण म्हणजेच जेथे खनिजे शोधण्याच्या किंवा मिळवण्याच्या प्रयोजनासाठी कोणतेही काम करण्यात आलेले असेल किंवा करण्यात येत असेल असे, पण कूपक किंवा वरजमिनीखाली ज्याचा विस्तार आहे असे उत्खनन सोडून अन्य कोणतेही उत्खनन, असा आहे; ]

(ठ्) "मालक" हा शब्द एखाद्या खाणीच्या संबंधात वापरण्यात आला असेल तर, त्याचा अर्थ, जी व्यक्ती त्या खाणीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा प्रत्यक्ष स्वामी किंवा पट्टेदार * * *[३] किंवा भोगवटादार आहे अशी कोणतीही व्यक्ती, आणि एखादा समापक किंवा धारक जिचा कारभार पाहत आहे अशा एखाद्या खाणीच्या बाबतीत, असा समापक किंवा धारक असा आहे. परंतु ज्या व्यक्तीला त्या खाणीकडून नुसते स्वामित्वधन, भाडे किंवा नजराणा मिळतो ती व्यक्ती किंवा खाण चालवण्यासाठी दिलेला कोणताही भाडेपट्टा, मंजुरी किंवा लायसन यांच्या अधीनतेने, जी व्यक्ती नुसती त्या खाणीची स्वामी आहे, किंवा जी व्यक्ती नुसती त्या खाणीच्या जमिनीची मालक असून तेथील खनिजांमध्ये जिचा हितसंबंध नाही अशी व्यक्ती यात समाविष्ट नाही ; परंतु त्या खाणीत किंवा तिच्या कोणत्याही भागात खाणकाम करण्यासाठी नेमलेला [४][कोणताही कंत्राटदार किंवा पोटपट्टेदार] हा जणू काही मालक असल्याप्रमाणे, तशाच रीतीने या अधिनियमाच्या अधीन राहील, पण त्यामुळे तिच्या मालकाला त्याच्या कोणत्याही दायित्वापासून सूट मिळणार नाही;

(ड्) "विहित" याचा अर्थ, नियम, विनियम किंवा, प्रकरणपरत्वे, उपविधी यांद्वारे विहित केलेले, असा आहे.

[५][ (ढ्) "अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, ज्या वैद्यक व्यवसायीकडे भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १२) याच्या कलम २ च्या खंड (ज्) मधील व्याख्येप्रमाणे कोणतीही मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता असेल आणि ज्याचे नाव त्या कलमाच्या खंड

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २ द्वारे खंड (ञ्ञ्) वगळला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. १९५९ चा अधिनियम ६२, कलम २ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २ द्वारे विवक्षित शब्द गाळले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे "कोणताही कंत्राटदार" याऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ खंड (ढ्) ऐवजी हा खंड घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(ट्) मधील व्याख्येप्रमाणे असलेल्या एखाद्या राज्य वैद्यकीय नोंदवहीत नोंदले गेले आहे, असा एखाद वैद्यक व्यवसायी, असा आहे; ]

(ण्) "विनियम", "नियम" आणि "उपविधी" यांचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेले विनियम, नियम आणि उपविधी, असा आहे;

(त्) जेव्हा दिवसाच्या निरनिराळ्या कालावधीमध्ये काम करणाऱ्या दोन किंवा अधिक व्यक्तिसंचाद्वारे एकाच प्रकारचे काम केले जाते तेव्हा अशांपैकी प्रत्येक संचाला "गट" [1][आणि अशांपैकी प्रत्येक कालावधीला "पाळी" असे म्हणतात];

[2][(त्त्) "वर्दी देण्याजोगी इजा" याचा अर्थ, ज्या इजेमध्ये इजा पोचलेल्या व्यक्तीला बहात्तर तासांपेक्षा अधिक काळ कामावर अनुपस्थित राहण्यास भाग पडणे अंतर्भूत आहे किंवा तसे अंतर्भूत होणे सर्वथा संभवनीय असेल अशी गंभीर शारीरिक इजेव्यतिरिक्त कोणतीही अन्य इजा, असा आहे ;]

[3][(थ्) "गंभीर शारीरिक इजा" याचा अर्थ, ज्या इजेमध्ये शरीराचा कोणताही भाग अथवा खंड किंवा शरीराच्या कोणत्याही भागाचा अथवा खंडाचा वापर यास कायमचे मुकावे लागणे किंवा दृष्टी अथवा श्रवणशक्ती कायमची गमवावी लागणे किंवा तिला इजा होणे, किंवा कोणतीही कायम शारीरिक असमर्थता किंवा कोणताही अस्थिभंग किंवा एक किंवा अधिक सांधे मोडणे किंवा हाताच्या अथवा पायाच्या कोणत्याही अंगुली अस्थीचा भंग अंतर्भूत आहे किंवा तसे अंतर्भूत होणे सर्वथा संभवनीय आहे अशी कोणतीही इजा, असा आहे;

(द्) "आठवडा" याचा अर्थ, शनिवारच्या रात्री किंवा एखाद्या विवक्षित क्षेत्रासाठी मुख्य निरीक्षकाकडून किंवा एखाद्या निरीक्षकाकडून मान्य करण्यात येईल अशा अन्य रात्री मध्यरात्रीपासून प्रारंभ होणारा सात दिवसांचा कालावधी, असा आहे; ]

[4][(२) एखाद्या खाणीत किंवा खाणीच्या संबंधात काम करणारी किंवा कामावर लावलेली एखादी व्यक्ती—

(क्) जर—

(एक) जो कूपक खोदण्यात आलेला आहे किंवा खोदण्यात येत आहे अशा कूपकामध्ये; किंवा

(दोन) वरजमिनीखाली ज्याचा विस्तार आहे अशा कोणत्याही उत्खननामध्ये काम करत असेल किंवा कामावर लावलेली असेल तर, ती व्यक्ती "भूपृष्ठाखाली" काम करत आहे किंवा कामावर लावलेली आहे, असे म्हटले जावे; आणि

(ख्) जर ती व्यक्ती कोणत्याही खुल्या खाणखळग्याच्या ठिकाणी किंवा खंड (क्) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात न आलेल्या अन्य कोणत्याही रीतीने काम करत असेल तर ती व्यक्ती "भूपृष्ठावर" काम करत आहे किंवा कामावर लावलेली आहे, असे म्हटले जावे.]

**[5][विवक्षित प्रकरणांत हा अधिनियम लागू न होणे.**

३. (१) [6][कलमे ७, ८, ९, ४०, ४५ आणि ४६] यांमध्ये अंतर्भूत असलेले उपबंध खेरीज करून, या अधिनियमांचे उपबंध पुढील खाणींना लागू होणार नाहीत—

(क्) जेथे वापरासाठी किंवा विक्रीसाठी खनिजे मिळवण्याकरता नव्हे तर केवळ पूर्वेक्षणाच्या प्रयोजनासाठी उत्खनन करण्यात येत असेल अशी कोणतीही खाण किंवा तिचा भाग;

परंतु,—

(एक) अशा कोणत्याही उत्खननाच्या संबंधात कोणत्याही एका दिवशी वीसपेक्षा अधिक व्यक्ती कामावर लावलेल्या असता कामा नयेत,

(दोन) त्या उत्खननाच्या सर्वात वरच्या बिंदूपासून त्याच्या सर्वात खालच्या बिंदूपर्यंत मोजलेली त्याची खोली कोठेही सहा मीटरपेक्षा आणि दगडी कोळशासाठी केलेल्या उत्खननाच्या बाबतीत, पंधरा मीटरपेक्षा अधिक असता कामा नये; आणि

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम २ द्वारे जादा दाखल केले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ खंड (थ्) व (द्) ऐवजी हे खंड घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. १९५९ चा अधिनियम ६२, कलम २ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ कलम ३ ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

६. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३ द्वारे "कलमे ७, ८, ९, ४४, ४५ आणि ४६" ऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(तीन) अशा उत्खननाच्या कोणत्याही भागाचा विस्तार वरजमिनीखाली झालेला असता कामा नये; किंवा

(ख) कंकर, मुरुम, जांभा दगड, गोटे, चाळ, जाड रेती, साधी वाळू (साच्याची वाळू, काच वाळू आणि अन्य खनिज वाळू वगळून), साधी मृत्तिका (चिकणमाती, चिनी माती, पांढरी माती किंवा तापसाही माती वगळून), चिरा, [1][पाटीचा दगड], गिट्टी, सडक माती, मुलतानी माती, [1][खडूची चिकणमाती, खडू] आणि चुनखडी काढण्याच्या कामात गुतलेली कोणतीही खाण :

परंतु,

(एक) कामाचा विस्तार वरजमिनीखाली झालेला असता कामा नये; किंवा

(दोन) तो खुला खाणखळगा असेल त्या बाबतीत—

(क) उत्खननाच्या सर्वात वरच्या बिंदूपासून त्याच्या सर्वात खालच्या बिंदूपर्यंत मोजलेली त्याची खोली कोठेही सहा मीटरपेक्षा अधिक असता कामा नये;

(ख) कोणत्याही एका दिवशी कामावर लावलेल्या व्यक्तींची संख्या पन्नासपेक्षा अधिक असता कामा नये; आणि

(ग) उत्खननाच्या संबंधात स्फोटके वापरण्यात आलेली असता कामा नयेत.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या खाणीच्या किंवा तिच्या भागाच्या किंवा एखाद्या खाणसमूहाच्या किंवा खाणवर्गाच्या संबंधात विद्यमान परिस्थिती लक्षात घेता, तसे करणे आवश्यक किंवा समयोचित आहे अशी केंद्र शासनाची खात्री पटली तर, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे घोषित करू शकेल की, पोटकलम (१) मध्ये नमूद न केलेले, या अधिनियमाचे कोणतेही उपबंध, अशा कोणत्याही खाणीला किंवा तिच्या भागाला, किंवा खाणसमूहाला किंवा खाणवर्गाला किंवा खाणीत कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तिवर्गाला लागू होतील.

(३) पोटकलम (२) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांना बाध न आणता, जर कोणत्याही वेळी पोटकलम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) च्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींपैकी एखादी शर्त त्या पोटकलमात विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या खाणीच्या संबंधात, पूर्ण केली गेली नसेल तर, पोटकलम (१) मध्ये नमूद न केलेले या अधिनियमाचे उपबंध तात्काळ लागू होतील, आणि शर्त पूर्ण न झाल्याचे वृत्त विहित प्राधिकाऱ्याला विहित रीतीने व विहित मुदतीच्या आत कळविणे हे त्या खाणीच्या मालकाचे, अभिकर्त्याचे किंवा व्यवस्थापकाचे कर्तव्य असेल.]

**४.** या अधिनियमातील, दिवसातील वेळेबाबत केलेले निर्देश हे भारतीय मानक वेळेचे निर्देश असून ती वेळ ग्रिनिच मध्यवर्ती वेळेच्या साडेपाच तास पुढे आहे : **दिवसातील वेळबाबतचे निर्देश.**

परंतु, ज्या क्षेत्रात भारतीय मानक वेळ सामान्यपणे पाळण्यात येत नाही अशा कोणत्याही क्षेत्रासाठी, केंद्र सरकार,—

(क) ते क्षेत्र विनिर्दिष्ट करणारे ;

(ख) त्यात सामान्यपणे पाळण्यात येणारी स्थानिक मध्यवर्ती वेळ निश्चित करणारे; आणि

(ग) त्या क्षेत्रात असलेल्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही खाणीत अशी वेळ पाळण्यास परवानगी देणारे,

नियम करू शकेल.

## प्रकरण दोन

### निरीक्षक आणि प्रमाणित शल्यचिकित्सक

**५.** (१) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विहित अर्हता धारण करीत असेल अशा एखाद्या व्यक्तीला, ज्या राज्यक्षेत्रांना हा अधिनियम लागू आहे अशा सर्व राज्यक्षेत्रांसाठी "मुख्य खाण निरीक्षक" म्हणून, आणि विहित अर्हता धारण करत असतील अशा व्यक्तींना मुख्य निरीक्षकाच्या हाताखालील "खाण निरीक्षक" म्हणून नियुक्त करू शकेल. **मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक.**

(२) जी व्यक्ती भारतातील कोणत्याही खाणीत किंवा भारतातील खाणकामासंबंधातील अधिकारांमध्ये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हितसंबंधित असेल किंवा होईल अशा कोणत्याही व्यक्तीला मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक म्हणून नियुक्त करण्यात येणार नाही, किंवा तिची नियुक्ती झाली असल्यास तिला असे पद धारण करणे चालू ठेवता येणार नाही.

(३) केंद्र सरकारच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या[2] अधीनतेने, जिल्हा दंडाधिकाऱ्याला निरीक्षकाच्या शक्ती वापरता येतील आणि त्याची कर्तव्ये पार पाडता येतील :

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. अशा आदेशांसाठी पहा—भारताचे राजपत्र, १९५३, भाग दोन, कलम ३, ई. पृष्ठ १५३०.

परंतु, [1][कलम २२ किंवा कलम २२क] किंवा कलम ६१ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीं-पैकी कोणत्याही शक्तींचा वापर करण्याची शक्ती कोणत्याही जिल्हा दंडाधिकाऱ्याला प्रदान केली जाते असे या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे मानले जाणार नाही.

(४) मुख्य निरीक्षक आणि सर्व निरीक्षक हे, "भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५)" याच्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानले जाईल.

[2][निरीक्षकांची कामे.

६. (१) या अधिनियमान्वये मुख्य निरीक्षकाला असलेल्या शक्तींपैकी (अपिलांसंबंधीच्या शक्ती सोडून अन्य) तो विनिर्दिष्ट करील अशा शक्ती वापरण्यास मुख्य निरीक्षक केंद्र सरकारच्या मान्यतेने आणि त्यास जे निर्बंध किंवा शर्ती लादणे योग्य वाटेल त्यांच्या अधीनतेने लेखी आदेशाद्वारे त्यात नाम-निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निरीक्षकाला किंवा निरीक्षक वर्गाला प्राधिकृत करू शकेल.

(२) मुख्य निरीक्षक, लेखी आदेशाद्वारे, आदेशात नामनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निरीक्षकाला किंवा निरीक्षक वर्गाला या अधिनियमान्वये निरीक्षकांना प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्ती वापरण्यास मनाई करू शकेल किंवा त्यांच्या वापरावर निर्बंध घालू शकेल.

(३) या कलमात अंतर्भूत असलेल्या अन्य उपबंधांच्या अधीनतेने, मुख्य निरीक्षक, कोणत्या स्थानिक क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये अथवा कोणत्या खाणसमूहाच्या किंवा खाणवर्गाच्या बाबतीत निरीक्षकांना आपापल्या शक्ती वापरता येतील ते घोषित करील.]

खाण निरीक्षकांच्या शक्ती.

७. (१) मुख्य निरीक्षकाला आणि कोणत्याही निरीक्षकाला—

(क) कोणत्याही खाणीच्या बाबतीत, या अधिनियमाच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या विनियमांच्या, नियमांच्या व उपविधींच्या आणि याखालील कोणत्याही आदेशांच्या उपबंधांचे अनुपालन करण्यात येत आहे किंवा नाही याची निश्चिती करून घेण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी तपासणी आणि चौकशी करता येईल;

(ख) त्याला योग्य वाटतील असे कोणतेही सहायक असल्यास त्यांच्यासह दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी कोणत्याही खाणीत किंवा तिच्या कोणत्याही भागात प्रवेश करता येईल, तिचे निरीक्षण करता येईल आणि तिची तपासणी करता येईल :

परंतु, या खंडाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर, जेणेकरून खाणकामात गैरवाजवी व्यत्यय किंवा अडथळा येईल अशा रीतीने करण्यात येणार नाही;

(ग) कोणत्याही खाणीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची अवस्था व दशा, खाणीतील वायुवीजन, खाणीच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या उपविधींची पर्याप्तता आणि खाणीत कामावर लावलेल्या व्यक्तींचे आरोग्य, सुरक्षितता व कल्याण यांच्याशी निगडीत किंवा त्यांच्याशी संबंधित सर्व बाबी आणि गोष्टी यांची तपासणी करता येईल आणि त्यांच्या बाबतीत चौकशी करता येईल, आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्यास, आवश्यक वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीचे जबाब खाणीच्या परिसरात किंवा इतरत्र घेता येतील;

(घ) केंद्र सरकारने याबाबत केलेल्या विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा अन्य शक्ती वापरता येतील :

परंतु, या पोटकलमान्वये कोणत्याही व्यक्तीवर, तिला गुन्ह्यात गोवले जाण्याकडे ज्यांचा रोख आहे अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्याची किंवा असा कोणताही जबाब देण्याची सक्ती करण्यात येणार नाही.

(२) मुख्य निरीक्षकाला आणि कोणत्याही निरीक्षकाला कोणत्याही निरीक्षणाच्या, तपासणीच्या किंवा चौकशीच्या अंती जर असे सकारण वाटत असेल की, या अधिनियमाखाली एखादा अपराध करण्यात आला आहे किंवा करण्यात येत आहे, तर त्यास कोणत्याही जागेची झडती घेता येईल आणि खाणीशी संबंधित असलेली [3][कोणतीही सामग्री किंवा कोणताही आराखडा, छेद देखावा, नोंदवही किंवा अन्य अभिलेख] कब्जात घेता येईल आणि [4][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)] याचे उपबंध त्या संहितेच्या [5][कलम ९४] अन्वये काढलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये घेण्यात आलेल्या झडतीस किंवा केलेल्या अभिग्रहणास ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणेच ते या अधिनियमाखालील कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास, शक्य होईल तितपत लागू होतील.

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ४ द्वारे "कलम २२" या मजकुराऐवजी हा मजकूर घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ४ द्वारे मूळ कलम ६ ऐवजी हे कलम घातले (१६ जानेवारी १९६० रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "कोणतीही नोंदवही किंवा अन्य अभिलेख" या मजकुराऐवजी हा मजकूर घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ५ द्वारे "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५)" या मजकुराऐवजी हा मजकूर घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "कलम ९८" ऐवजी हे शब्द घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

८. मुख्य निरीक्षकाच्या किंवा एखाद्या निरीक्षकाच्या लेखी विशेष आदेशाद्वारे याबाबत जिला विशेष अधि-
यथोचितरित्या प्राधिकृत करण्यात आलेले आहे अशी शासकीय सेवेतील कोणतीही व्यक्ती, कोणत्याही कान्याच्या प्रवेश
खाणीचे किंवा [1][तिच्यातील कोणत्याही उत्पादनाचे] सर्वेक्षण, समतलन किंवा मोजमाप करण्याच्या करणे, मोजमापे घेणे
प्रयोजनासाठी, अशा खाणीच्या व्यवस्थापकाला कमीत कमी तीन दिवसांची नोटीस दिल्यानंतर, दिवसा इत्यादी बाबतच्या
किंवा रात्री कोणत्याही वेळी त्या खाणीत प्रवेश करू शकेल आणि त्या खाणीचे किंवा तिच्या कोणत्याही शक्ति.
भागाचे किंवा [1][तिच्यातील कोणत्याही उत्पादनाचे] सर्वेक्षण, समतलन किंवा मोजमाप करू शकेल :

परंतु, मुख्य निरीक्षकाच्या किंवा निरीक्षकाच्या मते, एखादा आणीबाणीचा प्रसंग असेल तेव्हा, तो लेखी आदेशाद्वारे, अशा कोणत्याही व्यक्तीला, पूर्वोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी, अशी कोणतीही नोटीस न देता, त्या खाणीत प्रवेश करण्यास प्राधिकृत करू शकेल.

९. एखाद्या खाणीचा प्रत्येक मालक, अभिकर्ता आणि व्यवस्थापक, मुख्य निरीक्षकाला व प्रत्येक निरीक्षकांना
निरीक्षकाला आणि कलम ८ अन्वये प्राधिकृत केलेल्या प्रत्येक व्यक्तीला या अधिनियमान्वये कोणताही द्यावयाच्या
प्रवेश, निरीक्षण, सर्वेक्षण, मोजमाप किंवा चौकशी करण्यासाठी सर्व वाजवी सुविधा उपलब्ध करून देईल. सुविधा.

[2][९क. (१) मुख्य निरीक्षक किंवा एखादा निरीक्षक किंवा या बाबतीत त्याने लेखी प्राधिकृत व्यावसायिक
केलेला इतर अधिकारी, खाणीच्या सर्वसाधारण कामाच्या तासात कोणत्याही वेळी किंवा आवश्यक आरोग्य
असेल त्याप्रमाणे दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी, खाणीच्या व्यवस्थापकाला लेखी नोटीस दिल्यानंतर, सर्वेक्षणासाठी
खाणीतील सुरक्षितता व व्यावसायिक आरोग्य यांच्या सर्वेक्षणाचे काम हाती घेऊ शकेल, आणि त्या पुरवावयाच्या
खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक, अशा निरीक्षकाला किंवा अधिकाऱ्याला सर्व आवश्यक सुविधा.
सुविधा (संयंत्र आणि यंत्रसामुग्री यांची तपासणी आणि चाचणी, नमुने आणि सर्वेक्षणाशी संबंधित इतर आधारसामग्री गोळा करणे, खाणीत कामावर असलेल्या व जिला सर्वेक्षणासाठी निवडण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीचे परिवहन व तपासणी यासाठींच्या सुविधा धरून) उपलब्ध करून देईल.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणत्याही सुरक्षितता व व्यावसायिक आरोग्य संबंधिच्या सर्वेक्षणात तपासणीसाठी जिला निवडण्यात आले आहे, अशी एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती तपासणीकरिता आणि आवश्यक असेल अशा ठिकाणी हजर राहील आणि आपल्या कामाच्या व आरोग्याच्या बाबतीतील उक्त सर्वेक्षणाशी संबंधित अशी सर्व माहिती पुरवील.

(३) एखाद्या खाणीमध्ये कामावर लावण्यात आलेल्या ज्या कोणत्याही व्यक्तीची तपासणीसाठी निवड करण्यात आली असेल तिने सुरक्षितता व आरोग्य सर्वेक्षणात खर्च केलेला वेळ तिच्या कामाच्या वेळेमध्ये मोजण्यात येईल, तथापि कोणतेही अतिकालिक वेतन हे सामान्य वेतन दराने देण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ "सामान्य वेतन दर" याचा अर्थ, मूळ वेतन अधिक कोणताही महागाई भत्ता आणि भुयारी भत्ता आणि एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेल्या व्यक्ती त्या त्या वेळी ज्यास हक्कदार असू शकतात, अशी अन्नधान्ये आणि खाद्य तेले मोफत दिल्यामुळे उपार्जित होणारी कोणतीही भरपाई असल्यास त्यासह, रोख रकमेतील भरपाई, असा आहे, परंतु, यात बोनसचा (उत्पादनाकरता प्रोत्साहन म्हणून दिल्या जाणाऱ्या बोनसखेरीज अन्य) किंवा मोफत निवासस्थान, कोळशाचा मोफत पुरवठा, वैद्यकीय आणि शैक्षणिक सुविधा, रुग्णता भत्ता, केरोसीन तेल, टोपल्या, हत्यारे व गणवेश यांचा पुरवठा अशासारख्या सुखसोयी उपलब्ध करून देण्यामुळे उपार्जित होणाऱ्या कोणत्याही नुकसानभरपाईचा समावेश नाही.

(४) पोट कलम (२) खालील तपासणीनंतर, कोणतीही व्यक्ती, अशा प्रकारे हजर राहण्याच्या लगतपूर्वी, एखाद्या खाणीमध्ये जे कर्तव्य बजावीत असेल ते कर्तव्य बजावण्यास ती वैद्यकीयदृष्टया अयोग्य असल्याचे आढळून आले तर, ती व्यक्ती, मालक, अभिकर्ता आणि व्यवस्थापक यांच्या खर्चाने वैद्यकीय उपचार सुरू करण्यास आणि अशा उपचाराच्या कालावधीत संपूर्ण वेतन मिळण्यास हक्कदार असेल.

(५) जर पोटकलम (४) मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या व्यक्तीस, तिने स्वतःला पूर्वोक्त तपासणीकरता हजर करण्याच्या लगतपूर्वी, ती खाणीमध्ये जे कर्तव्य बजावत असेल ते कर्तव्य बजावण्यास वैद्यकीयदृष्टया अयोग्य असल्याचे वैद्यकीय उपचारानंतर घोषित करण्यात आले असेल तर, आणि अशा अयोग्यतेचा थेट संबंध अशा प्रकारे हजर राहण्यापूर्वी खाणीतील तिच्या नोकरीशी जोडता येण्यासारखा असेल तर, मालक, अभिकर्ता आणि व्यवस्थापक अशा व्यक्तीला ती ज्यासाठी वैद्यकीयदृष्टया योग्य असेल अशी पर्यायी नोकरी पुरवील :

परंतु, अशी पर्यायी नोकरी ताबडतोब उपलब्ध नसल्यास, मालक, अभिकर्ता आणि व्यवस्थापक अशा व्यक्तीला, याबाबतीत विहित करण्यात आलेल्या दरानुसार निर्धारित करण्यात येईल असा विकलांग भत्ता देईल :

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ६ द्वारे घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).
२ वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

परंतु, आणखी असे की, जर अशा व्यक्तीने खाणीतील आपली नोकरी सोडण्याचे ठरवले तर, मालक, अभिकर्ता आणि व्यवस्थापक तिला याबाबतीत विहित करण्यात आलेल्या दरानुसार निर्धारित करण्यात येईल अशा विकलांग भरपाईच्या स्वरूपात एक ठोक रक्कम देईल.

(६) पोटकलम (५) च्या परंतुकाखालील दर हे, त्या कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, विकलांगतेचे स्वरूप आणि इतर संबंधित घटक विचारात घेऊन निर्धारित करण्यात येतील.]

मिळवलेल्या माहितीची गुप्तता. १०. (१) कोणत्याही खाणीशी संबंधित असलेल्या नोंदवह्यांच्या किंवा अन्य अभिलेखांच्या सर्व प्रती, व त्यातील उतारे आणि मुख्य निरीक्षकाने किंवा निरीक्षकाने किंवा त्यास मदत करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही खाणीच्या निरीक्षणाच्या [१][किंवा सर्वेक्षणाच्या] ओघात संपादन केलेली अथवा कलम ८ [१][किंवा कलम ९क] अन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपली त्याखालील कर्तव्ये बजावताना संपादन केलेली अन्य सर्व माहिती गोपनीय मानण्यात येईल आणि त्या खाणीत किंवा तिच्या नजीकच्या अन्य कोणत्याही खाणीत कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीचे आरोग्य, सुरक्षितता किंवा कल्याण याविषयी खात्री करून घेण्यासाठी अशी माहिती उघड करणे आवश्यक आहे असे मुख्य निरीक्षकास किंवा निरीक्षकास वाटत असेल त्याखेरीज ती माहिती कोणत्याही व्यक्तीकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे उघड करण्यात येणार नाही.

(२) (क) कोणतेही न्यायालय;

[२][(ख) प्रकरणपरत्वे कलम १२ किंवा कलम २४ अन्वये घटित किंवा नियुक्त करण्यात आलेली एखादी समिती, किंवा चौकशी न्यायालय;]

(ग) पदीय वरिष्ठ किंवा संबंधित खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक;

(घ) "कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) याअन्वये नियुक्त करण्यात आलेला एखादा कामगार भरपाई आयुक्त;

[३][(ङ) नियंत्रक भारतीय खाणी केंद्र;

(च) कोणताही नोंदणीकृत किंवा मान्यताप्राप्त श्रमिक संघ;

(छ) केंद्र शासनाद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल असा इतर अधिकारी, प्राधिकारी किंवा संघटना]

यांच्याकडे अशी माहिती उघड करण्याच्या बाबतीत (तसे फर्माविण्यात आले असल्यास) पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(३) मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक किंवा पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांनी जर या कलमातील उपबंधांच्याविरुद्ध, पूर्वोक्त अशी कोणतीही माहिती केंद्र शासनाच्या संमतीशिवाय उघड केली तर, त्याला/तिला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

(४) कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या संपरीक्षेची कार्यवाही केंद्र शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय सुरू करता येणार नाही.

प्रमाणन शल्यचिकित्सक. ११. (१) केंद्र सरकार अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायींना, ते त्यांना प्रत्येकी नेमून देईल अशा स्थानिक सीमांच्या आत किंवा अशा खाणीसाठी किंवा अशा खाणसमूहासाठी किंवा खाणवर्गासाठी किंवा खाण प्रकारांसाठी या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, "प्रमाणन शल्यचिकित्सक" म्हणून नियुक्त करू शकेल.

(२) केंद्र सरकारला ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल त्यांच्या अधीनतेने, प्रमाणन शल्यचिकित्सक, केंद्र शासनाच्या मान्यतेने, तो निर्दिष्ट करील अशा कालावधीपुरते, या अधिनियमाखालील त्याच्या सर्व किंवा कोणत्याही शक्ती वापरण्यास कोणत्याही अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीस प्राधिकृत करू शकेल, आणि अशा रीतीने प्राधिकृत करण्यात आले असेल तेव्हा, प्रमाणन शल्यचिकित्सकाच्या निर्देशामध्ये अशा कोणत्याही अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीचा निर्देश अंतर्भूत असल्याचे मानले जाईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, एखाद्या खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक असेल किंवा होईल, अथवा त्या खाणीमध्ये, किंवा त्या खाणीत चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही प्रक्रियेमध्ये किंवा कामकाजात किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही एकस्वामध्ये किंवा यंत्रसामग्री मध्ये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हितसंबंधीत असेल किंवा होईल, अथवा अन्यथा खाणीच्या नोकरीत असेल अशा व्यक्तीला, "प्रमाणन शल्यचिकित्सक" म्हणून नियुक्त करण्यात येणार नाही किंवा त्यांच्या शक्ती वापरण्यास प्राधिकृत करण्यात येणार नाही, अथवा अशा रीतीने नियुक्त किंवा प्राधिकृत करण्यात आले असेल तर, तिला अशा शक्तींचा वापर चालू ठेवता येणार नाही.

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ८ द्वारे घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी हा खंड घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे मूळ खंड (ङ) ऐवजी हे खंड घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(४) पुढील बाबींच्या संबंधात विहित करण्यात येतील अशी कर्तव्ये प्रमाणन शल्यचिकित्सक पार पाडील—

[1]* * * * * *

(ख) एखाद्या खाणीत विहित करण्यात येतील अशा जोखमीच्या व्यवसायात किंवा प्रक्रियेत कामावर लावलेल्या व्यक्तींची तपासणी करणे;

(ग) ज्या कोणत्याही खाणीत किंवा खाणवर्गात किंवा खाण प्रकारात—

(एक) काही व्यक्तींना आजार आला असून खाणीत चालवल्या जाणाऱ्या एखाद्या प्रक्रियेच्या स्वरुपामुळे किंवा तेथील कामाच्या अन्य परिस्थितीमुळे तो आजार उद्‌भवला आहे असे मानणे वाजवी असेल तेथे;

[1]* * * * * *

## प्रकरण तीन

### [2][समित्या

१२. (१) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून या अधिनियमाच्या प्रयोजनांकरता पुढील व्यक्तींची मिळून बनलेली एक समिती घटित करू शकेल—— समित्या.

(क) अध्यक्ष म्हणून काम करण्यासाठी, मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक नसेल अशी केंद्र शासनाने नियुक्ती केलेली शासकीय सेवेतील एखादी व्यक्ती;

(ख) मुख्य खाणी निरीक्षक;

(ग) केंद्र सरकारने, खाण कामगारांच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्त केलेल्या दोन व्यक्ती;

(घ) केंद्र सरकारने, खाण मालकांच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्त केलेल्या दोन व्यक्ती;

(ङ) केंद्र सरकारने नियुक्त केलेले, खाण उद्योगात थेट नियुक्ती नसलेले दोन अर्हताप्राप्त खाण अभियंते :

परंतु, खंड (ग) अन्वये नियुक्त केलेल्या व्यक्तींपैकी किमान एक व्यक्ती कोळसा खाणीतील कामगारांच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारी असेल तर, खंड (घ) अन्वये नियुक्त केलेल्या व्यक्तींपैकी किमान एक व्यक्ती कोळसा खाणींच्या मालकांच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारी असेल.

(२) पोट-कलम (१) च्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, केंद्र सरकार, ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे अशा राज्यक्षेत्रांच्या कोणत्याही भागाशी किंवा कोणत्याही खाणीशी किंवा खाण समुहांशी संबंधित विनिर्दिष्ट बाबींवर विचार घेण्यासाठी, एक किंवा अनेक समित्या घटित करू शकेल आणि त्यांच्या सदस्यांची नियुक्ती करू शकेल आणि पोट-कलम (१) चे उपबंध (त्यांच्या परंतुकाखेरीज), त्या पोट-कलमान्वयेच्या कोणत्याही समितीच्या घटनेस, ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते,, या कलमाखालील समितीच्या घटनेस लागू होतील.

(३) समितीच्या सदस्यांमधील कोणतेही पद रिक्त आहे किंवा तिच्या घटनेत एखादा दोष आहे याच एका कारणामुळे एखाद्या समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही विधिबाह्य ठरणार नाही.

१३. (१) कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित करण्यात आलेली समिती— समितीचे कार्य.

(क) या अधिनियमान्वये नियम व विनियम करण्यासंबंधीचे प्रस्ताव विचारात घेईल, आणि केंद्र सरकारला समुचित शिफारशी करील;

(ख) केंद्र सरकार तिच्याकडे वेळोवेळी निर्देशित करील अशा अपघातांची व इतर बाबींची चौकशी करील आणि त्यावर अहवाल देईल; आणि

(ग) पोट-कलम (२) च्या उपबंधाच्या अधिनतेने, या अधिनियमान्वये किंवा विहित करण्यात येईल त्याप्रमाणे तिच्याकडे निर्देशित करणे, आवश्यक अशी या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या विनियम, नियम किंवा उप विधी याखालील नोटीशी किंवा आदेश याविरूद्धची अपिले किंवा आक्षेप यांची सुनावणी करील व त्यांवर निर्णय देईल.

(२) मुख्य निरीक्षक हा त्याने, स्वतःच दिलेल्या किंवा काढलेल्या एखाद्या आदेशाच्या किंवा नोटिशीच्या विरूद्धच्या कोणत्याही अपिलाच्या संबंधातील समितीच्या कार्यवाहीत भाग घेणार नाही किंवा अशा अपिलाशी किंवा आक्षेपाशी संबंधित असलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत त्या समितीचा एक सदस्य म्हणून कार्यवाही करणार नाही.

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ९ द्वारे वगळले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे मूळ शीर्षक व कलमे १२, १३ व १४ यांऐवजी घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

समितीच्या शक्ती, इत्यादी. १४. (१) कलम १२ अन्वये घटित करण्यात आलेल्या एखाद्या समितीला, या अधिनियमान्वये निरीक्षकाला असलेल्या शक्तींपैकी या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, ज्या शक्तींचा वापर करणे तिला आवश्यक किंवा समयोचित वाटेल त्या शक्ती वापरता येतील.

(२) कलम १२ अन्वये घटित करण्यात आलेल्या, एखाद्या समितीला आपली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, पुढील बाबींच्या संबंधात एखाद्या दाव्याची संपरीक्षा करत असताना "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" (१९०८ चा ५) या अन्वये एखाद्या न्यायालयाकडे ज्या शक्ती निहित केलेल्या असतात त्याच शक्ती असतील, त्या बाबी अशा :—

(क) शोध व निरीक्षण;

(ख) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे;

(ग) दस्तऐवज प्रस्तुत करण्यास भाग पाडणे; आणि

(घ) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी.]

खर्चाची वसुली. १५. [१][कलम १२ अन्वये घटित करण्यात आलेल्या एखाद्या समितीकडून] करण्यात आलेल्या कोणत्याही चौकशीचा खर्च संपूर्णत: किंवा अंशत: संबंधित खाणीच्या मालकाने किंवा अभिकर्त्याने सोसावा असे केंद्र शासन निर्देशित करू शकेल आणि अशा रीतीने जी रक्कम देण्याबाबत निदेश देण्यात आलेला आहे ती रक्कम, मुख्य निरीक्षकाने किंवा निरीक्षकाने खाण ज्या ठिकाणी असेल किंवा असा मालक किंवा अभिकर्ता त्या-त्यावेळी ज्या ठिकाणी राहत असेल त्या ठिकाणावर अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे अर्ज केल्यावर त्या दंडाधिकाऱ्याच्या अधिकारितेच्या मर्यादांमध्ये अशा मालकाच्या किंवा अभिकर्त्याच्या मालकीची जी कोणतीही जंगम मालमत्ता असेल तिची अटकावणी व विक्री करून वसूल करता येईल :

परंतु, मालकाने किंवा त्याच्या अभिकर्त्याने केंद्र सरकारकडून किंवा मुख्य खाणी निरीक्षकाकडून नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत अशी रक्कम भरलेली नसावी.

## प्रकरण चार

### खाणकामे आणि खाणीचे व्यवस्थापन

खाणकामांची नोटीस देणे. १६. (१) कोणतेही खाणकाम सुरू करण्यापूर्वी खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक मुख्य निरीक्षकास, भारतीय खाणी केंद्राच्या [२][नियंत्रकास] आणि खाण त्या जिल्ह्यात असेल तेथील जिल्हा दंडाधिकाऱ्यास विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि खाणीसंबंधिचा असा तपशील समाविष्ट असणारी लेखी नोटीस देईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये द्यावयाची कोणतीही नोटीस ही, कोणत्याही खाणकामास सुरूवात करण्याच्या निदान एक महिना अगोदर संबंधित व्यक्तींना पोचेल अशा बेताने देण्यात येईल.

[३][व्यवस्थापक. १७. (१) अन्यथा विहित करण्यात येईल तेवढे सोडून एरव्ही, प्रत्येक खाण एकमेव व्यवस्थापकांच्या अखत्यारीखाली असेल अशा व्यवस्थापकांकडे विहित अर्हता असेल आणि प्रत्येक खाणीचा मालक किंवा अभिकर्ता अशी अर्हता असणाऱ्या एखाद्या व्यक्तीची, असा व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करील :

परंतु, मालक किंवा अभिकर्ता विहित अर्हता धारण करत असतील तर ते व्यवस्थापक म्हणून स्वत:चीच नियुक्ती करू शकतील.

(२) खाणीच्या मालकाने किंवा अभिकर्त्याने दिलेल्या किंवा त्याच्या वतीने देण्यात आलेल्या कोणत्याही सूचनांच्या अधीनतेने, व्यवस्थापक, त्या खाणीचे एकूण व्यवस्थापन, नियंत्रण, पर्यवेक्षण आणि संचालन यासाठी जबाबदार असेल आणि अशा सर्व सूचना मालकांकडून किंवा अभिकर्त्याकडून देण्यात आल्या असतील त्यावेळी त्या तात्काळ लेखी कायम करण्यात येतील.

(३) आणीबाणीच्या प्रकरणाव्यतिरिक्त, खाणीचा मालक किंवा अभिकर्ता किंवा त्याच्या वतीने कोणीही, व्यवस्थापकामार्फत असेल त्या व्यतिरिक्त एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेल्या एखाद्या वयस्थापकाला जबाबदार असलेल्या व्यक्तीला तिच्या सांविधिक कर्तव्याच्या पूर्ततेवर परिणाम करणारे अनुदेश देणार नाही.

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ११ द्वारे विवक्षित शब्दाऐवजी घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे "संचालक" या शब्दाऐवजी हा शब्द घातला (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे मूळ कलमे १७ व १८ याऐवजी ही कलमे घातली (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

१८. (१) प्रत्येक खाणीचा मालक व अभिकर्ता हा प्रत्येकी, वित्तीय व इतर तरतुदी करण्या-करता आणि या अधिनियमाच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या विनियमांच्या, नियमांच्या, उपविधींच्या आणि देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशांच्या उपबंधाच्या अनुपालनाकरता आवश्यक असतील असे उपाय योजण्यास जबाबदार असेल. मालक, अभिकर्ते आणि व्यवस्थापक यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या.

(२) कलम ५८ च्या खंड (घ), (ङ) आणि (त्) अन्वये करण्यात आलेल्या नियमांमध्ये उप-बंधित करण्यात आलेल्या बाबींच्या संबंधातील जबाबदारी सर्वस्वी खाणीचा मालक आणि अभिकर्ता आणि (व्यवस्थापका व्यतिरिक्त) ज्यास पूर्वोक्त उपबंधांच्या अनुपालनाकरता मालक आणि अभिकर्ता नियुक्त करील अशी व्यक्ती यांच्याव्दारे पार पाडण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये किंवा कलम १७ च्या पोट-कलम (३) अन्वये व्यवस्थापकामार्फत देण्यात आल्या असतील त्याखेरीज अन्यथा, देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांच्या अनुपालनाच्या परिणामी या अधिनियमाच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या विनियमांच्या, नियमांच्या, उप विधीच्या किंवा देण्यात आलेल्या आदेशांच्या उपबंधाचे व्यतिक्रमण होत असेल तर असे अनुदेश देणारी प्रत्येक व्यक्ती संबंधित उपबंधांच्या व्यतिक्रमणाबद्दल दायी असेल.

(४) पोट-कलम (१), (२) व (३) यांच्या उपबंधाच्या अधीनतेने, खाणीशी संबंधित असलेले सर्व कामकाज या अधिनियमाच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या विनियमांच्या, नियमांच्या, उप-विधीच्या आणि देण्यात आलेल्या आदेशाच्या उपबंधांनुसार पार पाडण्यात येते हे पाहण्यास त्या खाणीचा मालक, अभिकर्ता व व्यवस्थापक हे प्रत्येकी जबाबदार असतील.

(५) कोणत्याही व्यक्तीकडून या अधिनियमाच्या किंवा तद्न्वये करण्यात आलेल्या विनियमांच्या, नियमांच्या, उप विधीच्या किंवा देण्यात आलेल्या आदेशांच्या कोणत्याही व्यक्तीस कोणतीही कृती किंवा गोष्ट करावयास विनिर्देशपूर्वक फर्माविणाऱ्या किंवा कोणत्याही व्यक्तीस कोणतीही कृती किंवा गोष्ट करण्यास मनाई करणाऱ्या उपबंधाव्यतिरिक्त अन्य उपबंधांचे कोणत्याही व्यक्तीकडून व्यतिक्रमण झाले असेल त्याप्रसंगी व्यतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीव्यतिरिक्त पुढील प्रत्येक व्यक्तीसुद्धा अशा व्यतिक्रमणा-बद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल, मात्र त्या उपबंधांचे पालन सुनिश्चित करण्याकरता आपण सर्व वाजवी तत्परता दाखविली होती आणि असे व्यतिक्रमण घडू नये म्हणून वाजवी उपाय योजले होते असे तिने शाबीत केले तर गोष्ट अलाहिदा :—

(एक) व्यतिक्रमण करण्यात आलेल्या उपबंधाच्या संबंधात देखरेखीची कर्तव्ये बजावण्यासाठी नियुक्त करण्यात आलेला/आलेले अधिकारी/कर्मचारी किंवा अनेक अधिकारी/कर्मचारी ;

(दोन) त्या खाणीचा व्यवस्थापक ;

(तीन) त्या खाणीचा मालक आणि अभिकर्ता ;

(चार) पोट-कलम (२) खालील जबाबदाऱ्या पार पाडण्याकरता नियुक्त केलेल्या/करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्ती असल्यास; त्या :

परंतु, चौकशी व तपासणी केल्यानंतर पूर्वक्त व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती, सकृतदर्शनी दायी नाही, असे आढळून आल्यास, तिच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात आली नाही, तरी चालेल.

(६) एखाद्या खाणीचा मालक किंवा अभिकर्ता यांच्याविरुद्ध या कलमान्वये दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये, व्यवस्थापक आणि इतर अधिकारी, या अधिनियमाच्या उपबंधा-नुसार नियुक्त करण्यात आला आहे किंवा पोट-कलम (२) खालील जबाबदाऱ्या पार पाडण्याकरता एखादी व्यक्ती नियुक्त करण्यात आली आहे हा बचाव होणार नाही.]

## प्रकरण पाच

### आरोग्य आणि सुरक्षितता यांविषयीचे उपबंध

१९. [१][(१) प्रत्येक खाणीत कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींसाठी खाणीतील सोईस्कर अशा योग्य ठिकाणी थंड आणि आरोग्यप्रद अशा पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा उपलब्ध करून तो सुस्थितीत राखण्यासाठी परिणामकारक व्यवस्था करण्यात येईल : पिण्याचे पाणी.

परंतु, भूपृष्ठाखाली कामावर लावलेल्या व्यक्तींच्या बाबतीत, मुख्य निरीक्षक पिण्याचे पाणी योग्य ठिकाणी उपलब्ध करून ते सुस्थितीत राखण्याच्या व्यवस्थेऐवजी अशा पुरवठ्यासाठी अन्य कोणतीही परिणामकारक व्यवस्था करण्यास परवानगी देऊ शकेल.]

(२) अशा सर्व ठिकाणी त्या खाणीत कामावर लावलेल्या बहुसंख्य व्यक्तींना समजणाऱ्या भाषेत सुवाच्य अक्षरात "पिण्याचे पाणी" असे लिहिण्यात येईल आणि असे कोणतेही ठिकाण कोणत्याही धुण्याच्या जागेपासून, मुतारीपासून किंवा शौचकुपापासून [२][सहा मीटर्सच्या] आत असता कामा नये—मात्र त्याहून कमी अंतर ठेवण्यास मुख्य निरीक्षकाने लेखी मान्यता दिलेली असेल तर, गोष्ट अलाहिदा.

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम १० द्वारे मूळ पोट-कलम (१) ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम ४२, कलम १४ द्वारे "बारा फूट" या शब्दांऐवजी हे शब्द घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

(३) सर्व खाणींच्या बाबतीत किंवा कोणत्याही खाणवर्गाच्या किंवा खाण प्रकाराच्या बाबतीत, केंद्र शासनाला पोट-कलमे (१) आणि (२) यांच्या उपबंधांच्या अनुपालनाच्या निश्चितीसाठी आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व वाटप व्यवस्था यांची विहित प्राधिकाऱ्यांद्वारे तपासणी केली जाण्यासाठी नियम करता येतील.

मैलासफाई. २०. (१) प्रत्येक खाणीत पुरुष व स्त्रिया यांच्यासाठी विहित पद्धतीच्या पुरेशा शौचकुपांची आणि मुताऱ्यांची वेगवेगळी व्यवस्था करण्यात येईल व ते अशा सोईस्कर ठिकाणी असतील की, खाणीत कामाला लावलेल्या व्यक्तींना सर्व वेळी तेथवर पोचता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये व्यवस्था करण्यात आलेल्या सर्व शौचकुपात आणि मुताऱ्यांत पुरेशा प्रकाशाची आणि खेळत्या हवेची सोय करण्यात येईल आणि ते सर्व वेळी स्वच्छ व आरोग्यरक्षक स्थितीत ठेवण्यात येतील.

(३) कोणत्याही खाणीत कामाला लावलेल्या पुरुषांच्या व स्त्रियांच्या संख्येच्या गुणोत्तरात त्या खाणीत किंवा शौचकुपांची व मुताऱ्यांची व्यवस्था केली पाहिजे त्यांची संख्या शासन विनिर्दिष्ट करू शकेल आणि त्यास खाणीतील आरोग्यरक्षणाच्या बाबतीत, अशा रीतीने कामाला लावलेल्या व्यक्तींच्या आरोग्याच्या हितार्थ त्यास आवश्यक वाटतील अशा (खाणीत कामाला लावलेल्या व्यक्तींवरील याबाबतची बंधने धरून) अन्य बाबींसाठी उपबंध करता येतील.

[1][वैद्यकीय उपकरणे. २१. (१) प्रत्येक खाणीत कामाच्या सर्व वेळात तावडतोब मिळू शकतील अशा रीतीने विहित करण्यात येतील त्या वस्तू आत असलेल्या व इतक्या प्रथमोपचार पेट्या किंवा कपाटे पुरवण्यात येतील आणि ती सुस्थितीत राखण्यात येतील.

(२) एखाद्या प्रथमोपचार पेटीत किंवा कपाटात किंवा कक्षात विहित वस्तूशिवाय अन्य काहीही ठेवण्यात येणार नाही.

(३) प्रत्येक प्रथमोपचार पेटी किंवा कपाट, ज्या व्यक्तीला प्रथमोपचाराचे विहित करण्यात येईल असे प्रशिक्षण देण्यात आलेले असेल आणि जी खाणीच्या कामाच्या वेळात नेहमी सहज उपलब्ध होईल अशा एखाद्या जबाबदार व्यक्तीच्या ताब्यात ठेवण्यात येईल.

(४) प्रत्येक खाणीत, ज्या व्यक्तींना खाणीत कामावर असताना शारीरिक इजा होईल किंवा त्या आजारी पडतील त्यांना रुग्णालयात किंवा दवाखान्यात घेऊन जाण्यासाठी, खाणीत सहज उपलब्ध होईल अशी विहित करण्यात येईल अशी व्यवस्था करण्यात येईल.

(५) जेथे दिडशेपेक्षा अधिक व्यक्ती कामावर लावण्यात आल्या असतील अशा प्रत्येक खाणीत विहित करण्यात येईल अशी साधनसामग्री ठेवलेल्या आणि अशा वैद्यकीय व शुश्रूषा कर्मचारीवर्गाच्या अखत्याराखाली असलेल्या अशा आकारमानाच्या प्रथमोपचार कक्षाची व्यवस्था करण्यात येईल व तो सुस्थितीत राखण्यात येईल.

ज्यांच्याविरुद्ध स्पष्टपणे उपबंध केलेला नाही अशी धोक्याची कारणे किंवा अस्तित्वात असतील किंवा व्यक्तींना कामावर लावणे धोकादायक असेल त्यावेळच्या निरीक्षकांच्या शक्ती.

२२. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये ज्यासाठी कोणताही स्पष्ट उपबंध करण्यात आला नसेल अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात जर मुख्य निरीक्षकाला किंवा एखाद्या निरीक्षकाला असे आढळले की, कोणतीही खाण किंवा तिचा भाग अथवा त्या खाणीतील किंवा तिच्याशी अगर तिचे नियंत्रण, पर्यवेक्षण, व्यवस्थापन किंवा निदेशन यांच्याशी निगडीत असलेली कोणतीही बाब, वस्तू किंवा प्रथा ही मानवी जीवितास किंवा सुरक्षिततेस धोकादायक आहे किंवा जेणेकरून कोणत्याही व्यक्तीला शारीरिक इजा होण्याची भीती वाटण्याइतपत ती सदोष आहे, किंवा त्याकडे तिचा रोख आहे तर तो, खाणीच्या मालकाला, अभिकर्त्याला किंवा व्यवस्थापनाला त्याबाबत लेखी नोटीस देऊ शकेल आणि ती खाण किंवा तिचा भाग अथवा ती बाब किंवा ती गोष्ट किंवा प्रथा त्याला, अधिकर्त्याला कोणत्या बाबतीत धोकादायक किंवा सदोष आहे असे वाटते त्याबाबतचा तपशील तो, नोटिशीमध्ये नमूद करील, आणि तो नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत व अशा रीतीने त्यात सुधारणा करण्यास फर्मावील.

(१क) ज्यावेळी एखाद्या खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या नोटिशीच्या अटींचे त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत पालन करण्यात कसूर करील त्यावेळी मुख्य निरीक्षक किंवा, प्रकरणपरत्वे, निरीक्षक लेखी आदेशाद्वारे त्या नोटिशीच्या अटींचे पालन सुनिश्चित करून घेण्यासाठी त्याच्या मते, ज्या व्यक्तीची नेमणूक वाजवीरित्या आवश्यक नसेल अशा कोणत्याही व्यक्तीला त्या खाणीत किंवा तिच्या जवळपास किंवा तिच्या कोणत्याही भागात कामावर लावण्यास मनाई करू शकेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधाना बाध न आणता जर एखाद्या खाणीतील किंवा तिच्या भागातील खनिजांचे स्तंभ किंवा खंड काढण्यामुळे किंवा कमी करण्यामुळे त्या स्तंभाचा किंवा खंडांचा चुराडा होणे अथवा त्या कामाचा कोणताही भाग अकाली ढासळणे त्यामुळे अथवा अन्यथा त्या खाणीस किंवा तेथे कामावर लावलेल्या व्यक्तींच्या जीवितास किंवा सुरक्षिततेस धोका उत्पन्न होणे संभवनीय आहे, असे मुख्य निरीक्षकाचे किंवा प्रकरणपरत्वे, निरीक्षकाचे मत असेल तर, अथवा खाणीच्या ज्या भागात असे काम करण्याचे योजलेले असेल तो भाग पक्का बंद करण्याची आणि वेगळा

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ११ द्वारे मूळ कलमे २१ व २२ यांऐवजी ही कलमे घातली (१६ जानेवारी १९६० रोजी व तेव्हापासून).

करण्याची आणि ज्या क्षेत्रास आगीची किंवा पुराची झळ पोचण्याची शक्यता असेल असे क्षेत्र मर्यादित करण्याची व्यवस्था करून आगीच्या किंवा पुराच्या उद्रेकांविरुद्ध पुरेशी सोय केलेली नाही, असे त्यांचे मत असेल तर, मुख्य निरीक्षक किंवा प्रकरणपरत्वे, निरीक्षक त्या खाणीच्या मालकाला, अभिकर्त्याला किंवा व्यवस्थापकाला उद्देशून काढलेल्या लेखी आदेशाद्वारे त्या कामास मनाई करू शकेल.

(३) जर, एखाद्या खाणीत किंवा तिच्या भागात कामाला लावलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा सुरक्षिततेला तातडीचा आणि तात्काळ धोका आहे असे मुख्य निरीक्षकाचे किंवा मुख्य निरीक्षकाने लेखी सर्वसाधारण, किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत प्राधिकृत केलेल्या एखाद्या निरीक्षकाचे मत असेल तर, तो आपल्या मतामागील कारणांचे निवेदन अंतर्भूत असलेला लेखी आदेश काढून त्याद्वारे, [१][धोका दूर करण्यात आला आहे याबद्दल त्यांचे समाधान होईपर्यंत] धोका दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्याच्या मते, त्या व्यक्तीची नेमणूक वाजवीरित्या आवश्यक नसेल अशा व्यक्तीला त्या खाणीत किंवा तिच्या जवळपास किंवा तिच्या कोणत्याही भागात कामावर लावण्यास मनाई करू शकेल.

[२][(३क्) पोट-कलम (१क्) किंवा पोट-कलम (३) अन्वये जिला कामावर लावण्यास मनाई करण्यात आली आहे अशी प्रत्येक व्यक्ती ही, तिला कामावर लावण्यास मनाई करण्यात आली नसती तर, ती ज्या कालावधीत कामावर राहू शकली असती अशा कालावधीकरिता पूर्ण वेतन मिळण्यास हक्कदार असेल आणि मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक, त्या व्यक्तीला अशाप्रकारे पूर्ण वेतन देण्यास दायी असेल :

परंतु, मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक, अशा व्यक्तीला पूर्ण वेतन देण्याऐवजी, त्या व्यक्तीला मनाई करण्यात आलेल्या कामावर जे वेतन मिळत होते तितक्याच वेतनाची पर्यायी नोकरी उपलब्ध करून देऊ शकेल.]

(४) ज्यावेळी एखाद्या निरीक्षकाने पोट-कलम (१) अन्वये एखादी नोटीस दिलेली असेल अथवा पोट-कलम (१क्), पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) अन्वये एखादा आदेश काढला असेल त्यावेळी खाण मालकाला, अभिकर्त्याला किंवा व्यवस्थापकाला ती नोटीस किंवा, प्रकरणपरत्वे, तो आदेश मिळाल्यापासून दहा दिवसाच्या आत, याविरुद्ध मुख्य निरीक्षकाकडे अपील करता येईल, आणि मुख्य निरीक्षकाला, अशी नोटीस किंवा आदेश कायम करता येईल, सुधारता येईल किंवा रद्द करता येईल.

(५) पोट-कलम (१) अन्वये एखादी नोटीस पाठवणारा अथवा पोट-कलम (१क्), पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) अन्वये एखादा आदेश काढणारा मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक आणि पोट-कलम (४) अन्वये (अपीलांतील रद्द करण्याबाबतच्या आदेशाहून अन्य) आदेश देणारा मुख्य निरीक्षक त्याबाबत तात्काळ केंद्र सरकारला कळवील.

(६) मुख्य निरीक्षकाने पोट-कलम (१) अन्वये पाठविलेल्या एखाद्या नोटिशीला, अथवा पोट-कलम (१क्) किंवा पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये मुख्य निरीक्षकाने काढलेल्या एखाद्या आदेशाला खाणीच्या मालकाचा, अभिकर्त्याचा किंवा व्यवस्थापकाचा आक्षेप असेल तर, मागणी अंतर्भूत असणारी ती नोटीस, किंवा तो आदेश मिळाल्यापासून किंवा प्रकरणपरत्वे, अपिलावरील निर्णयाच्या तारखेपासून वीस दिवसांच्या आत, त्याला आपल्या आक्षेपाची लेखी कारणे नमूद करून तो आक्षेप केंद्र सरकारकडे पाठविता येईल, आणि केंद्र सरकार तो आक्षेप [३][सर्वसाधारणपणे आक्षेप मिळाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या कालावधीच्या आत] एका समितीकडे निर्देशित करील.

(७) ज्याच्या बाबतीत पोट-कलम (६) अन्वये आक्षेप घेण्यात आला असेल अशा पोट-कलम (१) खालील प्रत्येक नोटिशीचे, अथवा पोट-कलम (१क्), पोट-कलम (२), पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) खालील प्रत्येक आदेशाचे, समितीचा निर्णय खाणीस प्राप्त होईपर्यंत, अनुपालन करण्यात येईल:

परंतु, मालकांच्या, अभिकर्त्याच्या किंवा व्यवस्थापकाच्या अर्जावरून समितीला पोट-कलम (१) खालील [४][नोटीशीची] अंमलबजावणी, आक्षेपावर तिचा निर्णय होईपर्यंत, प्रलंबित ठेवता येईल.

(८) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) याच्या कलम १४४ अन्वये दंडाधिकाऱ्याला असलेल्या शक्तींवर परिणाम होणार नाही.

२२क. (१) ज्याकरता या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्पष्ट उपबंध करण्यात आले आहेत [५][विवक्षित प्रकरणी कामावर लावण्यास मनाई करण्याची शक्ती.] अशा सुरक्षिततेशी संबंधित अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात जर त्या खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक याने अशा उपबंधाचे पालन करण्यात कसूर केली तर, मुख्य निरीक्षक त्यास तो नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत किंवा तो वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा वाढीव कालावधीच्या आत त्यांचे पालन करण्यास फर्मावणारी लेखी नोटीस देऊ शकेल.

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम १५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे मूळ शब्दाऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

५. १९८३ चा अधिनियम ४२, कलम १६ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(२) ज्यावेळी मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या एखाद्या नोटिशीच्या शर्तीचे, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत किंवा प्रकरणपरत्वे, त्या पोट-कलमान्वये विनिर्दिष्ट केलेल्या वाढीव कालावधीच्या आत, पालन करण्यात कसूर करील तर, मुख्य निरीक्षक लेखी आदेशाद्वारे, त्या नोटिशीच्या शर्तींचे पालन होत आहे याची खातरजमा करण्यासाठी त्याच्या मते ज्या व्यक्तीस कामावर लावणे वाजवीरीत्या आवश्यक नसेल अशा कोणत्याही व्यक्तीला त्या खाणीत किंवा तिच्या जवळपास किंवा तिच्या कोणत्याही भागात, कामावर लावण्यास मनाई करू शकेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये जिला कामावर लावण्यास मनाई करण्यात आली आहे अशी प्रत्येक व्यक्ती, तिला कामावर लावण्यास मनाई करण्यात आली नसती तर ज्या कालावधीसाठी कामावर लावली गेली असती त्या कालावधीकरिता पूर्ण वेतन मिळण्यास हक्कदार असेल आणि मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक त्या व्यक्तीस पूर्ण वेतन देण्यास दायी असेल :

परंतु, मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक, अशा व्यक्तीला पूर्ण वेतन देण्याऐवजी, त्या व्यक्तीला पोट-कलम (२) अन्वये मनाई करण्यात आलेल्या कामावर, जे वेतन मिळत असेल तितक्याच वेतनाची पर्यायी नोकरी उपलब्ध करून देऊ शकेल.

(४) कलम २२ ची पोट-कलमे (५), (६) व (७) यांचे उपबंध हे त्या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या एखाद्या नोटिशीच्या किंवा पोट-कलम (१क्) अन्वये दिलेल्या एखाद्या आदेशाच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या एखाद्या नोटिशीच्या किंवा पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या एखाद्या आदेशाच्या संबंधात लागू होतील].

[१][अपघातांची सूचना देणे.

२३. (१) जेव्हा जेव्हा एखाद्या खाणीत किंवा तिच्या जवळपास,——

(क्) ज्यामध्ये जीवित हानी किंवा गंभीर शारीरिक इजा झाली आहे, असा एखादा अपघात होईल तेव्हा, किंवा

(ख्) स्फोट, प्रज्वलन, उत्स्फूर्त तापन, आगीचा उद्रेक होईल, पाण्याचा किंवा अन्य द्रव-पदार्थाचा लोट उफाळून येईल किंवा जोराने आत घुसेल तेव्हा, किंवा

(ग्) ज्वालाग्राही किंवा अपायकारक वायूचा स्रोत आत शिरेल तेव्हा, किंवा

(घ्) कोणत्याही कूपकामध्ये किंवा आनतिमध्ये ज्याच्या साहाय्याने माणसे किंवा सामग्री यांची खालीवर ने-आण करण्यात येते असे दोर, साखळ्या किंवा अन्य साधने तुटतील तेव्हा; किंवा

(ङ) कोणत्याही कूपकामध्ये माणसे किंवा सामग्री यांची खालीवर ने-आण केली जात असताना पिंजऱ्याचे किंवा अन्य वाहनसाधनाचे अतिकुंडलन होईल तेव्हा, किंवा

(च्) उत्खनिताचा कोणताही भाग अकाली ढासळेल तेव्हा, किंवा

(छ्) विहित करण्यात येईल असा अन्य कोणताही अपघात होईल तेव्हा,

त्या खाणीचा मालक आणि अभिकर्ता किंवा व्यवस्थापक विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याला अशा नमुन्यात आणि अशा कालावधीच्या आत अशा घटनेची सूचना देईल आणि त्याच वेळी तो त्या सूचनेची एक प्रत, विहित करण्यात येईल अशा रीतीने, ज्या ठिकाणी श्रमिक संघाच्या पदाधिकाऱ्यांना ती पाहता येईल अशा ठिकाणी एका विशेष सूचना फलकावर लावील आणि अशी नोटीस लावण्याच्या तारखेपासून किमान चौदा दिवस ती त्या सूचना फलकावर राहील याबाबत खात्री करून घेईल.]

[२][(१क्) जेव्हा जेव्हा एखाद्या खाणीत किंवा तिच्या जवळपास, एखाद्या व्यक्तीस वर्दी देण्यायोग्य इजा झाल्याचा अपघात घडला असेल तेव्हा तेव्हा, त्या खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक, विहित नमुन्यात अशा घटनेची नोंदवहीत नोंद घेईल आणि अशा नोंदीच्या प्रती तीन महिन्यांतून एकदा मुख्य निरीक्षकाला सादर करील.]

(२) ज्यावेळी पोट-कलम (१) अन्वये दिलेली सूचना, एखाद्या जीवित हानीस कारणीभूत झालेल्या अपघातासंबंधीची असेल त्यावेळी तो प्राधिकारी ती सूचना मिळाल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्या घटनेची चौकशी करील, आणि जर असा प्राधिकारी निरीक्षक नसेल तर, तो निरीक्षकाकरवी उक्त कालावधीच्या आत चौकशी करविण्याची व्यवस्था करील.

[३][(३) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, पोट-कलमे (१) आणि (१क्) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्याहून अन्य अशा ज्या अपघातांमुळे एखाद्या व्यक्तीला शारीरिक इजा होऊन, इजा पोचलेल्या व्यक्तींना चोवीस तासापेक्षा अधिक काळ कामावर अनुपस्थित राहणे भाग पडले असेल अशा अपघाताची एका विहित नमुन्यातील नोंदवहीत नोंद करण्यात येईल किंवा ते पोट-कलम (१) किंवा, प्रकरणपरत्वे, पोट-कलम (१क्) च्या उपबंधांच्या अधीन असतील.]

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम १२ द्वारे मूळ पोटकलम (१) ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम ४२, कलम १७ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे मूळ पोट-कलम (३) ऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(४) खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक त्याच्याकडून पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोंदवहीतील नोंदीची एक प्रत, [1][नोंदी ज्या वर्षाशी संबंधित असतील त्या वर्षानंतरच्या वर्षाच्या २० जानेवारीस किंवा त्यापूर्वी] मुख्य निरीक्षकाकडे पाठविली जाईल.

[2][(५) जेव्हा जेव्हा एखाद्या खाणीत किंवा तिच्या जवळपास कोणत्याही व्यक्तीची जीवित हानी किंवा तिला गंभीर शारीरिक इजा झाल्याचा अपघात घडतो तेव्हा तेव्हा मुख्य निरीक्षक किंवा कलम २३ च्या पोटकलम (१) अन्वये ज्याला अपघाताची नोटीस देणे आवश्यक आहे असा निरीक्षक, घटनास्थळी येण्याआधीच किंवा त्यांच्या सहमतीखेरीज, अपघाताच्या ठिकाणी कोणताही बिघाड केला जाणार नाही किंवा त्यात कोणताही फेरफार केला जाणार नाही, मात्र कोणताही पुढील अपघात टाळण्यासाठी, मृत व्यक्तींचे देह तेथून हलविण्यासाठी किंवा कोणत्याही व्यक्तीची संकटातून सुटका करण्यासाठी असा बिघाड किंवा फेरफार आवश्यक असेल तर किंवा अपघाताच्या ठिकाणी काम बंद ठेवल्यास त्यामुळे त्या खाणीतील कामाला गंभीरपणे प्रत्यवाय येत असेल तर ती गोष्ट अलाहिदा :

परंतु, ज्यावेळी मुख्य निरीक्षक किंवा उक्त निरीक्षक अपघात झाल्यापासून बहात्तर तासांच्या आत अपघाताच्या ठिकाणाचे निरीक्षण करण्यात कसूर करील त्यावेळी अपघाताच्या ठिकाणी काम पुन्हा सुरू करता येईल.]

**अपघातांच्या प्रकरणी चौकशी न्यायालय नियुक्त करण्याची शासनाची शक्ती.**

२४. [3][(१) एखाद्या खाणीत किंवा तिच्या जवळपास ज्यावेळी कलम २३ च्या पोटकलम (१) मधील खंडांपैकी कोणत्याही खंडात निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा कोणताही अपघात घडून येईल त्यावेळी त्या अपघाताची कारणे आणि त्यावेळची परिस्थिती यासंबंधी औपचारिक चौकशी केली पाहिजे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, त्याला अशी चौकशी करण्यासाठी एखाद्या सक्षम व्यक्तीची नियुक्ती करता येईल आणि चौकशी करण्याच्या कामी न्यायसहायक म्हणून काम करण्यासाठी कायदेविषयक किंवा विशेष ज्ञान असणाऱ्या एका किंवा अधिक व्यक्तींचीही त्यास नियुक्ती करता येईल.]

(२) अशी कोणतीही चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीला, साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडण्यासाठी आणि दस्तऐवज व महत्त्वाच्या वस्तू [4]* * * प्रस्तुत करण्याची सक्ती करण्यासाठी "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" (१९०८ चा ५) अन्वये दिवाणी न्यायालयाला असलेल्या सर्व शक्ती असतील.

(३) या कलमान्वये एखादी चौकशी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्या चौकशीच्या प्रयोजनासाठी या अधिनियमान्वये निरीक्षकाला असलेल्या शक्तींपैकी ज्या शक्तींचा वापर करणे आवश्यक किंवा समयोचित आहे असे त्यास वाटेल त्या शक्ती वापरता येतील.

(४) या कलमान्वये एखादी चौकशी करणारी व्यक्ती ही, अपघाताची कारणे आणि त्यावेळची परिस्थिती नमूद करून आणि त्यास किंवा न्यायसहायकांपैकी कोणास जे काही अभिप्राय व्यक्त करणे योग्य वाटेल ते नमूद करून, एक अहवाल केंद्र सरकारला सादर करील.

**विवक्षित रोगांची सूचना.**

२५. (१) खाणीत कामाला लावलेल्या कोणत्याही व्यक्तीला, केंद्र सरकारने शासकीय राजपत्रात खाणकामाशी संबंधित एक रोग म्हणून अधिसूचित केलेला कोणताही रोग [5] जडला तर त्या खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापक मुख्य निरीक्षकाकडे आणि विहित करण्यात येईल अशा अन्य प्राधिकाऱ्यांकडे अशा नमुन्यात आणि अशा कालावधीच्या आत त्याबाबतची सूचना पाठवील.

(२) जी व्यक्ती एखाद्या खाणीत कामाला लावलेली आहे किंवा होती आणि जी पोटकलम (१) अन्वये अधिसूचित केलेल्या कोणत्याही रोगाने आजारी आहे किंवा तसे त्या व्यक्तीवर उपचार करणारा कोणताही वैद्यक व्यवसायी समजत असेल तर, तो वैद्यक व्यवसायी विनाविलंब मुख्य निरीक्षकाकडे पुढील गोष्टी नमूद केलेला एक लेखी अहवाल पाठवील—

(क) रुग्णाचे नाव व पत्ता,

(ख) रुग्ण कोणत्या रोगाने आजारी आहे किंवा तसा तो आहे असे तो समजतो ते, आणि

(ग) रुग्ण ज्या खाणीत कामाला असेल किंवा सरतेशेवटी होता त्या खाणीचे नाव व पत्ता.

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम १२ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे मूळ पोटकलम (१) ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे विवक्षित शब्द वगळले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. असे रोग म्हणून जाहीर केलेले सिलिकॉसिस व न्यूमोकॉनिऑसिस यासाठी पहा—**भारतीय राजपत्र, १९५२, भाग दोन, कलम ३, इंग्रजी पृष्ठ ११५३ यामध्ये दिनांक २१ जुलै १९५२ रोजी प्रकाशित झालेली अधिसूचना क्र. एस.आर. ओ. १३०६, आणि असा रोग म्हणून जाहीर केलेल्या मॅंगनीज विषबाधातांत्रिक प्रकार यासाठी पहा—भारतीय राजपत्र १९५६, भाग दोन, कलम ३, इंग्रजी पृष्ठ २१९५ यामध्ये दिनांक १८ डिसेंबर, १९५६ रोजी प्रकाशित झालेली अधिसूचना क्रमांक एस.आर.ओ. ३१०९.**

(३) पोटकलम (१) अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या रोगाने ती व्यक्ती आजारी आहे याविषयी प्रमाणन शल्यचिकित्सकाच्या प्रमाणपत्रावरून किंवा अन्यथा मुख्य निरीक्षकाची खात्री पटेल अशारीतीने पोटकलम (२) खालील अहवालास पुष्टी मिळाली तर, मुख्य निरीक्षक विहित करण्यात येईल इतकी फी त्या वैद्यक व्यवसायीला देईल, आणि अशी दिलेली फी, ज्या खाणीत त्या व्यक्तीला तो रोग जडला असेल त्या खाणीच्या मालकाकडून, अभिकर्त्याकडून किंवा व्यवस्थापकाकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुली योग्य असेल.

(४) जर एखाद्या वैद्यक व्यवसायीने पोटकलम (२) च्या उपबंधांचे पालन करण्यात कसूर केली तर त्यास पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

**रोगाच्या कारणांच्या अन्वेषणाचा निदेश देण्याची शक्ती.**

२६. (१) केंद्र सरकारला जर तसे करणे समयोचित वाटले तर, चौकशीच्या ज्या प्रकरणात कलम २५ च्या पोटकलम (१) अन्वये अधिसूचित केलेला एखादा रोग खाणीत जडला असेल किंवा जडला असण्याचा संशय असेल अशा प्रकरणी चौकशी करून त्याबाबत आपल्याला अहवाल देण्यासाठी त्यास एखाद्या सक्षम व्यक्तीची नियुक्ती करता येईल, आणि अशा चौकशीत न्यायसहायक म्हणून काम करण्यासाठी कायदेविषयक किंवा विशेष ज्ञान असणाऱ्या एका किंवा अधिक व्यक्तींचीही नियुक्ती करता येईल.

(२) कलम २४ ची पोटकलमे (२) व (३) चे उपबंध त्या कलमाखालील कोणत्याही चौकशीला जसे लागू होतात तसेच ते या कलमाखालील चौकशीलाही लागू होतील.

**अहवालाचे प्रकाशन.**

२७. केंद्र सरकारला त्यास योग्य वाटेल अशावेळी व अशारीतीने, [1][कलम १२] खालील एखाद्या समितीने सादर केलेला कोणताही अहवाल किंवा कलम २६ अन्वये त्याच्याकडे सादर करण्यात आलेला कोणताही अहवाल किंवा त्यातील उतारे प्रकाशित करवण्याची व्यवस्था करता येईल आणि ते कलम २४ अन्वये एखाद्या चौकशी न्यायालयाने त्याला सादर केलेला प्रत्येक अहवाल प्रकाशित करवण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण सहा

### कामाचे तास आणि त्याच्या मर्यादा

**साप्ताहिक विश्रांतीचा दिवस.**

२८. कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही एका आठवड्यात सहा दिवसांपेक्षा अधिक काळ एखाद्या खाणीत काम करण्याची मुभा दिली जाणार नाही.

**भरपाई दाखल विश्रांतीचे दिवस.**

२९. (१) कलम ३८ खालील कार्यवाहीच्या अनुषंगाने अथवा कोणत्याही खाणीस किंवा त्या खाणीत कामावर लावलेल्या व्यक्तींना कलम २८ च्या उपबंधातून सूट दिल्याच्या परिणामी, जर खाणीत कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती, कलम २८ मध्ये ज्यासाठी उपबंध करण्यात आला आहे अशा कोणत्याही साप्ताहिक विश्रांतीच्या दिवसांना मुकली असेल तर ज्या महिन्यात असे विश्रांतीचे दिवस तिला देय असतील त्या महिन्याच्या आत, किंवा त्या महिन्याच्या लागोपाठच्या पुढील दोन महिन्यांच्या आत, विश्रांतीच्या दिवसांना जितक्या ती मुकली असेल तितके भरपाईदाखल विश्रांतीचे दिवस घेण्याची तिला मुभा देण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये ज्यासाठी उपबंध करण्यात आला आहे ते विश्रांतीचे दिवस घेण्याची मुभा कशा रीतीने देण्यात येईल ती रीत केंद्र सरकारला विहित करता येईल.

**भूपृष्ठावरील कामाचे तास.**

३०. (१) एखाद्या खाणीत भूपृष्ठावर कामावर लावलेल्या कोणत्याही प्रौढ व्यक्तीला कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक काळ किंवा कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा अधिक वेळ काम करावयास फर्मविण्यात येणार नाही किंवा तिला तशी मुभा देण्यात येणार नाही :

[2][परंतु मुख्य निरीक्षकाच्या पूर्वमान्यतेच्या अधीनतेने या पोटकलमात निर्दिष्ट केलेले दैनिक कमाल तास, पाळी बदल सुकर करण्याच्या दृष्टीने वाढवता येतील.]

(२) अशा कोणत्याही प्रौढ व्यक्तीच्या कामाच्या अवधीची रचना अशारीतीने करण्यात येईल की, तिच्या विश्रांतीच्या मध्यंतरासह तो अवधी कोणत्याही दिवशी सर्व मिळून बारा तासांपेक्षा अधिक विस्तारणारच नाहीत, आणि ती किमान अर्ध्या तासाचे विश्रांतीचे मध्यंतर मिळाल्याशिवाय पाच तासांपेक्षा अधिक काळ अव्याहतपणे काम करणार नाही :

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम १८ द्वारे "कलम १३" या शब्दाऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. १९५९ चा अधिनियम ६२, कलम १४ द्वारे परंतुक जादा दाखल केले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

[1][परंतु, मुख्य निरीक्षक, कारणे लेखी अभिलिखित करून आणि त्यास लादणे योग्य वाटेल अशा शर्तीच्या अधीनतेने, असा एकूण कार्यकाल कोणत्याही दिवशी जास्तीत जास्त चौदा तासांइतका विस्तारण्यास परवानगी देऊ शकेल.]

[2][(३) दोन किंवा अधिक पाळचातील व्यक्तींना भूपृष्ठावर एकाचवेळी एकाच प्रकारचे काम करण्यास मुभा दिली जाणार नाही :

परंतु, या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, अशा व्यक्तींना त्यांचे विश्रांतीचे मध्यंतर वेगवेगळचा वेळी मिळते एवढचा एकाच कारणास्तव त्या व्यक्ती वेगवेगळचा पाळचातील आहेत असे समजण्यात येणार नाही.]

[3][३१. (१) खाणीत भूपृष्ठाखाली कामावर लावलेल्या कोणत्याही प्रौढ व्यक्तीला कोणत्याही आठवडचात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक काळ किंवा कोणत्याही दिवशी आठ तासांपेक्षा अधिक वेळ काम करण्याची मुभा दिली जाणार नाही : भूपृष्ठाखालील कामाचे तास.

परंतु, मुख्य निरीक्षकाच्या पूर्वमान्यतेच्या अधीनतेने, या पोटकलमात निर्दिष्ट केलेले दैनिक कमाल तास पाळी बदल सुकर करण्याच्या दृष्टीने वाढवता येतील.

(२) प्रत्येक पाळीतील कामाचा एकूण कालावधी हा पोटकलम (१) मध्ये ठरवून दिलेल्या दैनिक कमाल तासांपेक्षा अधिक होणार नाही अशा रीतीने पाळीपद्धतीची आखणी केल्याशिवाय कोणत्याही खाणीत भूपृष्ठाखाली कोणतेही काम केले जाणार नाही.

(३) खाणीत कामावर लावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कलम ४८ च्या पोटकलम (४) अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत तिच्या संबंधात दर्शवण्यात आलेल्या कामाच्या अवधी व्यतिरिक्त एरव्ही, भूपृष्ठाखालील खाणीच्या कोणत्याही भागात उपस्थित राहू दिले जाणार नाही.]

[4][३२. ज्यावेळी खाणीत कामावर लावण्यात आलेली एखादी व्यक्ती, मध्यरात्रीनंतरही चालू राहणाऱ्या एखाद्या पाळीत काम करत असेल तेव्हा,— रात्रपाळी.

(क) कलमे २८ आणि २९ यांच्या प्रयोजनार्थ, तिच्या बाबतीत साप्ताहिक विश्रांतीचा दिवस याचा अर्थ, तिची पाळी संपल्यावर सुरू होणारा सलग चोवीस तासांचा कालावधी, असा आहे.

(ख) अशी पाळी संपल्यावर सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी हा, तिच्यापुरता पुढील दिवस असल्याचे समजण्यात येईल, आणि मध्यरात्रीनंतर तिने जितके तास काम केले असेल तितके तास आदल्या दिवसात धरण्यात येतील.]

३३. [5][(१) ज्यावेळी एखाद्या खाणीत एखाद्या व्यक्तीने कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा अधिक काळ भूपृष्ठावर किंवा कोणत्याही दिवशी आठ तासांपेक्षा अधिक काळ भूपृष्ठाखाली काम केले तर, किंवा कोणत्याही आठवडचात भूपृष्ठावर किंवा भूपृष्ठाखाली अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक काळ काम केले तर त्या व्यक्तीला अशा अतिकालिक कामाबद्दल तिच्या सामान्य वेतनदराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्याचा हक्क असेल—त्याबाबतीत दैनिक किंवा साप्ताहिक यापैकी जो आधार तिला अधिक अनुकूल असेल त्याच आधारावर अशा अतिकालिक कामाच्या कालावधीची गणना करण्यात येईल.] अतिकालिक कामाबद्दल जादा वेतन.

[6][(२) ज्यावेळी एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला उक्त्या दराच्या आधारे वेतन देण्यात येत असेल त्यावेळी, समय-दर हा, ज्या आठवडचात अतिकालिक काम करण्यात आले असेल त्याच्या लगतपूर्वीच्या आठवडचात तिने प्रत्यक्षात जेव्हा काम केले असेल अशा दिवसांसाठी कोणतेही अतिकालिक वेतन सोडून तिच्या पूर्ण वेळ कमाईच्या दैनिक सरासरीशी तुल्य असेल आणि असा समय दर हा अशा व्यक्तीचा सामान्य वेतन दर असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, अशा व्यक्तीने जर मागील आठवडचात तेच किंवा तसेच काम केले नसेल तर, समय-दर, हा त्याने त्याच आठवडचात केलेल्या कामाच्या, अतिकालिक काम वगळून, दिवसांची सरासरी किंवा

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम १४ द्वारे मूळ परंतुकाऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून.)

३. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे मूळ कलम ३१ ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे मूळ कलम ३२ ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे मूळ पोटकलम (१) ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

६. १९८३ चा अधिनियम ४२, कलम १९ द्वारे मूळ पोटकलमे (२) व (३) यांऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

कोणत्याही मागील आठवड्यातील त्याच्या कमाईची दैनिक सरासरी यांपैकी जे अधिक असेल तिच्याआधारे आधारण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलहाच्या प्रयोजनार्थ, "सामान्य वेतन दर" यास कलम ९क च्या पोटकलम (३) च्या स्पष्टीकरणात असल्याप्रमाणेच अर्थ असेल.]

(४) केंद्र सरकारला या कलमाच्या उपबंधांचे पालन होण्याची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ एखाद्या खाणीत ठेवावयाच्या नोंदवह्या विहित करता येतील.

[1][विवक्षित व्यक्तींना कामावर लावण्यास मनाई.

३४. कोणत्याही व्यक्तीला एखाद्या खाणीत, मागील बारा तासांमध्ये अन्य कोणत्याही खाणीत ती आधीच काम करीत असेल तर, काम करावयास फर्माविण्यात येणार नाही किंवा तिला तशी मुभा दिली जाणार नाही.]

[2][अतिकालिक काम धरून कामाच्या दैनिक तासांची मर्यादा.

३५. कलम ३९ च्या खंड (क) आणि खंड (ङ) खाली येणाऱ्या प्रकरणांच्या संबंधात असेल त्याखेरीज इतर प्रकरणी एखाद्या खाणीत कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही दिवशी अतिकालिक काम धरून, दहा तासांपेक्षा अधिक काळ काम करावयास फर्माविण्यात येणार नाही किंवा तिला तशी मुभा दिली जाणार नाही.]

कामाच्या वेळांसंबंधी सूचना.

३६. (१) प्रत्येक खाणीचा व्यवस्थापक खाणीत काम सुरू होण्याची आणि बंद होण्याची वेळ आणि जर गट पद्धतीने काम करण्याचे योजले असेल तर अशा प्रत्येक गटाचे काम सुरू होण्याची आणि बंद होण्याची वेळ नमूद केलेली विहित नमुन्यातील एक सूचना खाणीच्या कार्यालयाबाहेर लावण्याची व्यवस्था करील.

(२) ज्या खाणीत, खाण काम या अधिनियमाच्या प्रारंभानंतर सुरू करण्यात येईल अशा खाणीच्या बाबतीत, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली सूचना कामाला सुरुवात करण्याच्या किमान सात दिवस अगोदर लावण्यात येईल.

(३) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट सूचनेत, भूपृष्ठावर कामावर लावलेल्या व्यक्तींसाठी कामाला सुरुवात होण्याची वेळ आणि विश्रांतीच्या मध्यंतरांची वेळसुद्धा नमूद केलेली असेल आणि त्या सूचनेची एक प्रत मुख्य निरीक्षकाने तसे फर्मावले असेल तर, त्याच्याकडे पाठवण्यात येईल.

(४) खाणीतील सरसकट अथवा कोणत्याही गटाचे काम सुरू किंवा बंद करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेत किंवा भूपृष्ठावर कामावर लावलेल्या व्यक्तींसाठी निश्चित केलेल्या विश्रांतीच्या मध्यंतरांत कोणताही बदल करण्याचे योजले असेल तर, विहित नमुन्यातील एक सुधारित सूचना अशा बदलाच्या किमान सात दिवस अगोदर, खाणीच्या कार्यालयाबाहेर लावण्यात येईल, आणि अशा नोटिशीची एक प्रत अशा बदलाच्या किमान सात दिवस अगोदर मुख्य निरीक्षकाकडे पाठवण्यात येईल.

(५) कोणत्याही व्यक्तीला, पोटकलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या सूचनेनुसार असेल त्याव्यतिरिक्त खाणीत काम करण्याची मुभा दिली जाणार नाही.

पर्यवेक्षकीय कर्मचारी वर्ग.

३७. ज्या व्यक्तींच्या बाबतीत त्या पर्यवेक्षकीय किंवा व्यवस्थापकीय पदे धारण करणाऱ्या किंवा गोपनीय नात्याने नेमण्यात आलेल्या व्यक्ती असल्याचे नियमाद्वारे ठरविण्यात येईल अशा व्यक्तींना कलम २८, कलम ३०, कलम ३४ किंवा, [3][कलम ३६ चे पोटकलम (५)] यामधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

कामावर लावण्या-संबंधीच्या उपबंधां-पासून सूट.

३८. (१) खाणीच्या किंवा तेथे कामावर लावलेल्या व्यक्तींच्या सुरक्षिततेला गंभीर धोका अंतर्भूत असेल असा आणीबाणीचा प्रसंग उद्‌भवल्यास, अथवा एखादा अपघात प्रत्यक्षात घडल्यास किंवा घडण्याची धास्ती असल्यास, अथवा कोणतीही दैवी आपत्ती ओढवल्यास, अथवा खाणीतील यंत्रसामग्रीत, संयंत्रात किंवा साधनसामग्रीत बिघाड झाल्याच्या परिणामी त्यासंबंधी कोणतेही तातडीचे काम करावयाचे असल्यास, व्यवस्थापक, कलम २२ [3][आणि कलम २२क] च्या उपबंधांच्या अधीनतेने, आणि कलम ३९ खालील नियमानुसार, खाणीची किंवा तिच्यात कामावर लावलेल्या व्यक्तींची सुरक्षितता राखण्यासाठी आवश्यक असेल अशा कामावर कलम २८, कलम ३०, कलम ३४ [4][कलम ३६ चे पोटकलम (५)] याचे उल्लंघन करून व्यक्तींची नियुक्ती करण्यास परवानगी देऊ शकेल :

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम १८ द्वारे मूळ कलम ३४ ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे मूळ कलम ३५ ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २० द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. १९५३ चा अधिनियम ४२, कलम ४ व तिसरी अनुसूची याद्वारे "कलम ३० चे पोटकलम (४)" याऐवजी घातले.

परंतु, या कलमान्वये यंत्रसामग्रीच्या, संयंत्राच्या किंवा साधन सामग्रीच्या संबंधात कोणतेही तातडीचे काम करावयाचे असल्यास, त्याच्या अनुषंगाने जरी [1][खनिजाच्या] उत्पादनावर परिणाम होणार असला तरी, व्यवस्थापक या कलमान्वये अनुज्ञेय असलेली कारवाई करू शकेल, पण अशा रीतीने करण्यात आलेली कोणतीही कारवाई खाणीच्या सर्वसामान्य कामकाजात गंभीर स्वरुपाचा हस्तक्षेप टाळण्यासाठी आवश्यक त्या मर्यादांच्या बाहेर जाता कामा नये.

(२) ज्या ज्या प्रकरणी व्यवस्थापकाकडून पोटकलम (१) अन्वये कारवाई करण्यात आली असेल असे प्रत्येक प्रकरण, त्याच्याशी संबंधित परिस्थितीसह नमूद करण्यात येईल आणि त्याबाबतचा अहवालही मुख्य निरीक्षकाकडे किंवा निरीक्षकांकडे पाठविण्यात येईल.

[2][३९. [3][केंद्र सरकार] पुढील व्यक्तींना, कलमे २८, ३०, ३१, ३४ किंवा कलम ३६ चे पोटकलम (५) याच्या उपबंधांपासून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत, अशा परिस्थितीत आणि अशा शर्तीवर सूट देण्याची तरतूद करणारे नियम करू शकेल :— सूट देण्याबाबतचे नियम करण्याची शक्ती.

(क) जेव्हा खाणीच्या किंवा तेथे कामावर लावलेल्या व्यक्तींच्या सुरक्षिततेला गंभीर धोका अंतर्भूत असेल असा आणीबाणीचा प्रसंग उद्भवण्याची धास्ती असेल तेव्हा त्या खाणीत कामावर लावलेल्या सर्व व्यक्ती किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही व्यक्ती;

(ख) एखादा अपघात प्रत्यक्षात घडला असेल किंवा घडण्याची धास्ती असेल तेव्हा, या प्रमाणे कामावर लावलेल्या सर्व व्यक्ती किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही व्यक्ती;

(ग) खाणीच्या सर्वसामान्य कामकाजात गंभीर स्वरुपाचा हस्तक्षेप टाळण्याच्या प्रयोजनार्थ, जे काम करणे अपरिहार्य असेल अशा पूर्वतयारीच्या किंवा पूरक स्वरुपाच्या कामात गुंतलेल्या सर्व व्यक्ती किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही व्यक्ती;

(घ) तातडीच्या दुरुस्तीच्या कामात गुंतलेल्या सर्व व्यक्ती किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही व्यक्ती ; आणि

(ङ) जे काम तांत्रिक कारणास्तव अव्याहतपणे चालू ठेवण्यात आले पाहिजे अशा कोणत्याही कामावर लावलेल्या सर्व व्यक्ती किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही व्यक्तीं.]

[4][४०. (१) "खाण (विशोधन) अधिनियम, १९८३" याच्या प्रारंभानंतर, अठरा वर्षे वयाखालील कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही खाणीत किंवा तिच्या कोणत्याही भागात काम करण्यास परवानगी देण्यात येणार नाही. अठरा वर्षापेक्षा कमी वयाच्या व्यक्तींना कामावर लावणे.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सोळा वर्षे वयाखालील शिकाऊ उमेदवार व इतर प्रशिक्षार्थी यांना व्यवस्थापक, योग्य देखरेखीखाली खाणीमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागात काम करण्यास परवानगी देऊ शकेल :

परंतु, शिकाऊ उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रशिक्षणार्थींच्या बाबतीत, त्यांना काम करण्यास परवानगी देण्यापूर्वी, मुख्य निरीक्षकाची किंवा एखाद्या निरीक्षकाची पूर्वमान्यता मिळवण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमातील आणि कलम ४३ मधील "शिकाऊ उमेदवार" याचा अर्थ, "शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१" (१९६१ चा ५२) याच्या कलम २ च्या खंड (क्) मध्ये देण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे असलेला शिकाऊ उमेदवार, असा आहे.]

४१. [**योग्यता प्रमाणपत्र**] खाण (विशोधन) अधिनियम, १९८३, (१९८३ चा ४२) कलम २३ द्वारे निरसत (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४२. [**किशोरांना दिलेल्या योग्यता प्रमाणपत्राचा परिणाम**] खाण (विशोधन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा ४२) कलम २३ द्वारे निरसित (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

[5][४३. (१) एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेली कोणतीही व्यक्ती ही शिकाऊ उमेदवार किंवा इतर प्रशिक्षणार्थी म्हणून असेल त्या व्यतिरिक्त ती व्यक्ती प्रौढ नाही किंवा एखाद्या खाणीत शिकाऊ उमेदवार किंवा इतर प्रशिक्षार्थी म्हणून कामावर लावण्यात आलेली कोणतीही व्यक्ती ही एकतर सोळा वैद्यकीय तपासणी करविण्यास फर्मा-विण्याची शक्ती.

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम २० द्वारे "कोळसा" या शद्वाऐवजी घातले (१६ जानेवारी १९६० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २१ द्वारे मूळ कलम ३९, ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २१ द्वारे विवक्षित शद्वाऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे मूळ कलम ४० ऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम २४ द्वारे मूळ कलम ४३ ऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

वर्षे वयापेक्षा कमी वयाची आहे किंवा ती काम करण्यास योग्य राहिलेली नाही असे निरीक्षकाचे मत असेल तर निरीक्षकाला अशा व्यक्तीची प्रमाणन शल्यचिकित्सकाकडून तपासणी करवण्यात येईल, असे फर्मावणारी नोटीस त्या खाणीच्या व्यवस्थापकावर बजावता येईल, आणि निरीक्षकाने तसा निदेश दिला असेल तर, त्या व्यक्तीची अशा रीतीने तपासणी करवण्यात येऊन ती प्रौढ आहे असे प्रमाणित करण्यात येईपर्यंत किंवा, जर ती व्यक्ती शिकाऊ उमेदवार किंवा प्रशिक्षणार्थी असेल तर ती व्यक्ती सोळा वर्षांपेक्षा, कमी वयाची नाही आणि काम करण्यास योग्य आहे असे प्रमाणित करण्यात येईपर्यंत अशा व्यक्तीला कोणत्याही खाणीत कामावर लावण्यात येणार नाही किंवा तिला काम करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

(२) प्रमाणन शल्यचिकित्सकाने, पोटकलम (१) अन्वये करण्यात आलेल्या निदेशनावरून दिलेले कोणतेही प्रमाणपत्र हे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ त्यात निर्दिष्ट केलेल्या गोष्टींचा निर्णायक पुरावा असेल.]

४४. [**प्रौढ म्हणून काम करण्यास योग्य असे प्रमाणित न करण्यात आलेल्या किशोरांसाठी कामाची वेळ**] खाण (विशोधन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा ४२) कलम २५ द्वारे निरसित (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

[1][अठरा वर्षे वयाखालील व्यक्तींनी एखाद्या खाणीत हजर असण्यास मनाई.

४५. कलम ४० च्या पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, यासंबंधात नियुक्त करील; अशा दिनांकानंतर, अठरा वर्षे वयाखालील कोणत्याही व्यक्तीला एखाद्या खाणीच्या व भूपृष्ठावरील ज्या कोणत्याही भागात खाणकामाशी निगडीत किंवा त्याला आनुषंगिक असे कोणतेही काम केले जात असेल अशा कोणत्याही भागात हजर राहण्यास मुभा दिली जाणार नाही.]

[2][स्त्रियांना कामावर लावणे.

४६. (१) अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही स्त्रीला,—

(क) खाणीचा जो भाग भूपृष्ठाखाली असेल अशा कोणत्याही भागात;

(ख) सकाळी ६ ते संध्याकाळी ७ या अवधी व्यतिरिक्त एरव्ही,

कोणत्याही खाणीत भूपृष्ठावर, कामावर लावण्यात येणार नाही.

(२) खाणीत भूपृष्ठावर कामावर लावण्यात आलेल्या प्रत्येक स्त्रीला, कोणत्याही एका दिवशीचे काम संपल्यापासून कामाचा पुढचा कालावधी सुरू होईपर्यंतच्या मधल्या अवधीत किमान अकरा तासांचे मध्यंतर देण्यात येईल.

(३) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणत्याही खाणीच्या किंवा कोणत्याही खाण वर्गाच्या किंवा वर्णनाच्या खाणीच्या बाबतीत, स्त्रियांना भूपृष्ठांवर कामावर लावण्यासंबंधीच्या वेळांमध्ये बदल करू शकेल, तथापि, तो अशाप्रकारे की, जेणेकरून कोणत्याही स्त्रीला रात्री १० ते सकाळी ५ या दरम्यान कोणत्याही वेळी कामावर लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.]

४७. [वयासंबंधी विवाद] खाण (विशोधन) अधिनियम, १९५९ (१९५९ चा ६२) कलम २८ द्वारे निरसित (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

कामावर लावलेल्या व्यक्तींच्या नोंदवह्या.

४८. [3][(१) प्रत्येक खाणीसाठी त्या खाणीत कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींची एक नोंदवही विहित नमुन्यात व ठिकाणी ठेवण्यात येईल आणि त्या नोंदवहीत, अशा प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत पुढील तपशील दाखवण्यात येईल :—

(क) कामावर लावलेल्या व्यक्तींची नावे, सोबत त्याच्या वडिलांच्या किंवा, प्रकरणपरत्वे, तिच्या पतीच्या नावासह आणि ओळख पटवण्याच्या दृष्टीने आवश्यक असेल असा अन्य तपशील;

(ख) कामावर लावलेल्या व्यक्तीचे वय आणि लिंग;

(ग) कामाचे स्वरूप (भूपृष्ठावरील की, भूपृष्ठाखालील आणि भूपृष्ठावरील असेल तर, ते खुल्या खाणखळग्याच्या ठिकाणचे की, अन्यत्र) आणि त्याच्या प्रारंभाची तारीख;

[4]* * * * *

(ङ) विहित करण्यात येईल असा अन्य तपशील, आणि संबंध्द नोंदी संबंधित व्यक्तीच्या स्वाक्षरीने किंवा अंगठ्याच्या ठशाद्वारे अधिप्रमाणित करण्यात येतील.]

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २४ द्वारे मूळ कलम ४५ ऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. १९५९ चा अधिनियम ६२, कलम २७ द्वारे मूळ कलम ४६ ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २६ द्वारे मूळ पोटकलम (१) ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २७ द्वारे मूळ खंड (घ) वगळला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) द्वारे विहित करण्यात आलेल्या नोंदवहीतील नोंदी अशा असतील की, त्यानुसार काम करणारे कामगार या प्रकरणाच्या कोणत्याही उपबंधांचे उल्लंघन करून काम करणार नाहीत.

(३) कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत पोटकलम (१) द्वारे आवश्यक असलेला तपशील नोंदवहीत नमूद करण्यात येईपर्यंत अशा व्यक्तीला एखाद्या खाणीत कामावर लावता येणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत ज्या नोंदवहीत दर्शविलेल्या कामाच्या अवधी व्यतिरिक्त एरव्ही, अशा व्यक्तीला कामावर लावता येणार नाही.

[1][ (४) केंद्र सरकारने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अभिलिखित करावयाच्या कोणत्याही विशेष कारणास्तव ते ज्या खाणीला सूट देण्यात आली आहे अशी खाण सोडून अन्य प्रत्येक खाणीसाठी विहित नमुन्यात व विहित ठिकाणी वेगवेगळया नोंदवह्या ठेवण्यात येतील आणि त्या खाणीत,—

(क) भूपृष्ठाखाली;
(ख) भूपृष्ठावर खुल्या खाणखळग्यात;
(ग) अन्य बाबतीत भूपृष्ठावर;

कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत पुढील तपशील दर्शविण्यात येईल,—

(एक) कामावर लावलेल्या व्यक्तीचे नाव;
(दोन) तिच्या कामाचा वर्ग किंवा प्रकार;
(तीन) काम गट पद्धतीने करण्यात येत असेल तेव्हा तो ज्या पाळीत काम करत असेल ती पाळी आणि पाळीचे तास.]

(५) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोंदवहीत, कोणत्याही क्षणी जी व्यक्ती त्यावेळी खाणीत भूपृष्ठाखाली उपस्थित असेल अशा प्रत्येक व्यक्तीचे नाव दर्शवण्यात येईल.

[2][ (६) कोणत्याही व्यक्तीला व्यवस्थापकाने तशी परवानगी दिली असल्याशिवाय अथवा या अधिनियमान्वये किंवा अन्य कोणत्याही कायद्यान्वये तसे करण्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला खुल्या खाणखळग्यात किंवा भूपृष्ठाखालील कोणत्याही खाणकामाच्या ठिकाणी प्रवेश करता येणार नाही.]

## प्रकरण सात

### वैतनिक रजा

[3][४९. खाणीत कामावर लावण्यात आलेल्या एखाद्या व्यक्तीला, अन्य कोणत्याही कायद्याअन्वये किंवा कोणत्याही लवाद-निवाडा, करार किंवा सेवा संविदा यातील शर्तीनुसार जे मिळण्याचा हक्क असेल अशा कोणत्याही अधिकारांवर जेणेकरून बाधक परिणाम होईल अशा रीतीने या प्रकरणाचे उपबंध प्रवर्तित होणार नाहीत : प्रकरण लागू होणे.

[4][परंतु, या प्रकरणात जेवढया वार्षिक वैतनिक रजेचा उपबंध करण्यात आला आहे त्यापेक्षा अधिक दीर्घ रजेचा उपबंध जर अशा लवाद-निवाड्यात, करारात किंवा सेवासंविदेत करण्यात आला असेल तर, कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तीला जी रजा मिळण्याचा हक्क असेल तिचे ठरीव प्रमाण असा लवाद-निवाडा, करार किंवा सेवासंविदा यानुसार असेल, परंतु रजेचे विनियमन, अशा लवाद-निवाड्यात, करारात किंवा सेवासंविदेत, ज्यांच्यासाठी उपबंध केलेला नसेल अशा बाबींच्या संबंधात कलम ५० ते ५६ (दोन्ही धरून) यांच्या उपबंधानुसार करण्यात येईल.]

५०. या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ, रजेत साप्ताहिक विश्रांतीचे दिवस किंवा सणांच्या किंवा अन्य तत्सम प्रसंगाच्या सुट्यांचे दिवस—मग ते रजेच्या कालावधीत येत असोत किंवा रजेच्या मागे वा पुढे येत असोत—त्यांचा समावेश होणार नाही. "रजा" यांची व्याख्या.

५१. या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी "कॅलेंडर वर्ष" याचा अर्थ, कोणत्याही वर्षातील जानेवारीच्या पहिल्या तारखेपासून सुरू होणारा बारा महिन्यांचा कालावधी, असा आहे. "कॅलेंडर वर्ष" याची व्याख्या.

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम २९ द्वारे मूळ पोटकलम (४) ऐवजी घातले (१६ जानेवारी १९६० रोजी व तेव्हापासून).
२. वरील अधिनियमाच्या कलम २९ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे मूळ कलमे ४९ ते ५६ यांऐवजी घातली (१६ जानेवारी १९६० रोजी व तेव्हापासून).
४. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २८ द्वारे परंतुकाऐवजी घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

वार्षिक वैतनिक रजा. ५२. (१) एखाद्या कामावर लावण्यात आलेल्या ज्या व्यक्तीने, त्या खाणीत एका कॅलेंडर वर्षाची सेवा पूर्ण केली असेल अशा प्रत्येक व्यक्तीला पुढील कॅलेंडर वर्षात वैतनिक रजा देण्यात येईल, आणि अशा रजेची परिगणना,—

(क) भूपृष्ठाखाली कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, तिने केलेल्या कामाच्या दर [पंधरा दिवसांमागे] एक दिवस या दराने करण्यात येईल, आणि

(ख) अन्य कोणत्याही बाबतीत, तिने केलेल्या कामाच्या दर वीस दिवसांमागे एक दिवस या दराने करण्यात येईल.

(२) (क) एखाद्या खाणीत भूपृष्ठाखाली कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, जर ती त्या कॅलेंडर वर्षात किमान एकशे नव्वद दिवस त्या खाणीत हजर राहिली असेल, तर, आणि

(ख) अन्य कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत जर ती त्या कॅलेंडर वर्षात किमान दोनशे चाळीस दिवस खाणीत हजर राहिली असेल तर, तिने पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली एका कॅलेंडर वर्षाची सेवा पूर्ण केली असल्याचे समजण्यात येईल.

स्पष्टीकरण.—या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) करार किंवा संविदा याद्वारे किंवा स्थायी आदेशान्वये अनुज्ञेय असल्याप्रमाणे अपरिहार्य कामबंदीचे कोणतेही दिवस,

(ख) स्त्री कामगारांच्या बाबतीत, जास्तीत जास्त बारा आठवड्यापर्यंत कितीही दिवसांची प्रसूति-रजा, आणि

(ग) ज्या वर्षात रजा उपभोगण्यात येते त्याच्या आधीच्या वर्षात अर्जित केलेली रजा; हजेरीच्या दिवसांची गणना करण्याच्या प्रयोजनार्थ, कामावर लावलेल्या व्यक्तीने खाणीत काम केलेले दिवस असल्याचे समजण्यात येईल, परंतु ती त्या दिवसांबद्दल रजा अर्जित करणार नाही.

(३) ज्या व्यक्तीची सेवा जानेवारीच्या पहिल्या तारखेव्यतिरिक्त अन्य दिवशी सुरू होत असेल अशी व्यक्ती—

(क) खाणीत भूपृष्ठाखाली कामावर लावण्यात आली असेल तेव्हा, त्या व्यक्तीच्या बाबतीत जर तिची कॅलेंडर वर्षाच्या उर्वरित भागातील हजेरी एकूण दिवसांच्या संख्येच्या किमान निम्म्या इतकी असेल तर; आणि

(ख) अन्य कोणत्याही बाबतीत, जर तिची कॅलेंडर वर्षाच्या उर्वरित भागातील हजेरी एकूण दिवसांच्या संख्येच्या किमान दोन-तृतीयांशाइतकी असेल तर ;

तिला पुढील कॅलेंडर वर्षात पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी वैतनिक रजा मिळण्याचा हक्क असेल.

(४) कोणत्याही व्यक्तीला पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) अन्वये कोणत्याही एका वर्षात जी कोणतीही रजा घेण्याचा हक्क आहे अशी रजा त्या व्यक्तीने घेतली नसेल तर ती रजा पोटकलम (१) अन्वये तिला पुढील कॅलेंडर वर्षात द्यावयाच्या रजेत मिळवण्यात येईल :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीला जितक्या दिवसांची रजा साचवता येईल ती एकूण संख्या कोणत्याही एका वेळी एकंदर तीस दिवसांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, अशा कोणत्याही व्यक्तीने वैतनिक रजेसाठी अर्ज केला असतानाही तिला पोटकलम (६) अनुसार अशी रजा देण्यात आली नसेल तर, तिला अशी न उपभोगलेली रजा कोणत्याही मर्यादेशिवाय पुढे नेण्याचा हक्क असेल.

(५) अशा कोणत्याही व्यक्तीला पोटकलमे (१), (३) आणि (४) अन्वये त्या त्या वेळी अनुज्ञेय असलेल्या सर्व रजेसाठी किंवा तिच्या कोणत्याही भागासाठी ज्या दिवसापासून आपली रजा सुरू व्हावी अशी तिची इच्छा असेल त्या दिवसांच्या किमान पंधरा दिवस अगोदर खाणीच्या व्यवस्थापकाकडे लेखी अर्ज करता येईल.

परंतु, कोणत्याही एका कॅलेंडर वर्षात जितक्या वेळा रजा घेता येईल ती संख्या तीनपेक्षा अधिक असणार नाही.

(६) अशा रजेसाठी पोटकलम (५) अन्वये करण्यात आलेला कोणताही अर्ज परिस्थितीच्या निकडीमुळे रजा नाकारावी असे, रजा मंजूर करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्याचे मत नसेल तर एरव्ही, नाकारण्यात येणार नाही.

(७) एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तीला, आजारपणाच्या कालावधीसाठी, तिला देय असलेली वैतनिक रजा घ्यावयाची असेल तर, रजेचा अर्ज पोटकलम (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत केलेला नसला तरीही, तिला अशी रजा मंजूर करण्यात येईल.

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २९ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

(८) एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तीची नोकरी खाणीच्या मालकाने, अभिकर्त्याने किंवा व्यवस्थापकाने तिच्या नोकरीच्या समाप्तीच्या दिवसापर्यंत तिला जी रजा घेण्याचा हक्क असेल अशी संपूर्ण रजा तिने घेण्यापुर्वी समाप्त केली तर, किंवा अशा व्यक्तीने रजेसाठी अर्ज केला असेल परंतु तिला रजा मंजूर करण्यात न आल्यामुळे, तिने रजा घेण्यापुर्वी नोकरी सोडून दिली तर, खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक त्या न घेतलेल्या रजेच्या बाबतीत, कलम ५३ अन्वये प्रदेय असलेली रक्कम तिला देईल आणि अशी रक्कम मालकाने, अभिकर्त्याने किंवा व्यवस्थापकाने त्या व्यक्तीची नोकरी समाप्त केली असेल त्याबाबतीत अशा समाप्तीनंतरचा कामाचा दुसरा दिवस संपण्यापुर्वी, आणि एखाद्या व्यक्तीने स्वतःहून नोकरी सोडून दिली असेल त्याबाबतीत, पुढच्या पगाराच्या दिवशी किंवा त्यापूर्वी चुकती करण्यात येईल.

(९) एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तीची तिने न उपभोगलेली रजा, तिच्या नोकरीच्या समाप्तीपुर्वी देणे आवश्यक असलेल्या कोणत्याही नोटिशीच्या कालावधीची मोजदाद करताना विचारात घेतली जाणार नाही.

[१][(१०) कामावर लावण्यात आलेल्या एखाद्या व्यक्तीला ज्यावेळी सेवामुक्त करण्यात येईल किंवा बडतर्फ करण्यात येईल किंवा ती नोकरी सोडेल किंवा नियत वयोमानानुसार निवृत्त होईल किंवा सेवेत असताना मरण पावेल त्यावेळी तिला किंवा तिच्या वारसांना किंवा प्रकरणपरत्वे, तिच्या नामनिर्देशितीना पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने परिगणना केल्याप्रमाणे तिला देय असलेल्या रजेऐवजी वेतन मिळण्याचा हक्क असेल, मात्र—

(क) एखाद्या खाणीत भूपृष्ठाखाली कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तीच्या प्रकरणी ती तिला कामावर लावण्यात आल्याच्या दिनांकापासून तिच्या सेवामुक्तीच्या किंवा बडतर्फीच्या किंवा, नोकरी सोडण्याच्या किंवा नियत वयोमानानुसार निवृत्तीच्या किंवा मृत्यूच्या दिनांकापर्यंतच्या एकूण दिवसाच्या किमान निम्मे दिवस हजर राहिली असली पाहिजे; आणि

(ख) कोणत्याही इतर प्रकरणी ती, तिला कामावर लावण्यात आल्याच्या दिनांकापासून तिच्या सेवामुक्तीच्या किंवा बडतर्फीच्या किंवा नोकरी सोडण्याच्या किंवा नियत वयोमानानुसार निवृत्तीच्या किंवा मृत्यूच्या दिनांकापर्यंतच्या एकूण दिवसांच्या किमान दोन तृतीयांश दिवस हजर राहिली असली पाहिजे, आणि त्या खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक यांच्याकडून असे वेतन, व्यक्तीला सेवामुक्त करण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा तिने नोकरी सोडली असेल किंवा ती नियत वयोमानानुसार निवृत्त झाली असेल त्याबाबतीत अशा सेवामुक्तीच्या, बडतर्फीच्या, नोकरी सोडण्याच्या किंवा प्रकरणपरत्वे, नियत वयोमानानुसार निवृत्तीच्या नंतरचा कामाचा दुसरा दिवस समाप्त होण्यापुर्वी, आणि कामावर लावण्यात आलेली व्यक्ती, सेवेत असतांना मरण पावेल त्याबाबतीत तिच्या मृत्यूपासून दोन महिन्यांच्या कालावधीच्या आत चुकते करण्यात येईल.]

**स्पष्टीकरण.**—[२][पोट-कलमे (१), (३) आणि (१०)] यांच्या प्रयोजनार्थ, अर्धा दिवस किंवा त्यापेक्षा अधिक असा रजेचा कोणताही खंडित कालावधी हा, एक पुर्ण दिवस म्हणून मानण्यात येईल आणि अर्ध्या दिवसापेक्षा कमी असलेला भाग वगळण्यात येईल.

**रजेच्या कालावधीतील वेतन.**

५३. एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तीला कलम ५२ अन्वये अनुज्ञेय असलेल्या रजेबद्दल तिला तिच्या रजेच्या महिन्याच्या लगत पुर्वीच्या महिन्यात ज्या ज्या दिवशी ती कामावर असेल त्या दिवसाबद्दलचे तिचे कोणतेही अतिकालिक वेतन आणि बोनस वगळून, परंतु कोणताही महागाई भत्ता आणि खाणीत कामाला लावलेल्या व्यक्तींना त्या त्यावेळी जे अनुज्ञेय अन्नधान्य आणि अन्य वस्तू मिळण्याचा हक्क असेल ते विनामूल्य दिल्यामुळे प्रोद्भूत होणारी कोणतीही भरपाई असल्यास अशा भरपाईसह रोख भरपाई धरून तिच्या एकूण पुर्णकालिक कमाईच्या दैनिक सरासरीइतक्या दराने प्रदान करण्यात येईल :

परंतु, अशी कोणतीही सरासरी कमाई काढता येत नसेल तर, त्याच महिन्यात तशाच रीतीने कामावर लावण्यात आलेल्या सर्व व्यक्तींच्या एकूण पुर्णकालिक कमाईच्या दैनिक सरासरीच्या आधारे सरासरीची मोजदाद करण्यात येईल.

**विवक्षित प्रकरणी आगाऊ प्रदान करणे.**

५४. एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेल्या ज्या व्यक्तीला किमान चार दिवस इतकी रजा देण्यात आली असेल तिला तिची रजा सुरु होण्यापुर्वी दिलेल्या रजेच्या कालावधीबद्दल प्रदेय असलेले वेतन देण्यात येईल.

**अप्रदत्त वेतनाच्या वसुलीची पद्धत.**

५५. या प्रकरणान्वये एखाद्या खाणीच्या मालकाने, अभिकर्त्याने किंवा व्यवस्थापकाने प्रदान करणे आवश्यक असलेली परंतु त्याने प्रदान न केलेली अशी कोणतीही रक्कम "वेतन प्रदान अधिनियम, १९३६" (१९३६ चा ४) याच्या उपबंधानुसार "विलंबित मजुरी" म्हणून वसुलीयोग्य असेल.

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम २९ द्वारे घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २९ द्वारे "पोटकलमे (१) आणि (३)" यांऐवजी घातली (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

खाणींना सूट देण्याची शक्ती. [1][५६. कोणत्याही खाणीत कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तींना लागू असलेल्या रजेच्या नियमांत उपबंधित करण्यात आलेले लाभ हे, या प्रकरणात उपबंधित केलेल्या लाभापेक्षा केंद्र सरकारच्या मते कमी अनुकल नाहीत याबद्दल केंद्र शासनाची खात्री पटल्यास, केंद्र सरकार लेखी आदेशाद्वारे आणि त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने त्या खाणीला या प्रकरणाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधापासून सूट देऊ शकेल.]

---

## प्रकरण आठ

### विनियम, नियम आणि उपविधी

केंद्र सरकारची विनियम करण्याची शक्ती. ५७. केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढे नमूद केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी या अधिनियमाशी सुसंगत असे विनियम करू शकेल, ती म्हणजे :—

(क्) मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता विहित करणे;

(ख्) या अधिनियमान्वये खाणीचे निरीक्षण करण्याच्या संबंधात मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक यांची कर्तव्ये आणि शक्ती विहित आणि विनियमित करणे ;

(ग्) खाणीचे मालक, अभिकर्ते व व्यवस्थापक यांची आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या व्यक्तींची कर्तव्ये विहित करणे आणि खाणीचे [2][अभिकर्ते व व्यवस्थापक यांच्या आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या व्यक्तींच्या अर्हता (वय धरून)] विहित करणे ;

(घ्) खाणीचे व्यवस्थापक आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या अन्य व्यक्ती यांना आपली कर्तव्ये कार्यक्षमतेने पार पाडणे शक्य व्हावे म्हणून सोयींची तरतूद करण्यास फर्माविणे ;

(ङ्) खाण व्यवस्थापकांच्या आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या व्यक्तिंच्या अर्हता परीक्षेद्वारे किंवा अन्यथा विनिश्चित करण्याची आणि क्षमता प्रमाणपत्रे देण्याची व त्यांचे नूतनीकरण करण्याची रीत विनियमित करणे ;

(च्) अशा परीक्षा, आणि अशा प्रमाणपत्रांचे प्रदान व त्यांचे नूतनीकरण यांच्या बाबतीत कोणतीही फी द्यावयाची असल्यास, अशी फी निश्चित करणे ;

(छ्) कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या शर्तींच्या अधीनतेने, एकापेक्षा अधिक खाणी एकाच व्यवस्थापकाच्या अखत्याराखाली असणे किंवा कोणतीही खाण किंवा खाणी विहित अर्हता नसलेल्या व्यवस्थापकांच्या अखत्याराखाली असणे कायद्यानुसार संमत होईल ती परिस्थिती व त्या शर्ती ठरवणे ;

[3][(ज्) या अधिनियमान्वये प्रमाणपत्र धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तिची गैरवर्तणूक किंवा अक्षमता यांसंबंधीची कोणतीही चौकशी धरुन या अधिनियमान्वये करावयाच्या चौकशी आणि असे कोणतेही प्रमाणपत्र विलंबित किंवा रद्द करणे यासंबंधी उपबंध करणे, आणि आवश्यक असेल तेव्हा चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" (१९०८ चा ५) याखाली साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडण्याच्या आणि कागदपत्रे व महत्त्वाच्या वस्तू प्रस्तुत करण्याची सक्ती करण्याच्या प्रयोजनासाठी दिवाणी न्यायालयाला असलेले सर्व अधिकार असतील असे उपबंधित करणे ; ]

(झ्) "भारतीय स्फोटकद्रव्ये अधिनियम, १८८४' (१८८४ चा ४) आणि त्याखाली केलेले कोणतेही नियम यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, स्फोटकद्रव्ये साठवणे, त्यांची वाहतूक करणे आणि त्यांचा वापर करणे यासंबंधी विनियमन करणे ;

[4][(ञ्) खाणींमध्ये किंवा एखाद्या खाणवर्गामध्ये किंवा जेथे व्यक्तींच्या जिवितास, सुरक्षिततेला किंवा आरोग्याला धोका असेल अशा विशिष्ट प्रकारच्या श्रमाच्या कामावर [5][* * * स्त्रियांना लावण्यास मनाई करणे, त्यावर निर्बंध घालणे किंवा त्यांचे विनियमन करणे आणि अशा कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही एका वेळी वाहून न्यावयाच्या ओझ्याच्या वजनावर मर्यादा घालणे; ]

---

१. कोळसा खाण विनियम, १९५७ यांसाठी पहा—**भारताचे राजपत्र**, १९५७, भाग दोन, कलम ३, इंग्रजी पृष्ठ २५६९ आणि मेटॅलिफेरस खाण विनियम, १९६१ यांसाठी पहा—**भारताचे राजपत्र**, १९६१, भाग दोन, कलम ३ (एक) इंग्रजी पृष्ठ ३६०.

२. १९५९ चा अधिनियम, ६२, कलम ३१ द्वारे "व्यवस्थापकांचे वय" या मजकुराऐवजी हा मजकूर घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे खंड (ज्) ऐवजी घातला (१६ जानेवारी १९६० रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे खंड (ञ) ऐवजी घातला (१६ जानेवारी १९६०, रोजी व तेव्हापासून).

५. १९८३ चा अधिनियम, ४२, कलम ३० द्वारे वगळले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(ट्) एखाद्या खाणीत कामावर लावलेल्या व्यक्तींची सुरक्षितता, त्यांना खाणीत प्रवेश करता यावा व खाणीतून बाहेर पडता यावे यासाठी लागणारी साधने, किंवा पुरवण्यात यावयाचे कूपक किंवा निर्गममार्ग यांची संख्या आणि कूपक, खळगे, निर्गममार्ग, मळवाटा आणि खाचखळगे यांना कुंपण घालणे यासाठी उपबंध करणे ;

(ठ्) खाण मालकाकडून ज्यांना पगार देण्यात येतो आणि ज्या थेट खाण मालकाला किंवा व्यवस्थापकाला जबाबदार आहेत अशा व्यक्तींव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीला व्यवस्थापक म्हणून किंवा अन्य कोणत्याही विनिर्दिष्ट नात्याने खाणीत कामावर लावण्यास मनाई करणे;

[1][(ड्) खनिजांचे स्तंभ किंवा खंड यांची स्थाने निश्चित करणे, त्यांची देखभाल करणे आणि खनिजे काढणे किंवा त्यांचे क्षपण करणे, आणि दोन खाणींच्या मध्ये पुरेशी रोधके सुस्थितीत ठेवणे यांसह खाणीतील रस्ते व खाण कामाच्या जागांच्या सुरक्षिततेसाठी उपबंध करणे ;

(ढ्) खाणीतील खाणकामे आणि पक्की बंद केलेली आग क्षेत्रे यांचे निरीक्षण करणे, आणि समुद्राच्या किंवा कोणत्याही सरोवराच्या किंवा नदीच्या किंवा अन्य कोणत्याही पृष्ठीय जलाशयाच्या मग तो नैसर्गिक असो वा कृत्रिम असो—अथवा कोणत्याही सार्वजनिक रस्त्याच्या किंवा इमारतीच्या जवळपास खाणकामे करण्यावर निर्बंध घालणे आणि कोणत्याही खाणकामात पाणी किंवा अन्य द्रवपदार्थ उसळून येऊ नये किंवा त्याचा लोंढा आत घुसू नये किंवा आगीचा भडका उडू नये किंवा असे कोणतेही खाणकाम अकाली ढासळू नये म्हणून योग्य खबरदारी घेण्यास फर्मावणे ;]

(ण्) खाणीमधील वायुविजन आणि उत्स्फूर्त प्रज्वलन, भूपृष्ठाखाली आग लागणे, दगडी कोळशाची धूळ साचणे, या गोष्टींविरुद्ध घ्यावयाच्या खबरदारीसह धूळ, आग आणि ज्वालाग्राही व अपायकारक वायू यांच्या बाबतीत करावयाच्या कार्यवाहीसंबंधी उपबंध करणे ;

[2][(त्) "भारतीय वीज अधिनियम, १९१०" (१९१० चा ९) आणि त्याखाली केलेले कोणतेही नियम यांच्या उपबंधींच्या अधीनतेने, खाणीत विजेची निर्मिती, साठवण, रुपांतरण, पारेषण आणि वापर यांचे विनियमन करणे आणि खाणीतील सर्व विद्युत उपकरण संच, विद्युत केबल्स आणि त्यातील अन्य सर्व यंत्रसामग्री व संयंत्रे यांची निगराणी आणि त्यांच्या वापराचे विनियमन यांसाठी उपबंध करणे ; ]

(थ्) [3][सुरक्षिततेसाठी खाणीमध्ये यंत्रसामग्रीच्या वापराचे नियमन करणे, अशा यंत्र सामग्रीच्या किंवा तिच्या जवळ आणि मालवाहणी मार्गावर कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तींच्या सुरक्षिततेसाठी उपबंध करणे] आणि भूपृष्ठाखाली विवक्षित वर्गाची चलित्रे उपयोगात आणण्यावर निर्बंध घालणे ;

(द्) खाणीत योग्य प्रकाशव्यवस्थेसाठी उपबंध करणे आणि तेथे सुरक्षादीपांच्या वापराचे विनियमन करणे आणि सुरक्षादीपांचा वापर करण्यात येत असलेल्या खाणीत प्रवेश करणाऱ्या व्यक्तींची झडती घेणे ;

(ध्) खाणीत [4][ज्वालाग्राही वायू किंवा धूळ यांचे] स्फोट किंवा प्रज्वलन होणे किंवा पाणी उसळून येणे किंवा साचणे याविरुद्ध आणि त्यातून उद्भवणाऱ्या धोक्यांविरुद्ध उपबंध करणे आणि ज्या परिस्थितीत खनिजे काढण्याच्या परिणामी [4][खाणकाम] अकाली ढासळण्याची शक्यता असेल किंवा त्याच्या परिणामी [4][खाणकामे] ढासळण्याची किंवा खाणीमध्ये पाणी उसळून येण्याची किंवा प्रज्वलन होण्याची शक्यता असेल किंवा त्यात वाढ होईल अशा परिस्थितीत खनिजे काढण्यास मनाई करणे, त्यावर निर्बंध घालणे किंवा त्यांचे विनियमन करणे ;

(न्) [5][कलम २३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (छ्) अन्वये अपघातांचे प्रकार विहित करणे आणि खाणीचे मालक, अभिकर्ते आणि व्यवस्थापक यांनी द्यावयाच्या अपघातांच्या व धोकादायक घटनांच्या सूचना आणि खनिज उत्पादनकामावर लावण्यात आलेल्या व्यक्ती आणि विनियमांमध्ये उपबंध करण्यात आलेल्या अन्य बाबी यासंबंधी द्यावयाच्या नोटिसा, अहवाल, विवरणे विहित करणे] आणि अशा सूचनांचे, नोटिसांचे, विवरणांचे व अहवालांचे नमुने ते ज्यांना सादर करावयाचे त्या व्यक्ती व प्राधिकारी, त्यात अंतर्भूत करावयाचा तपशील आणि ते ज्या कालावधीच्या आत सादर करावयाचे तो कालावधी विहित करणे ;

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३१ द्वारे मूळ खंड (ड्) व (ढ्) ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे खंड (त्) ऐवजी घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३० द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३१ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

[१][ (प्) [२][खाणीचे मालक, अभिकर्ते आणि व्यवस्थापक यांनी ठेवावयाचे खाणीशी संबंधित आराखडे, छेद देखावे आणि क्षेत्रीय टिप्पण्या विहित करण्यासाठी खाणींच्या सीमा निश्चित करून घेण्यास त्यांना फर्मावणे] आणि असे आराखडे, छेद देखावे आणि क्षेत्रीय टिप्पण्या अभिलेखाच्या प्रयोजनासाठी अशा रीतीने आणि कोणत्या ठिकाणी अभिलेख म्हणून ठेवावयाच्या ते आणि त्यांच्या प्रती, मुख्य निरीक्षकास सादर करणे, विहित करणे, आणि त्यांना नव्याने सर्वेक्षणे आणि आराखडे करून घेण्यास फर्मावणे आणि त्यांनी त्याचे अनुपालन न केल्यास, अन्य कोणत्याही अभिकरणा-मार्फत सर्वेक्षण करवून घेणे व आराखडे बनवून घेणे आणि त्याचा खर्च जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणेच वसूल करणे ; ].

(फ्) खाणींमध्ये किंवा त्यांच्या जवळपास अपघात, किंवा अपघाती स्फोट किंवा प्रज्वलन झाल्यास [३][परिस्थिती प्रभावीपणे हाताळण्यासाठी] अनुसरावयाची कार्यपद्धती विनियमित करणे;

(ब्) खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक याने कलम १६ अन्वये द्यावयाच्या नोटिशीचा नमुना आणि त्यात अंतर्भूत करावयाचा तपशील विहित करणे;

(भ्) खाणकाम सुरू करण्यापूर्वी किंवा "भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०" (१८९० चा ९) याच्या उपबंधांच्या अधीनतेने, कोणत्याही रेल्वेपासून अथवा, [४][शासनाद्वारे किंवा प्रकरणपरत्वे कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाद्वारे देखभाल करण्यात येणाऱ्या कोणत्याही सार्वजनिक रस्त्यांपासून किंवा अन्य कामांपासून] [५][पंचेचाळीस मीटर्सच्या] आतील कोणत्याही ठिकाणापर्यंत खाणकाम विस्तारित करण्यापूर्वी खाणीच्या मालकाने, अभिकर्त्याने, किंवा व्यवस्थापकाने द्यावयाची नोटीस विहित करणे ;

(म्) कोणत्याही खाणीच्या बाबतीत खाणकाम बंद करण्यात येईल तेव्हा, शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण किंवा "भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०" (१८९० चा ९) यात केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेली रेल्वे कंपनी यामध्ये विहित असलेल्या संपत्तीचे हानीपासून संरक्षण करणे ;

[६][ (मम्) एखादी खाण बंद करण्यापूर्वी, त्या खाणीच्या मालकास, अभिकर्त्यास किंवा व्यवस्थापकास संरक्षक बांधकामे करण्यास फर्मावणे आणि त्यांनी, त्याचे अनुपालन न केल्यास, अशी बांधकामे अन्य कोणत्याही अभिकरणामार्फत करवून घेणे आणि त्याचा खर्च अशा मालकाकडून जमीन महसुलाच्या थकबाकीच्या वसुलीच्या रीतीने वसूल करणे ; ]

(य्) कोणतीही खाण किंवा खाणीचा भाग किंवा कोणताही दगडखाण, आनती, कूपक किंवा खड्डा किंवा निर्गममार्ग—मग तेथे खाणकाम चालू असो किंवा नसो—किंवा कोणतेही धोकादायक किंवा प्रतिषिद्ध क्षेत्र खाचखळगा, मालवाहणी, ट्राममार्ग किंवा मळवाट अशा ज्या-ज्या ठिकाणी जनतेच्या संरक्षणासाठी कुंपण घालणे आवश्यक असेल तेथे तेथे कुंपण घालण्यास फर्मावणे; आणि

(यय्) विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**केंद्र सरकारची नियम करण्याची शक्ती.**

५८. केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील**, अधिसूचनेद्वारे खाली नमूद केलेल्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी, या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करू शकेल :—

[७][ (क्) एखाद्या समितीच्या सदस्याचा पदावधी आणि त्यांच्यातील रिक्त स्थाने भरण्याची रीत यांसाठी उपबंध करणे आणि एखाद्या समितीने आपले कामकाज चालवताना अनुसरावयाच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणे ;]

(ख्) कलम २३ च्या पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोंदवहीचा नमुना विहित करणे ;

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३१ द्वारे खंड (प्) ऐवजी घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३० द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३१ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

६. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३१ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

७. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३१ द्वारे खंड (क्) ऐवजी घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(ग) कलम २४ अन्वये चौकशी न्यायालयाच्या नियुक्तीसाठी उपबंध करणे, अशा न्यायालयांची कार्यपद्धती आणि शक्ती यांचे विनियमन करणे, सदस्यांना प्रवास भत्ता प्रदान करणे आणि [1][चौकशीशी संबंधित असा अन्य कोणताही खर्च धरून] अशा न्यायालयांचा खर्च संबंधित खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक यांच्याकडून [2][जमीन महसुलाच्या थकबाकीच्या वसुलीच्या रीतीने] वसूल करणे;

[2][(गग) खाणीमध्ये कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तींच्यावतीने (खाण अवेक्षकापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा) एखाद्या तंत्रज्ञाकडून खाणीचे निरीक्षण, त्यासाठीच्या सुविधा, अशी निरीक्षणे कितीदा आणि कशा रीतीने करावयाची आणि अशा निरीक्षणांचे अहवाल ज्या रीतीने द्यावयाचे ती रीत यांसाठी उपबंध करणे;]

(घ) ज्या खाणीत कोणत्याही स्त्रियांना कामावर लावण्यात आले असेल किंवा मागील बारा महिन्यात कोणत्याही दिवशी कामावर लावण्यात आले होते त्या खाणीत अशा स्त्रियांच्या सहा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांच्या उपयोगासाठी योग्य खोल्या राखून ठेवण्यास फर्मावणे, आणि सरसकट किंवा खाणींत कामावर लावण्यात आलेल्या स्त्रियांच्या संख्येच्या विशिष्ट संदर्भात, खास करून अशा खोल्यांची संख्या व दर्जा आणि त्यात पुरवावयाच्या सुखसोयीचे स्वरूप व व्याप्ती व त्यावर करावयाची देखरेख विहित करणे; ]

(ङ) खाणीत कामावर लावण्यात आलेल्या पुरुषांच्या वापरासाठी तुषार स्नानाच्या सोयीसकट स्नानगृहे आणि कुलुपबंद खणांनी सुसज्ज असे कक्ष आणि जेथे स्त्रियांना कामावर लावण्यात आले असेल अशा खाणीत स्त्रियांच्या वापरासाठी तशीच आणि वेगळी स्नानगृहे व कक्ष, खाणीच्या तोंडाशी किंवा त्यांच्या जवळपास राखून ठेवण्यास फर्मावणे आणि सरसकट किंवा खाणीत सामान्यत: कामावर लावण्यात येणाऱ्या पुरुषांच्या किंवा स्त्रियांच्या संख्येच्या विशिष्ट संदर्भात अशा स्नानगृहांची व कक्षांची संख्या व दर्जा विहित करणे;

(च) खाणीत ठेवावयाच्या स्वच्छतेचा दर्जा काय असावा आणि तेथे किती शौचकूपांची व मुताऱ्यांची व्यवस्था करावयास हवी आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी करावयाचे उपबंध [3]* * * * या गोष्टी विहित करणे;

[4][(चच) वैद्यकीय उपकरणे व सुखसोयी पुरवण्याबाबत व त्या सुस्थितीत ठेवण्याबाबत उपबंध करणे, आणि प्रथमोपचार पेट्या व कपाटे यांतील वस्तू आणि अशा पेट्यांची व कपाटांची संख्या, प्रथमोपचाराचे प्रशिक्षण, प्रथमोपचार कक्षांचा आकार व त्यातील साधनसामग्री आणि ते कक्ष ताब्यांत असणारा कर्मचारी वर्ग आणि इजा झालेल्या व्यक्तींना रुग्णालयात किंवा दवाखान्यात पोचवण्याची व्यवस्था या गोष्टी विहित करणे;

(चचच) ज्या व्यक्तींना खाणीत पर्यवेक्षकीय किंवा व्यवस्थापकीय हुद्यावर नव्हे तर, अन्यथा कामावर लावण्यात आले असेल किंवा लावण्यात येणार असेल त्यांना व्यावहारीक शिक्षण किंवा प्रशिक्षण देण्यास फर्मावणे आणि अशा किंवा प्रशिक्षणाच्या योजना विहित करणे; ]

(छ) खाणीत मादक पेये किंवा औषधिद्रव्ये जवळ बाळगण्यास किंवा सेवन करण्यास, आणि कोणत्याही व्यक्तीने प्यायलेल्या अवस्थेत खाणीत प्रवेश करण्यास किंवा हजर राहण्यास मनाई करणे;

(ज) कलम ३६ अन्वये आवश्यक असलेल्या नोटिशीचे नमुने विहित करणे आणि अशा नोटिसा विनिर्दिष्ट भाषांतही लावण्यास फर्मावणे;

(झ) कलम ३७ च्या प्रयोजनार्थ कोणत्या व्यक्तींना पर्यवेक्षकीय किंवा व्यवस्थापकीय पदे धारण करणाऱ्या किंवा गोपनीय नात्याने नेमण्यात आलेल्या व्यक्ती समजण्यात येईल अशी त्यांची व्याख्या करणे;

(ञ) ज्यांनी वयाची पंधरा वर्षे पूर्ण केली आहे असे अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने प्रमाणित केले नसेल अशा व्यक्तींना किंवा अशा कोणत्याही व्यक्तीवर्गाला खाणीत कामावर लावण्यास मनाई करणे, आणि अशी प्रमाणपत्रे कशा रीतीने व कोणत्या परिस्थितीत देता किंवा प्रत्याहृत करता येतील ती रीत व परिस्थिती विहित करणे;

[5]* * * * *

[6][(टट) खाणींमध्ये कामावर लावण्यात आलेल्या किंवा नोकरीसाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना वैद्यकीय तपासणी करवून घेण्यास फर्मावणे आणि वैद्यकीय कारणांवरून एखाद्या व्यक्तीस खाणीत कामावर लावण्यास पूर्णपणे किंवा विशिष्ट पदापुरती किंवा विशिष्ट कामापुरती मनाई करणे;]

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३२ द्वारे हा मजकूर घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३१ द्वारे हा मजकूर घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३२ द्वारे विवक्षित शब्द वगळले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३२ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३१ द्वारे मूळ खंड (ट) वगळला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

६. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३२ द्वारे हा मजकूर घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

¹[ (ठ) कलम ४८ अन्वये आवश्यक असलेल्या नोंदवह्यांचा नमुना आणि सातव्या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ नोंदवह्या ठेवणे व त्यांचा नमुना या गोष्टी विहित करणे; ]

(ड) या अधिनियमाचे आणि विनियमांचे व नियमांचे गोषवारे आणि कलम ६१ व ६२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे असे गोषवारे आणि उपविधी कोणत्या भाषेत लावण्यात येतील ते विहित करणे;

(ढ) नियमांमध्ये ज्या कोणत्याही बाबींचा परामर्श घेण्यात आला असेल अशा बाबीसंबंधी खाणींच्या मालकांना, अभिकर्त्यांना किंवा व्यवस्थापकांना नोटिसा, विवरणे व अहवाल पाठवण्यास फर्मावणे आणि अशा नोटिसा, विवरणे व अहवाल यांचे नमुने, ते ज्यांना सादर करावयाचे त्या व्यक्ती आणि प्राधिकारी, त्यात अंतर्भूत करावयाचा तपशील आणि किती कालावधीच्या आत ते सादर करावयाचे तो कालावधी या गोष्टी विहित करणे;

(ण) जेथे सामान्यतः ²* * * पन्नासपेक्षा अधिक व्यक्ती कामावर लावण्यात येतात अशा खाणीमध्ये पिण्याच्या पाण्याच्या सोयीसह भोजनासाठी पुरेशा आणि योग्य निवाऱ्यांची सोय करण्यास व त्या जागा सुस्थितीत ठेवण्यास फर्मावणे;

(त) मुख्य निरीक्षकाने किंवा निरीक्षकाने याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या ज्या खाणीत सामान्यतः दोनशे पन्नास पेक्षा अधिक व्यक्ती कामावर लावण्यात येतात अशा कोणत्याही खाणीत अशा व्यक्तींच्या उपयोगासाठी आहारगृहाची किंवा आहारगृहांची सोय करण्यास आणि ती सुस्थितीत ठेवण्यास फर्मावणे;

(थ) ज्या खाणीत सामान्यतः पाचशे किंवा अधिक व्यक्ती कामावर लावण्यात येतात अशा प्रत्येक खाणीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे तितक्या कल्याण अधिकाऱ्यांना कामावर लावण्यास फर्मावणे आणि अशा कल्याण अधिकाऱ्यांच्या अर्हता आणि त्यांच्या अटी व शर्ती आणि त्यांनी बजावावयाची कर्तव्ये विहित करणे;

³[ (द) विनिर्दिष्ट खाणींसाठी किंवा विनिर्दिष्ट खाणींच्या गटांसाठी किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रातील सर्व खाणींसाठी बचाव केंद्रे स्थापन करण्यास फर्मावणे आणि ती केंद्रे अशी आणि कोणाकडून स्थापन करण्यात येतील ते विहित करणे;

(ध) बचाव केंद्रांच्या व्यवस्थापनांसाठी उपबंध करणे;

(धक) बचाव पथकांतील व्यक्तींच्या शारीरिक योग्यतेचा दर्जा आणि इतर अर्हता यांसाठी उपबंध करणे;

(धख) बचाव पथकांतील व्यक्तींच्या राहण्याच्या जागा विहित करणे; ]

(न) ⁴* * * बचाव केंद्रांचे स्थान, साधनसामग्री नियंत्रण सुस्थिती आणि कार्ये विहित करणे;

⁵[ (प) खंड (द) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या खाणींमध्ये उत्पादन करण्यात व तेथून बाहेर पाठवण्यात आलेला कोक आणि दगडी कोळसा यावर (दर मेट्रिक टनाला जास्तीत जास्त पंचवीस पैसे या दराने) उत्पादन शुल्क बसवणे व त्याची वसुली करणे, अशा खाणींसाठी एक बचाव केंद्र-निधी निर्माण करणे, संसदेद्वारे करण्यात आलेल्या कायद्याद्वारे रीतसर विनियोजन करण्यात आल्यानंतर केंद्र सरकार यासंबंधात उपबंध करील अशा भारताच्या एकत्रित निधीमध्ये जमा करण्यात आलेल्या या उपकराच्या उत्पन्नातील रकमा अशा निधीत जमा करणे, अशा निधीमधील पैशाचा विनियोग ज्या रीतीने करण्यात येईल ती रीत आणि अशा निधीचे प्रशासन यासाठी उपबंध करणे; ]

(फ) बचाव पथकांची रचना, प्रशिक्षण घडण आणि कर्तव्ये यांबाबत ⁶* * * * ⁷* * * * आणि सर्वसाधारणपणे खाणींतील बचाव कार्य करण्याबाबत उपबंध करणे;

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३२ द्वारे मूळ खंड (ठ) ऐवजी घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३२ द्वारे वगळले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३१ द्वारे मूळ खंड (द) व (ध) यांऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे हा शब्द वगळला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे मूळ खंड (प) ऐवजी घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे विवक्षित शब्द वगळले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे 'आणि' हा शब्द वगळला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

¹[(फफ्) विनिर्दिष्ट खाणी किंवा विनिर्दिष्ट खाणींचे गट यांच्यामध्ये किंवा एखाद्या विनिर्दिष्ट क्षेत्रातील सर्व खाणींमध्ये सुरक्षिततेच्या संवर्धनासाठी सुरक्षा समित्या संस्थापित करणे आणि त्यांची घडण, अशा सुरक्षा समित्या बनवण्याची रीत व त्यांची कार्ये विहित करणे यासाठी उपबंध करणे; आणि]

(ब्) सर्वसाधारणपणे ज्या बाबीसाठी या अधिनियमाद्वारे किंवा विनियमाद्वारे उपबंध करण्यात आलेला नसेल परंतु या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी त्याबाबत उपबंध करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही बाबीसाठी उपबंध करणे.

**५९.** (१) कलम ५७ आणि ५८ यांद्वारे प्रदान करण्यात आलेली अनुक्रमे विनियम आणि नियम करण्याची शक्ती ही विनियम आणि नियम हे पूर्व प्रकाशनानंतर करण्यात येतील या शर्तीच्या अधीन आहे. **विनियम आणि नियम यांचे पूर्व-प्रकाशन.**

(२) जे विनियम किंवा नियम करण्याचे योजले असेल त्यांचा मसुदा ज्या तारखेनंतर विचारात घेण्यात येईल अशी तारीख म्हणून "सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७" (१८९७ चा १०) यातील कलम २३ च्या खंड (३) अन्वये विनिर्दिष्ट करावयाची तारीख ही प्रस्तावित विनियमांचा किंवा नियमाचा मसुदा ज्या तारखेस जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करण्यात आला असेल त्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आतील असणार नाही.

²* * * * * * *

³[(४) कोणत्याही विनियमाचा किंवा नियमाचा मसुदा कलम १२ च्या पोटकलम (१) अन्वये घटित करण्यात आलेल्या समितीकडे निर्देशित करण्यात आल्याशिवाय, आणि त्या समितीला असा विनियम किंवा नियम करणे समयोचित आहे किंवा कसे याविषयी आणि त्याच्या उपबंधाच्या योग्यायोग्यतेविषयी आपला अभिप्राय व्यक्त करण्याची वाजवी संधी मिळाली असल्याशिवाय असा कोणताही विनियम किंवा नियम करण्यात येणार नाही.]

(५) विनियम आणि नियम शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येतील, आणि अशा प्रकाशनानंतर, जणू काही ते या अधिनियमात अधिनियमित असल्याप्रमाणे परिणामक होतील.

(६) कलम ५८ च्या खंड (घ्) किंवा खंड (ङ्) मध्ये निर्दिष्ट केलेले नियम प्रथमच करण्यात आले असतील त्याप्रसंगी पोटकलम (१), (२) आणि (४) यांचे उपबंध लागू होणार नाहीत.

⁴* * * * * * *

**६०.** कलम ५९ ची पोटकलमे (१), (२) आणि ⁵[(४)] यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आशंकित धोका टाळण्यासाठी किंवा धोका निर्माण करण्याचा संभव असणाऱ्या परिस्थितीत सत्वर सुधारणा करण्यासाठी, असे विनियम करताना, ते अशा रीतीने प्रकाशित करण्यामुळे आणि विचारार्थ पाठवण्यामुळे जो विलंब होईल तो टाळणे आवश्यक आहे अशी केंद्र सरकारची खात्री पटली असेल तर, पूर्व प्रकाशनाशिवाय आणि ⁶[कलम १२ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेल्या समितीकडे] ⁷* * * * निर्देशित न करता कलम ५७ ⁸* * * अन्वये विनियम करता येतील : **पूर्वप्रकाशनाशिवाय विनियम करण्याची शक्ती.**

परंतु, अशा रीतीने करण्यात आलेले कोणतेही विनियम ⁹[माहितीसाठी उक्त समितीकडे पाठवण्यात येतील आणि] ते करण्यात आल्यापासून ¹⁰[एक वर्ष] यापेक्षा अधिक काळ अंमलात राहणार नाहीत.

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३१ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).
२. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३३ द्वारे मूळ पोटकलम (३) वगळले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).
३. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३२ द्वारे पोटकलम (४) ऐवजी घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम ३२ द्वारे पोटकलम (७) वगळले (३१ मे, १९८४ रोजी, व तेव्हापासून).
५. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).
६. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).
७. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३४ द्वारे वगळले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).
८. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे वगळले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).
९. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३३ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).
१०. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

उपविधी. ६१. (१) खाणीतील अपघात टाळण्यासाठी आणि खाणीत कामाला लावलेल्या व्यक्तींची सुरक्षितता, सोय आणि शिस्त यासंबंधी तरतूद करण्यासाठी खाणीच्या मालकास, अभिकर्त्यास किंवा व्यवस्थापकास जे उपविधी आवश्यक वाटतील अशा या अधिनियमाशी किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या [१][एखाद्या विवक्षित यंत्रसामग्रीचा वापर किंवा खाणीमध्ये काम करण्यासाठी एखाद्या विवक्षित पद्धतीचा अंगिकार या बाबींचे नियमन करणाऱ्या] कोणत्याही विनियमांशी किंवा नियमांशी विसंगत नसतील अशा उपविधीचा मसुदा अशा मालकाला, अभिकर्त्याला किंवा व्यवस्थापकाला तयार करता येईल आणि मुख्य निरीक्षकाने किंवा निरीक्षकाने तसा आदेश दिला असेल तर तो तयार करील व तो मुख्य निरीक्षकास किंवा निरीक्षकास सादर करील.

(२) अशा कोणत्याही मालकाने, एजंटाने किंवा व्यवस्थापकाने—

(क) मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक यांच्याकडून तसा आदेश देण्यात आल्यानंतर दोन महिन्यांच्या आत उपविधीचा मसुदा सादर करण्यात कसूर केली तर, किंवा

(ख) मुख्य निरीक्षकाच्या किंवा निरीक्षकाच्या मते जो पुरेसा नसेल अशा उपविधींचा मसुदा सादर करील तर,

मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक—

(एक) त्याला स्वतःला पुरेसा वाटेल असा उपविधींचा मसुदा प्रस्तावित करू शकेल; किंवा

(दोन) मालकाने, अभिकर्त्याने किंवा व्यवस्थापकाने त्याला सादर केलेल्या कोणत्याही मसुद्यात ज्यायोगे त्याच्या मते तो मसुदा पुरेसा होईल अशा दुरुस्त्या प्रस्तावित करू शकेल, आणि तो, अशा उपविधींचा मसुदा किंवा दुरूस्त्यांचा मसुदा मालकाकडे, अभिकर्त्याकडे किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापकाकडे विचारार्थ पाठवील.

(३) पोटकलम (२) च्या उपबंधान्वये मुख्य निरीक्षकाने कोणत्याही उपविधींचा मसुदा किंवा दुरुस्त्यांचा मसुदा मालकांकडे, अभिकर्त्यांकडे, किंवा व्यवस्थापकाकडे ज्या तारखेस पाठवला असेल त्या तारखेपासून दोन महिन्यांच्या कालावधीच्या आत मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक आणि मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक यांचे पोटकलम (१) अन्वये करावयाच्या उपविधीतील उपबंधासंबंधी सहमती होऊ शकत नसेल तर, मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक उपविधींचा मसुदा तडजोडीसाठी, [१][कलम १२ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेल्या समितीकडे] पाठवील.

(४) (क) अशा उपविधींच्या मसुद्याबाबत मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक आणि मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक यांच्यात सहमती झाली असेल तेव्हा, किंवा त्यांच्यात सहमती न होऊ शकल्यामुळे [१][कलम १२ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेल्या समितीने] त्याबाबत तडजोड केली असेल तेव्हा मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक अशा उपविधींच्या मसुद्याची एक प्रत मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे पाठवील.

(ख) केंद्र सरकार उपविधींच्या मसुद्यात त्याला योग्य वाटतील असे फेरबदल करू शकेल.

(ग) केंद्र सरकारने उपविधींच्या मसुद्याला फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय मान्यता देण्यापूर्वी उपविधी करण्याचा प्रस्ताव उपविधींच्या मसुद्याच्या प्रती जेथून मिळवता येतील ते ठिकाण, आणि ज्यांच्यावर त्या उपविधींचा परिणाम होणार असेल त्या व्यक्तींकडून किंवा त्यांच्या वतीने उपविधींच्या मसुद्याच्या संदर्भात कोणतेही आक्षेप घेण्यात आले असल्यास ते किती मुदतीच्या आत (अशी मुदत तीस दिवसांपेक्षा कमी असणार नाही) केंद्र सरकारकडे पाठवण्यात आले पाहिजेत त्यासंबंधीची नोटीस संबंधित व्यक्तींना माहिती देण्यासाठी केंद्र सरकारला सर्वाधिक अनुकुल वाटेल अशा रीतीने प्रकाशित करण्यात येईल.

(घ) प्रत्येक आक्षेप लेखी असेल आणि त्यात पुढील गोष्टी नमूद असतील—

(एक) आक्षेपांची विनिर्दिष्ट कारणे, आणि

(दोन) ज्या गोष्टी वगळाव्या ज्यांची भर घालावी किंवा जे फेरबदल करण्यात यावे अशी मागणी असेल त्या गोष्टी.

(ङ) केंद्र सरकार, ज्या व्यक्तींवर उपविधींचा परिणाम होतो असे त्यास वाटेल अशा व्यक्तींकडून किंवा त्यांच्या वतीने, आवश्यक मुदतीच्या आत घेण्यात आलेल्या कोणत्याही आक्षेपावर विचार करील, आणि अशा उपविधींना ते ज्या स्वरूपात प्रकाशित करण्यात आले असतील त्या स्वरूपात किंवा त्यात त्याला योग्य वाटतील अशा दुरुस्त्या केल्यानंतर मान्यता देऊ शकेल.

(५) केंद्र सरकारकडून अशा रीतीने उपविधींना मान्यता देण्यात आल्यानंतर जणूकाही ते या अधिनियमात अधिनियमित करण्यात आले असल्याप्रमाणे परिणामक होतील, आणि खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक उपविधींची इंग्रजीतील आणि विहित करण्यात येईल अशा अन्य भाषेतील किंवा भाषांतील प्रत, कामावर लावलेल्या व्यक्तींना ज्या ठिकाणी ते उपकायदा सोईस्करपणे वाचता

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३४ द्वारे विवक्षित शब्दाऐवजी हे शब्द घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

किंवा पाहता येतील, अशा खाणीतील किंवा जवळपासच्या एखाद्या ठळक ठिकाणी लावण्याची व्यवस्था करील; आणि जेव्हा जेव्हा अशी प्रत खराब होईल, पुसट होईल किंवा नष्ट होईल तेव्हा तेव्हा शक्य तितक्या वाजवी त्वरेने ती नव्याने लावण्याची व्यवस्था करील.

(६) केंद्र सरकार, लेखी आदेशाद्वारे, अशा रीतीने केलेला कोणताही उपविधी पूर्णतः किंवा अंशतः विखंडित करू शकेल आणि त्यानंतर असा उपविधी तद्नुसार परिणामक होणार नाही.

[१][६१क. कलम ५७ अन्वये करण्यात आलेला प्रत्येक विनियम, कलम ५८ अन्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम आणि कलम ६१ अन्वये करण्यात आलेला प्रत्येक उपविधी, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी त्या विनियमात, नियमात किंवा उपविधीत कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो विनियम, नियम किंवा उपविधीत करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो विनियम, नियम किंवा उपविधी अशा फेरबदल केलेल्या रुपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या विनियमान्वये, नियमान्वये किंवा, प्रकरणपरत्वे, उपविधीन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.] विनियम, नियम आणि उपविधी संसदेसमोर ठेवणे.

६२. प्रत्येक खाणीत किंवा तिच्या जवळपास इंग्रजीमध्ये किंवा विहित करण्यात येईल अशा अन्य भाषेत किंवा भाषांमध्ये अधिनियमांचे आणि विनियमांचे व नियमांचे विहित गोषवारे लावून ठेवण्यात येतील. अधिनियम, विनियम इत्यादींतील गोषवारे लावून ठेवणे.

## प्रकरण नऊ

## शास्ती आणि कार्यपद्धती

६३. (१) जो कोणी, मुख्य निरीक्षकाला, निरीक्षकाला किंवा कलम ८ अन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला ती या अधिनियमान्वये आपली कर्तव्ये पार पाडत असताना त्यात अडथळा आणील अथवा मुख्य निरीक्षकाला, निरीक्षकाला किंवा अशा व्यक्तीला कोणत्याही खाणीच्या संबंधात या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्राधिकृत असल्याप्रमाणे कोणताही प्रवेश, निरीक्षण, तपासणी किंवा चौकशी करण्यासाठी कोणत्याही वाजवी सोयी उपलब्ध करून देण्याचे नाकारील किंवा त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करील तिला तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल तितक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील. अडथळा आणणे.

(२) जो कोणी, या अधिनियमानुसार ठेवण्यात आलेल्या कोणत्याही नोंदवह्या किंवा अन्य दस्तऐवज मुख्य निरीक्षकाने किंवा निरीक्षकाने मागणी केली असता प्रस्तुत करण्याचे नाकारील अथवा या अधिनियमाखालील आपल्या कर्तव्यांच्या अनुषंगाने काम करणाऱ्या निरीक्षक अधिकाऱ्यासमोर उपस्थित राहण्यात किंवा त्यांच्याकडून तपासणी करवून घेण्यास कोणत्याही व्यक्तीला प्रतिबंध करील किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्यामुळे तसा प्रतिबंध होण्याची शक्यता आहे असे त्यास सकारण वाटत असेल असे कोणतेही कृत्य करील त्यास तीनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

६४. जो कोणी— खोटे अभिलेख करणे इत्यादी.

(क) या अधिनियमान्वये देण्यात आलेले कोणतेही प्रमाणपत्र किंवा एखाद्या प्रमाणपत्राची कोणतीही अधिकृत प्रत नकली तयार करील किंवा त्यात जाणूनबुजून एखादे खोटे विधान करील, किंवा

(ख) असे कोणतेही नकली किंवा खोटे प्रमाणपत्र जाणूनबुजून अस्सल प्रमाणपत्र म्हणून वापरील, अथवा

(ग) कोणतेही खोटे अधिकथन, विधान किंवा पुरावा खोटा आहे हे माहित असूनही, आपल्या स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी या अधिनियमान्वये एखादे प्रमाणपत्र मिळवण्याच्या, किंवा प्रमाणपत्राचे नूतनीकरण करून घेण्याच्या किंवा एखाद्या खाणीत कोणतीही नोकरी मिळवण्याच्या प्रयोजनार्थ करील किंवा प्रस्तुत करील किंवा वापरील, अथवा,

[२][(घ) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये ठेवणे आवश्यक असेल असा कोणताही आराखडा, छेददेखावा, नोंदवही किंवा अभिलेख खोटेपणाने तयार करील किंवा असा खोटा आराखडा, छेददेखावा, नोंदवही किंवा अभिलेख तो खोटा असल्याचे माहित असूनही तो कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे प्रस्तुत करील, अथवा]

---

१. १९८३ चा अधिनियम ४२ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३५ द्वारे मूळ खंड (घ) ऐवजी घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

(इ) जे विधान नोंद किंवा तपशील त्याच्या स्वतःच्या सर्वोत्तम माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरे नाही ते अंतर्भूत असणारा कोणताही आराखडा, विवरण, नोटीस, अभिलेख किंवा अहवाल तयार करील, देईल किंवा पोचता करील,

त्यास तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [1][एक हजार रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

खोटया योग्यता प्रमाणपत्राचा उपयोग.

६५. जो कोणी [2][कलम ४३] अन्वये दुसऱ्या व्यक्तीला देण्यात आलेले एखादे योग्यता प्रमाणपत्र, त्या कलमान्वये त्याला स्वतःला देण्यात आलेले प्रमाणपत्र म्हणून जाणूनबुजून वापरील किंवा वापरण्याचा प्रयत्न करील, अथवा त्या कलमान्वये त्याला स्वतःला योग्यता प्रमाणपत्र देण्यात आले असताना दुसऱ्या व्यक्तीला जाणूनबुजून त्याचा फक्त वापर करू देईल किंवा तिला तसा प्रयत्न करू देईल त्यास एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [3][दोनशे] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

आराखडे, इत्यादी पुरविण्यात टाळाटाळ करणे.

६६. जी व्यक्ती, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये जो तयार, करणे किंवा पुरवणे आवश्यक असेल असा कोणताही आराखडा, [4][छेददेखावा], विवरण, नोटीस, नोंदवही, अभिलेख किंवा अहवाल विहित नमुन्यात किंवा विहित रीतीने किंवा विहित वेळी किंवा विहित मुदतीत तयार करण्यात किंवा सादर करण्यात वाजवी सबबीशिवाय जिच्या शाबितीचा भार तिच्यावर राहील— टाळाटाळ करील अशा कोणत्याही व्यक्तीला [5][एक हजार] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

कामगारांना कामावर लावण्यासंबंधीच्या उपबंधाचे व्यतिक्रमण.

६७. जो कोणी एखाद्या खाणीत किंवा तिच्या जवळपास व्यक्तींना कामाला लावण्यास किंवा त्यांनी तेथे उपस्थित राहण्यास मनाई करणाऱ्या, त्यावर निर्बंध घालणाऱ्या किंवा त्याचे विनियमन करणाऱ्या, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमाच्या, नियमाच्या किंवा उपविधीच्या किंवा कोणत्याही आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे, कलम ३८ द्वारे अनुज्ञात आहे त्याव्यतिरिक्त एरव्ही व्यतिक्रमण करील त्यास, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [6][एक हजार] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही [7]* * * शिक्षा दिल्या जातील.

अठरा वर्षे वयाखालील व्यक्तींना कामावर लावण्याबद्दल शास्ती.

[8][६८. जिचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी आहे अशा एखाद्या व्यक्तीला, कलम ४० चे व्यतिक्रमण करून एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आले असेल तर, अशा खाणीच्या मालकास, अभिकर्त्यास किंवा व्यवस्थापकास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.]

व्यवस्थापकाची नियुक्ती करण्यात कसूर.

६९. जो कोणी, कलम १७ च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करून व्यवस्थापकाची नियुक्ती करण्यात कसूर करील, त्यास तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [9][दोन हजार पाचशे] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही [10]* * * शिक्षा दिल्या जातील.

अपघाताची सूचना.

७०. (१) जो कोणी, कलम २३ च्या पोटकलम (१) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करून अपघाती घटनेची सूचना देण्यात किंवा त्या पोटकलमात निर्दिष्ट केलेल्या विशेष सूचना फलकावर सूचनेची प्रत लावण्यात आणि ती विनिर्दिष्ट कालावधीपर्यंत त्या सूचनाफलकावर ठेवण्यात कसूर करील त्यास तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३५ द्वारे "पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३६ द्वारे "कलम ४०" याऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३६ द्वारे "पन्नास" या ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे "दोनशे" या ऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ३८ द्वारे "पाचशे" याऐवजी घातला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ३८ द्वारे विवक्षित शब्द वगळले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

८. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३७ द्वारे मूळ कलम ६८ ऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

९. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ३९ द्वारे "पाचशे" याऐवजी घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

१०. वरील अधिनियमाच्या कलम ३९ द्वारे विवक्षित शब्द वगळले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

(२) जो कोणी, कलम २३ च्या पोट-कलम (३) अन्वये केंद्र सरकाने दिलेल्या निदेशाचे व्यतिक्रमण करून विहित नोंदवहीत कोणत्याही अपघाती घटनेची नोंद करण्यात किंवा सूचना देण्यात कसूर करील त्यास तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

७१. ज्यावेळी एखाद्या खाणीच्या मालकाने, अभिकर्त्याने किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापकाने या अधिनियमाखालील एखाद्या गुन्ह्याच्या बाबतीत त्या खाणीत किंवा खाणीच्या जवळपास कामावर लावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध या अधिनियमान्वये कार्यवाही सुरू केली असेल त्यावेळी तो न्यायालयीन निर्णयाच्या किंवा आदेशाच्या तारखेपासून एकवीस दिवसांच्या आत त्या निकालाबाबत मुख्य निरीक्षकाला कळवील. मालक, इत्यादींनी विवक्षित प्रकरणांत मुख्य निरीक्षकास अहवाल देणे.

७२. खाणीत कामावर लावण्यात आलेली कोणतीही व्यक्ती— खाणीत कामावर लावलेल्या व्यक्तींची आबंधणे.

(क) खाणीत कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तींचे आरोग्य, सुरक्षितता किंवा कल्याण सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी खाणीत उपलब्ध करून दिलेल्या उपकरणांमध्ये, सोयींमध्ये किंवा अन्य गोष्टींमध्ये बुद्धिपुरस्सर हस्तक्षेप करणार नाही किंवा त्यांचा गैरवापर करणार नाही;

(ख) तिला स्वतःला किंवा इतरांना धोका निर्माण होण्याचा संभव असेल अशी कोणतीही गोष्ट बुद्धिपुरस्सर आणि वाजवी कारणाशिवाय करणार नाही ;

(ग) खाणीत कामावर लावण्यात आलेल्या आरोग्य किंवा सुरक्षितता सुनिश्चत करण्याच्या प्रयोजनासाठी खाणीत उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही उपकरणाचा किंवा अन्य गोष्टींचा वापर करण्याकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करणार नाही.

[१][७२क. जो कोणी, कलम ५७ चे खंड (घ), (झ), (ड), (ढ), (ण), (त), (द), (ध) आणि (प) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबंधित अशा कोणत्याही विनियमाच्या किंवा कोणत्याही उपविधीच्या किंवा तद्न्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे, कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील, त्यास सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील. विनियमांच्या विवक्षित व्यतिक्रमणाबद्दल विशेष उपबंध.

७२ख. जो कोणी, कलम २२ च्या पोट-कलम (१क), पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) [२][किंवा कलम २२क च्या पोट-कलम (२)] अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे व्यतिक्रमण करून खाणीत काम करणे चालू ठेवील त्यास दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल आणि तो पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडासही पात्र ठरेल : कलम २२ खालील आदेशांच्या व्यतिक्रमणाबद्दल विशेष उपबंध.

[२][परंतु, न्यायालयाने आपल्या निर्णयामध्ये लेखी अभिलिखित करावयाच्या एतद्विरुद्धच्या विशेष आणि पुरेशा कारणाच्या अभावी, असा द्रव्यदंड हा दोन हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.]

७२ग. (१) जे कोणी, या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही विनियमाच्या, नियमाच्या किंवा उपविधीच्या किंवा तद्न्वये देण्यात आलेल्या [कलम २२ च्या पोट-कलम (१क) किंवा पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) [३][किंवा कलम २२क च्या पोट-कलम (२) अन्वये देण्यात आलेल्या आदेशाहून अन्य]] कोणत्याही आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील त्यास— धोकादायक परिणाम होतील अशा रीतीने कायद्याचे व्यतिक्रमण करण्याबाबत विशेष उपबंध.

(क) जर अशा व्यतिक्रमणाच्या परिणामी जीवित हानी झाली असेल तर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील ; किंवा

(ख) जर अशा व्यतिक्रमणाच्या परिणामी गंभीर शारीरिक इजा झाली असेल तर, एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील ; किंवा

(ग) जर अशा व्यतिक्रमणामुळे, खाणीत कामावर लावण्यात आलेल्या व्यक्तींना किंवा खाणीत किंवा खाणीच्या जवळपास असलेल्या अन्य व्यक्तींना अन्यथा इजा पोचली असेल किंवा धोका निर्माण झाला असेल तर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील :

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ४० द्वारे कलमे ७३ व ७४ याऐवजी घातले (१६ जानेवारी १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३८ द्वारे घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३९ द्वारे घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

[१][परंतु, न्यायालयाने असल्या निर्णयामध्ये लेखी अभिलिखित करावयाच्या एतद्‌विरुद्धच्या विशेष आणि पुरेशा कारणाच्या अभावी, खंड (क) मध्ये निर्दिष्ट व्यतिक्रमणांच्या प्रकरणी असा द्रव्यदंड हा, तीन हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.]

(२) या कलमांन्वये सिसदोष ठरवण्यात आलेल्या व्यक्तीला पुन्हा त्याच कलमान्वये सिद्धदोष ठरवण्यात येईल तेव्हा, त्या व्यक्तीस पोट-कलम (१) मध्ये उपबंधित केलेल्या शिक्षेच्या दुप्पट शिक्षा दिली जाईल.

(३) या कलमान्वये द्रव्यदंडाची शिक्षा देणारे अथवा अपीलांती, पुनरीक्षणान्ती किंवा अन्यथा कायम करणारे कोणतेही न्यायालय न्यायनिर्णय देताना वसूल करावयाचा दंड संपूर्णतः किंवा त्याचा कोणताही भाग, इजा झालेल्या व्यक्तीला, किंवा ती मरण पावली असेल तर, तिच्या वैध प्रतिनिधीला भरपाई म्हणून देण्याविषयी आदेश देऊ शकेल :

परंतु, जे प्रकरण अपिलाधीन असेल अशा प्रकरणात द्रव्यदंड बसवण्यात आला असेल तर, अपील सादर करण्यासाठी अनुज्ञेय असलेला कालावधी पूर्ण होण्यापूर्वी, किंवा अपील सादर करण्यात आले असेल तर, अपिलाच्या निर्णयापूर्वी असे कोणतेही प्रदान करण्यात येणार नाही.

**आदेशभंगाबाबत सर्वसाधारण उपबंध.** ७३. जो कोणी, या अधिनियमाच्या किंवा कोणताही विनियम, नियम किंवा उपविधी याच्या किंवा तद्न्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील व यात यापूर्वी त्याबद्दल कोणताही शास्तीचा उपबंध करण्यात आलेला नसेल तर, त्यास तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

**आधीच्या दोषसिद्धी-नंतर वाढीव शास्ती.** ७४. ज्या व्यक्तीस, कोणत्याही पूर्वगामी उपबंधान्वये (कलम ७२ख आणि ७२ग सोडून अन्य) शिक्षापात्र असलेल्या एखाद्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवण्यात आले असेल तिला आधीच्या दोषसिद्धी-पासून दोन वर्षांच्या आत केलेल्या आणि त्याच उपबंधाचे व्यतिक्रमण अंतर्भूत असलेल्या अपराधाबद्दल पुन्हा सिद्धदोष ठरवण्यात आले असेल तर, नंतरच्या प्रत्येक दोषसिद्धीअंती, अशा उपबंधाच्या पहिल्या व्यतिक्रमणासाठी ती, ज्या शिक्षेस पात्र ठरली असती त्या शिक्षेच्या दुप्पट शिक्षा दिली जाईल.]

**मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक यांच्यावर खटला.** ७५. मुख्य निरीक्षक किंवा जिल्हा दंडाधिकारी किंवा मुख्य निरीक्षकाने याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे प्राधिकृत केलेला निरीक्षक यांच्या सांगण्यावरून असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल कोणताही मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक याच्या विरुद्ध खटला दाखल करण्यात येणार नाही :

[२][परंतु असे की, मुख्य निरीक्षक किंवा जिल्हा दंडाधिकारी किंवा अशा प्रकारे प्राधिकृत करण्यात आलेला निरीक्षक, असा खटला दाखल करण्यापूर्वी, मालकाने, अधिकर्त्याने किंवा व्यवस्थापकाने असा अपराध घडू नये म्हणून वाजवी तत्परता दाखवण्यात कसूर केली होती याबद्दल स्वतःची खात्री करून घेईल :]

[३][परंतु आणखी असे की] एखाद्या खाणीचे तांत्रिक निदेशन आणि व्यवस्थापन करण्याच्या ओघात करण्यात आलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत, जिल्हा दंडाधिकारी मुख्य निरीक्षकाच्या पूर्वमान्यते-शिवाय मालकाविरूद्ध, अभिकर्त्याविरूद्ध किंवा व्यवस्थापकाविरूद्ध कोणताही खटला दाखल करणार नाही.

[४][**विवक्षित प्रकरणात मालक कोण ते ठरवणे.** ७६. जेव्हा एखाद्या खाणीचा मालक म्हणजे एखादी भागीदारी संस्था किंवा माणसांचा अन्य संघ असेल तेव्हा, त्याचे सर्व भागीदार किंवा त्यांच्यापैकी कोणतेही भागीदार किंवा तिचे सदस्य अथवा जेव्हा एखाद्या खाणीचा मालक म्हणजे एखादी कंपनी असेल तेव्हा, तिचे सर्व संचालक किंवा त्यांच्यापैकी कोणतेही संचालक, अथवा जेव्हा एखाद्या खाणीचा मालक म्हणजे एखादे शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण असेल तेव्हा, अशा शासनाने किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाने खाणीच्या कामकाजाची व्यवस्था पाहण्यासाठी प्राधिकृत केलेले सर्व अधिकारी किंवा त्यांच्यापैकी कोणतेही अधिकारी किंवा व्यक्ती, यांवर ज्या अपराधाबद्दल एखाद्या खाणीचा मालक शिक्षेस पात्र असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल या अधिनियमान्वये खटला भरता येईल आणि त्यांना शिक्षा देता येईल.

[५][परंतु, जेव्हा भागीदारी संस्थेने, संघाने किंवा कंपनीने मुख्य निरीक्षकाला अशी लेखी नोटीस दिलेली असेल की, तिने—

(क) भागीदारी संस्थेच्या बाबतीत, तिच्या भागीदारांपैकी कोणत्याही भागीदारांना किंवा व्यवस्थापकांना;

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ३८ द्वारे घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).
२. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).
४. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ४१ द्वारे कलम ७६ ऐवजी घातले (१६ जानेवारी १९६० रोजी व तेव्हापासून).
५. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ४१ द्वारे मूळ परंतुकाऐवजी घातले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

(ख्) संघाच्या बाबतीत, त्याच्या सदस्यांपैकी कोणत्याही सदस्यांना किंवा व्यवस्थापकांना;

(ग्) कंपनीच्या बाबतीत, तिच्या संचालकांपैकी कोणत्याही संचालकांना किंवा व्यवस्थापकांना;

तो प्रत्येक बाबतीत, ज्या ठिकाणास हा अधिनियम लागू होतो अशा कोणत्याही ठिकाणाचा रहिवासी असेल त्या बाबतीत, अशा भागीदारी संस्थेच्या, संघाच्या किंवा कंपनीच्या व्यवस्थापनाचा प्रभार वस्तुत: ज्याच्यावर असेल किंवा जो त्यामध्ये सर्वाधिक शेअर्स धारण करीत असेल त्याला या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी खाण मालकाची जबाबदारी धारण करण्यास नामनियुक्त केले आहे, तेव्हा असा भागीदार, सदस्य किंवा प्रकरणपरत्वे, संचालक जोपर्यंत अशा रीतीने तेथे राहील आणि उपरोक्तप्रमाणे प्रभारी किंवा सर्वाधिक शेअर्स धारण करीत राहील तोपर्यंत तो, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्या खाणीचा मालक असल्याचे समजण्यात येईल,—मात्र त्याची नामनियुक्ती रद्द करणारी किंवा तो भागीदार, सदस्य किंवा, प्रकरणपरत्वे, संचालक म्हणून राहिलेला नाही असे नमूद करणारी लेखी नोटीस मुख्य निरीक्षकाला मिळाली असेल तर गोष्ट अलाहिदा.

**स्पष्टीकरण.**—जेथे एखाद्या भागीदारी पेढीच्या, संघाच्या किंवा कंपनीच्या विविध आस्थापना किंवा शाखा असतील किंवा कोणत्याही आस्थापनेची किंवा शाखेची वेगवेगळी युनिटे असतील तेथे वेगवेगळ्या आस्थापना किंवा शाखा किंवा युनिटे यांच्या संबंधात या परंतुकान्वये निरनिराळ्या व्यक्तींना नामनियुक्त करता येईल आणि अशा रीतीने नामनियुक्त करण्यात आलेली व्यक्ती ही, ज्या आस्थापनेच्या, शाखेच्या किंवा युनिटांच्या संबंधात नामनियुक्त करण्यात आली असेल केवळ त्याच आस्थापनेच्या, शाखेच्या किंवा युनिटांच्या संबंधात नामनियुक्त करण्यात आली असेल केवळ त्याच आस्थापनेच्या, शाखेच्या किंवा युनिटाच्या बाबतीत, त्या खाणीची मालक असल्याचे मानण्यात येईल.]]

विवक्षित प्रकरणांत मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक यास दायित्वातून सूट.

७७. या अधिनियमान्वये एखाद्या अपराधाचा आरोप असलेली एखाद्या खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक अन्य व्यक्ती खरी अपराधी आहे असे अभिकथन करील तेव्हा, त्याने याबाबत तक्रार केल्यावर [1][आणि त्याने खऱ्या अपराध्याचा माहीत असलेला पत्ता पुरवल्यावर] आणि आपला तसे करण्याचा उद्देश असल्याबद्दल अभियोक्त्याला किमान तीन पूर्ण दिवसांची लेखी नोटीस दिल्यावर त्या अन्य व्यक्तीला प्रकरणाच्या सुनावणीसाठी नियत केलेल्या दिवशी न्यायालयासमोर आणवले जाण्याचा हक्क असेल, आणि जर, अपराध केल्याचे शाबीत झाल्यानंतर, खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापक याने न्यायालयाची खात्री पटेल अशा रीतीने पुढील गोष्टी सिद्ध केल्या—

(क्) या अधिनियमाच्या संबद्ध उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी आपण वाजवी तत्परता दाखवली आहे, आणि

(ख्) त्या अन्य व्यक्तीने प्रस्तुत अपराध आपल्या नकळत केला, त्याला आपली संमती किंवा मुकानुमती नव्हती,—

तर, उक्त अन्य व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात येईल आणि ती व्यक्ती, जणू काही त्या खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक असल्याप्रमाणे ती तशाच शिक्षेस पात्र ठरेल आणि खाणीच्या मालकास, अभिकर्त्यास किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापकास दोषमुक्त करण्यात येईल :

परंतु,—

(क्) खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापकाची शपथेवर तपासणी करता येईल, आणि त्याचा व ज्याला तो पुष्टीदाखल बोलावील अशा कोणत्याही साक्षीदाराचा पुरावा हा, जी व्यक्ती खरी अपराधी असल्याचे त्याने अभिकथन केले असेल त्या व्यक्तीकडून किंवा तिच्या वतीने, आणि अभियोक्त्याकडून उलट-तपासणीस पात्र असेल;

(ख्) वाजवी तत्परता दाखवूनही जर खरा अपराधी म्हणून अभिकथित व्यक्तीस प्रकरणाच्या सुनावणीसाठी नियत केलेल्या तारखेला न्यायालयासमोर उपस्थित करता आले नसेल तर, न्यायालय त्या प्रकरणाची सुनावणी वेळोवेळी तहकूब करील ; तथापि, ते अशाप्रकारे की, अशा तहकुबींचा एकूण कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक होता कामा नये, आणि जर उक्त कालावधीच्या अखेरपर्यंत, खरा अपराधी म्हणून अभिकथित व्यक्तीस न्यायालयासमोर उपस्थित करता आले नाही तर, न्यायालय, मालक, अभिकर्ता किंवा प्रकरणपरत्वे, व्यवस्थापक यांच्याविरुद्ध प्रकरणाची सुनावणी चालू करील.

शिक्षापात्र आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.

७८. (१) खाणीच्या मालकास, अभिकर्त्यास किंवा व्यवस्थापकास या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवण्यात येईल तेव्हा, न्यायालय त्याला कोणतीही शिक्षा देण्याबरोबरच आणखी, लेखी आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत (याबाबत अर्ज केल्यास न्यायालयाला असा कालावधी वेळोवेळी वाढवता येईल) ज्या बाबींच्या बाबतीत तो अपराध घडला असेल त्या बाबी सुधारण्यासाठी अशा रीतीने विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी उपाययोजना करण्याविषयी फर्मावू शकेल.

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ४२ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) अन्वये एखादा आदेश देण्यात आला असेल तेव्हा खाण मालक, अभिकर्ता किंवा प्रकरणपरत्वे, व्यवस्थापक अशा कालावधीत किंवा कोणताही वाढीव कालावधी असल्यास, त्या कालावधीत अपराध घडणे चालूच असले तरी, त्याबाबतीत या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असणार नाही. परंतु, असा कालावधी किंवा वाढीव कालावधी संपल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाचे पूर्णपणे पालन करण्यात आलेले नसेल तर, मालकाने, अभिकर्त्याने किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापकाने आणखी अपराध केला असल्याचे समजण्यात येईल आणि त्यास सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा अशा समाप्तीनंतर ज्या ज्या दिवशी आदेशाचे पालन करण्यात आले नसेल अशा प्रत्येक दिवसाला शंभर रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

खटल्यावरील मर्यादा. ७९. या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची तक्रार—

(एक) ज्या तारखेला अपराध घडला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत, किंवा

(दोन) अभिकथित अपराध घडल्याचे ज्या तारखेला निरीक्षकाला कळले असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत, किंवा

[१] [(दोन क) ज्यातील आरोपी हा, लोकसेवक आहे किंवा होता आणि त्या त्या काळी, अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखालील अपराधाची दखल घेण्यासाठी केंद्र सरकारची, राज्य शासनाची किंवा अन्य कोणत्यातरी प्राधिकरणाची पूर्व मंजुरी आवश्यक असेल अशा कोणत्याही प्रकरणी, मुख्य निरीक्षकास अशी मंजुरी मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत, किंवा]

(तीन) केंद्र सरकारने कलम २४ अन्वये चौकशी न्यायालय नियुक्त केले असेल अशा कोणत्याही प्रकरणी त्या कलमाच्या पोटकलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अहवालाच्या प्रकाशनाच्या तारखेनंतर [२] [एक वर्षाच्या] आत,—

यांपैकी जी तारीख नंतरची असेल त्या तारखेच्या आत करण्यात आली नसेल तर, कोणतेही न्यायालय त्याची दखल घेणार नाही.

[३] [**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) चालू राहणाऱ्या अपराधाच्या बाबतीत, ज्या ज्या वेळी अपराध घडणे चालूच राहील अशा वेळेच्या प्रत्येक क्षणाच्या संदर्भात, मर्यादा कालावधी मोजण्यात येईल;

(ख) कोणतेही कार्य करण्यासाठी या अधिनियमान्वये कालावधी वाढवून देण्यात आला असेल तेव्हा, त्या वाढीव कालावधीच्या समाप्तीपासून मर्यादा कालावधी मोजण्यात येईल.]

अपराधांची दखल. ८०. [४] [महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी] यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ अशा कोणत्याही न्यायालयाला, कोणत्याही खाण मालकाने, अभिकर्त्याने किंवा व्यवस्थापकाने या अधिनियमान्वये जो अपराध केला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल अशा कोणत्याही अपराधाची, किंवा जो अपराध या अधिनियमाद्वारे कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरवण्यात आला आहे अशा कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करता येणार नाही.

८०क. [द्रव्यदंडासंबंधी विशेष उपबंध] खाण (विशोधन) अधिनियम १९८३ (१९८३ चा ४२), कलम ४४ द्वारे निरसित (दिनांक ३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

विवक्षित प्रकरणात खटला भरण्याऐवजी समितीकडे निर्देशन करणे. ८१. (१) मुख्य निरीक्षकाच्या किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या किंवा एखाद्या निरीक्षकाच्या सांगण्यावरून या अधिनियमान्वये दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही खटल्याची संपरीक्षा करणाऱ्या न्यायालयाचे जर असे मत असेल की, खटला भरण्याऐवजी [५] * * * समितीकडे निर्देशन करण्यात यावे अशा प्रकारचे ते प्रकरण आहे तर, त्यास फौजदारी कार्यवाही तहकूब करता येईल, आणि असे निर्देशन केले जाण्याच्या दृष्टीने त्याबाबत केंद्र सरकारला कळवता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये माहिती मिळाल्यावर, केंद्र सरकार, ते प्रकरण [५] * * * समितीकडे निर्देशित करू शकेल किंवा न्यायालयाला संपरीक्षा पुढे चालवण्याचा निदेश देऊ शकेल.

---

१. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ४२ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४२ द्वारे "सहा महिन्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर घातला (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ४३ द्वारे स्पष्टीकरण जादा दाखल केले (१६ जानेवारी १९६० रोजी व तेव्हापासून).

४. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ४३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ४५ द्वारे वगळले (३१ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण दहा

### संकीर्ण

८२. एखादे उत्खनन किंवा खाणकाम [1][अथवा जेथे खनिजे किंवा कोक मिळवण्यास, वर्गावर्गी करून ते शुद्ध करण्यास, किंवा ते विक्रीसाठी तयार करण्यास सहाय्यभूत अशी, कोणतीही प्रक्रिया करण्यात येत असेल अशी एखाद्या खाणीतील किंवा तिच्या जवळपासची आणि तिच्या मालकीची जागा] या अधिनियमाच्या अर्थान्तर्गत खाण आहे किंवा कसे या विषयी कोणताही प्रश्न उद्भवला तर, केंद्र सरकारला त्या प्रश्नी निर्णय करता येईल, आणि केंद्र सरकारच्या सचिवाने स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र या मुद्यावर निर्णायक असेल.

एखादी खाण या अधिनियमाच्या अधीन आहे किंवा कसे या प्रश्नाचा निर्णय.

८३. [2][(१)] केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही स्थानिक क्षेत्राला किंवा कोणत्याही खाणीला किंवा खाणसमूहाला किंवा खाणवर्गाला किंवा एखाद्या खाणीच्या कोणत्याही भागाला किंवा कोणत्याही व्यक्तिवर्गाला या [3][अधिनियमाच्या किंवा विनियमांच्या किंवा नियमांच्या किंवा उपविधींच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधांच्या] प्रवर्तनातून, बिनशर्त किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट शर्तीवर सूट देऊ शकेल :

अधिनियमाच्या प्रवर्तनातून सूट देण्याची शक्ती.

परंतु, कोणत्याही स्थानिक क्षेत्राला किंवा खाणीला किंवा खाणसमूहाला किंवा खाणवर्गाला, या अधिनियमाच्या अन्य सर्व उपबंधाच्या प्रवर्तनातून सूट मिळाल्याशिवाय, [4][कलमे ४० व ४५] यांच्या उपबंधातून सूट दिली जाणार नाही.

[5][(२) [6][विनियमांच्या, नियमांच्या किंवा उपविधींच्या] कोणत्याही उपबंधांचे पालन ज्यामुळे अनावश्यक किंवा अव्यवहार्य ठरते अशी परिस्थिती कोणत्याही खाणीत किंवा तिच्या भागात आहे असे मुख्य निरीक्षकाचे किंवा कोणत्याही अन्य प्राधिकरणाचे मत असेल तर, अशा कोणत्याही उपबंधाच्या प्रवर्तनातून कोणत्याही खाणीस किंवा तिच्या भागास कोणत्याही विनिर्दिष्ट शर्तीच्या आणि केंद्र सरकारास लादणे योग्य वाटेल अशा निर्बंधांच्या अधीनतेने सूट देण्यास केंद्र सरकार, मुख्य निरीक्षकास किंवा अशा प्राधिकरणास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत करू शकेल.]

८४. [7][(१)] केंद्र सरकार या अधिनियमान्वये दिलेला कोणताही आदेश फिरवू शकेल किंवा त्यात फेरबदल करू शकेल;

आदेशात फेरबदल करण्याची किंवा ते विखंडित करण्याची शक्ती.

[8][(२) मुख्य निरीक्षक त्याने या अधिनियमान्वये किंवा कोणत्याही विनियमान्वये, नियमान्वये किंवा उपविधीअन्वये दिलेला कोणताही आदेश लेखी अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी फिरवू शकेल किंवा त्यात फेरबदल करू शकेल;

(३) एखाद्या खाणीच्या मालकाला, अभिकर्त्याला किंवा व्यवस्थापकाला अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय अशा मालकाला, अभिकर्त्याला किंवा व्यवस्थापकाला बाधक ठरेल असा कोणताही आदेश या कलमान्वये देण्यात येणार नाही.]

८५. हा अधिनियम शासनाच्या मालकीच्या खाणींना [9][सुद्धा] लागू होईल.

शासनाच्या मालकीच्या खाणींना अधिनियम लागू असणे.

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ४५ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४६ द्वारे "पोट-कलम (१)" असा नवीन क्रमांक दिला (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ४६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ४६ द्वारे "कलम ४५" या मजकुराऐवजी हा मजकूर घातला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

५. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ४६ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

६. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ४६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ४७ द्वारे "पोट-कलम (१)" असा नवीन क्रमांक दिला (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

८. वरील अधिनियमाच्या कलम ४७ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

९. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ४७ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

¹[नोटीस इत्यादी देण्यास फर्माविण्यात आलेल्या व्यक्ती तसे करण्यास कायद्याने बांधलेल्या असणे.

८५क. ज्या ज्या व्यक्तीने या अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिकरणाला कोणतीही नोटीस देणे किंवा कोणतीही माहिती पुरविणे आवश्यक आहे. अशी प्रत्येक व्यक्ती, "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) याच्या कलम १७६ च्या अर्थान्तर्गत तसे करण्यास कायद्याने बांधलेली असेल.]

²[विवरणे, नोटिसा इत्यादींवर सह्या करणे.

८५ख. या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमाच्या, नियमाच्या उपविधीच्या उपबंधाच्या किंवा कोणत्याही आदेशाच्या संबंधात एखाद्या खाणीच्या मालकाने किंवा त्याच्या-वतीने सादर केली जाणे व दिली जाणे आवश्यक असणारी सर्व विवरणे आणि नोटिसा आणि पाठविली जाणे आवश्यक असलेली पत्रे यांवर त्या खाणीचा मालक, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक किंवा मालकाने याबाबत मुख्त्यारनाम्याद्वारे जिला शक्ती प्रदान केली असेल अशी कोणतीही व्यक्ती स्वाक्षरी करील.

सुविधा किंवा सोयी यांसाठी कोणतीही फी किंवा आकार वसूल न करणे.

८५ग. या अधिनियमाच्या, उपबंधान्वये ज्या संरक्षक व्यवस्थांची किंवा सुविधांची सोय करावयाची असेल, किंवा कोणतीही सामग्री, किंवा उपकरणे पुरवावयाची असतील त्यांच्या संबंधात एखाद्या खाणीत कामावर लावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही फी किंवा आकार वसूल करण्यात येणार नाही.]

१९४८ चा अधिनियम ६३ याचे विवक्षित उपबंध खाणींना लागू होणे.

८६. केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, "कारखाने अधिनियम, १९४८" (१९४८ चा ६३) यातील प्रकरण ३ आणि ४ यांचे उपबंध, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अपवादांच्या आणि निर्बंधांच्या अधीनतेने, सर्व खाणींना आणि त्यांच्या परिसरांना लागू होतील.

सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

८७. या अधिनियमान्वये जी गोष्ट सद्भावपूर्वक केलेली असेल किंवा करण्याचे उद्देशित असेल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य न्यायालयीन कार्यवाही करता येणार नाही.

८८. [१९२३ चा अधिनियम ४ याचे निरसन.] "निरसन व विशोधन अधिनियम, १९५७" (१९५७ चा ३६) कलम २ व अनुसूची पहिली यांद्वारे निरसित.

---

१. १९५९ चा अधिनियम ६२, कलम ४८ द्वारे घातले (१६ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).
२. १९८३ चा अधिनियम ४२, कलम ४८ द्वारे घातले (३१ मे, १९८४ रोजी व तेव्हापासून).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई